



# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, सोमवार २२ डिसेंबर २०२५ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०





# भाजपचा विजयी जल्लोष

## नगर परिषद निवडणुकीत मुसंडी, सर्वाधिक जागांवर विजय





**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील मिनी विधानसभा म्हणून राज्याचे लक्ष लागलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे निकाल हाती आले असून भाजपने पुन्हा एकदा मुसंडी मारली आहे. त्यामुळे सकाळपासूनच भाजपने विजयाचा जल्लोष केला. भाजपने जवळपास १२९ जागांवर विजय मिळवला असून शिंदेंच्या शिवसेनेने ५४ आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसनेही ४० जागांवर विजय मिळवला. त्यामुळे भाजप महायुतीने जवळपास सव्वादोनशे जागांवर विजय मिळवला. या विजयानंतर भाजप प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्यानंतर आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हा विजय टीम भाजपचा असून इतिहासातील सर्वांत मोठा विजय असल्याचे म्हटले आहे.

महाराष्ट्रात भाजपाचे १२९ नगराध्यक्ष विजयी झाले असून ३ हजारांपेक्षा जास्त नगरसेवक विजयी झाले आहेत. भाजपाला २०१७ पेक्षा मोठा विजय मिळाला. प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या नेतृत्वात हे मोठे यश मिळाले असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले. भाजपने १२९ नगराध्यक्षपदावर विजय मिळवला असून महायुतीच्या तिघांचे मिळून जे नगराध्यक्ष आहेत ते ७५ टक्के आहेत. नगरसेवकपदावर भाजपने नवा रेकॉर्ड केला. यापूर्वीच्या २०१७ च्या निवडणुकीत भाजपचे १६०२ नगरसेवक होते, आता त्याच्या दुपटीचे ३३०२ नगरसेवक आहेत, अशी माहितीही देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

गेल्या २० ते २५ वर्षांच्या महाराष्ट्राच्या इतिहासात एवढा मोठा विजय कोणालाच मिळालेला नाही, तो भाजप महायुतीला मिळाला. मी एकाही सभेत कुठल्याही पक्षाच्या विरोधात, नेत्याच्या विरोधात बोललो नाही. मी केवळ विकासाच्या बाबतीत बोललो, विकासाची ब्लू प्रिंट आम्ही लोकांसमोर मांडली. ही पहिलीच निवडणूक होती, ज्या निवडणुकीत एखाद्या पक्षाच्या मुख्यमंत्र्यांने (पान २ वर)

## विभागीय नगर परिषद अध्यक्ष

| | | |
|---|---|---|
| अकोला | अकोट | माया धुळे |
| अकोला | बाळापूर | अर्फिम परबिंद मोहम्मद जमीर |
| अकोला | बार्शी-टाकळी | अफतर खातून अलिम उद्दिन |
| अकोला | हिवरखेडा | सुलभा दुतोंडे |
| अकोला | मुर्तीजापूर | हर्षल साबळे |
| अकोला | तेल्हारा | वैशाली पालीवाल |
| अमरावती | अचलपूर | रूपाली माथने |
| अमरावती | अंजनगाव सुर्जी | अविनाश गायगोले |
| अमरावती | चांदूरबाजार | मनीषा नांगलिया |
| अमरावती | चांदूर रेल्वे | प्रियंका विश्वकर्मा |
| अमरावती | चिखलदरा | अब्दुल शेख हैदर |
| अमरावती | दर्यापूर | मंदा भारसाकडे |
| अमरावती | धामणगांव रेल्वे | अर्चना अडसड रोठे |
| अमरावती | धरणी | सुनील चौथमल |
| अमरावती | मोर्शी | प्रतीक्षा गुल्हाने |
| अमरावती | नांद-खंडेश्वर | प्राप्ती मारोडकर |
| अमरावती | शेंदूरजनाघाट | सुवर्णा वरकरे |
| अमरावती | वरु ड | ईश्वर सलामे |
| वाशिम | कारंजा | फरीदा बानो पुंजानी |
| वाशिम | मालेगाव | ओम खुरसडे |
| वाशिम | मंगरुळपीर | अशोक परळीकर |
| वाशिम | रिसोड | भगवंतवर क्षिरसागर |
| वाशिम | वाशिम | अनिल केंदळे |
| यवतमाळ | आर्णी | नालंदा भरणे |
| यवतमाळ | दारव्हा | सुनील चिरडे |
| यवतमाळ | दिग्रस | पुजा राउत |
| यवतमाळ | घाटंजी | परेश कारिया |
| यवतमाळ | पुसद | मोहिनी नाईक |
| यवतमाळ | उमरखेड | तेजश्री जैन |
| यवतमाळ | वणी | विद्या आत्राम |
| यवतमाळ | यवतमाळ | प्रियदर्शिनी उईके |
| यवतमाळ | ढाणकी | अर्चना वासमवार |
| यवतमाळ | नेर-नबाबपूर | सुनिता जयस्वाल |
| यवतमाळ | पांढरकवडा | आतिश बोरले |
| वर्धा | आर्वी | स्वाती गुल्हाने |
| वर्धा | देवळी | किरण ठाकरे |
| वर्धा | हिंगणघाट | नयना तुळस्कर |
| वर्धा | पुलगाव | कविता ब्राह्मणकर |
| वर्धा | सिंदी रेल्वे | राणी स्नेहल कलोडे |
| वर्धा | वर्धा | सुधीर पांगुळ |
| बुलढाणा | बुलढाणा | पूजा संजय गायकवाड |
| बुलढाणा | चिखली | पंडित देशमुख |
| बुलढाणा | देउळगाव राजा | माधुरी शिंपणे |
| बुलढाणा | जळगाव जामोद | गणेश दांडगे |
| बुलढाणा | खामगाव | अर्पण फुंडकर |
| बुलढाणा | लोणार | मिरा मापारी |
| बुलढाणा | मलकापूर | आतिक जवारी वाले |
| बुलढाणा | मेहकर | किशोर गारोडे |
| बुलढाणा | नांदूरा | मंगला मु-हेकर |
| बुलढाणा | शेगाव | प्रकाश शेगोकार |
| बुलढाणा | सिंदखेडराजा | सौरभ तायडे |

## भाजपाच नंबर वन पक्ष

### मुख्यमंत्री फडणवीसांची प्रतिक्रिया




**नागपूर/प्रतिनिधी :** राज्यातील २८८ नगरपालिका आणि नगरपरिषद निवडणुकींचा निकाल आज जाहीर होत आहेत. या निवडणुकीत महायुतीचा त्यातही भाजपाचा मोठा विजय झाल्याचे दिसून येत आहे. तब्बल २०० हून अधिक नगरपालिकांवर महायुतीला विजय मिळाला असून भाजपाने १०० हून अधिक नगरपालिका, नगरपरिषदा आपल्या ताब्यात घेतल्या आहेत. निकालानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकार परिषदेला संबोधित केले असून महाराष्ट्राच नंबर वन पक्ष भाजपाच असल्याचे म्हटले आहे.

माध्यमांशी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, महाराष्ट्राच्या जनतेचे आभार मानतो. राज्याच्या जनतेने भाजपाला आणि आमच्या महायुतीला प्रचंड समर्थन दिले आहे. मी यापूर्वीच भाकीत केले होते. निवडून येणा-या एकूण नगराध्यक्षांपैकी ७५ टक्के नगराध्यक्ष हे महायुतीचे असतील. त्याचप्रकारचा कल राज्याच्या जनतेने दिला. तसेच भाजपाच प्रथम क्रमाकांचा पक्ष असल्याचे अधोरेखित झाले आहे. भाजपाचे जवळपास १२९ नगराध्यक्ष निवडून आले आहेत. तसेच महायुतीचे ७५ टक्के नगराध्यक्ष आहेत. नगरसेवकांच्या बाबतीत भाजपाने यावेळी विक्रम केला, अशी माहिती मुख्यमंत्री फडणवीस (पान २ वर)

## ‘PM मोदींच्या योजनांवरचा आशीर्वाद’

### अमित शाहंकडून कौतुकाची थाप, महायुतीच्या विजयाने दिल्लीत जल्लोष

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** महाराष्ट्रातील २८८ नगरपालिका आणि नगरपंचायतींच्या निवडणुकीत महायुतीने विरोधकांचा धुव्वा उडवत दणदणीत विजय मिळवला आहे. या विजयानंतर देशाचे गृहमंत्री अमित शाह यांनी ट्वीट करत महाराष्ट्रातील जनतेचे आभार मानले आहेत. भाजप या निवडणुकीत सर्वात मोठा पक्ष ठरला असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुतीने ग्रामीण आणि निमशहरी भागात आपली पकड पुन्हा एकदा सिद्ध केली आहे.‘महाराष्ट्र नगर पंचायत आणि नगर परिषद निवडणुकीत महायुतीला प्रचंड समर्थन दिल्याबद्दल राज्यातील जनतेचे आभार. हा विजय पंतप्रधान



मोदीजींच्या नेतृत्वाखालील एनडीए सरकारांच्या जनकल्याणकारी योजनांवर जनतेने दिलेला आशीर्वाद आहे,‘ असं अमित शाह यांनी म्हटलं. त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार आणि भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांचे विशेष अभिनंदन केले आहे. या निवडणुकीत भाजपने केवळ सर्वाधिक जागाच जिंकल्या नाहीत, तर बहुतांश नगराध्यक्षपदांवरही आपला ताबा मिळवला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या माहितीनुसार राज्यात भाजपचे ३,३०० पेक्षा जास्त नगरसेवक निवडून आले आहेत. तर भाजपचे १२२ ते १३४ नगराध्यक्ष थेट निवडून येण्याचा (पान २ वर)

## चंद्रपुरात 11 पैकी 8 जागांवर काँग्रेसचा झेंडा



**चंद्रपूर / प्रतिनिधी-**राज्यातील २८८ नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या आजच्या निवडणूक निकालात अनेक मोठे फेरबदल दिसून आलेत. महायुतीच्या वावटळीत शिवसेना ठाकरे गट व राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाची पुरती वाताहात झाली असताना काँग्रेसने चमकदार कामगिरी केली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार अखेर राज्यातील नगरपंचायती व नगर परिषदांच्या निवडणुका पार पडल्यात. आज झालेल्या मतमोजणीत भाजप हा पहिल्या क्रमांकाचा पक्ष ठरला असून, सत्ताधारी शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस हे अनुक्रमे दुस-या व तिस-या क्रमांकावर आहेत. विरोधी बाकावरील महाविकास आघाडीतील काँग्रेस वगळता शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचा कोणताही करिश्मा या निवडणुकीत चालला नाही. त्यांना एक आकडी संख्येतच (पान २ वर)

## वाशिमचा निकाल ऐतिहासिक

### एमआयएमने मारली मुसंडी, 19 नगरसेवक जिंकले

**वाशिम:** वाशिम जिल्ह्यातील चार नगरपरिषद व एका नगरपंचायतीचा निकाल समोर आला असून रिसोड आणि वाशिममध्ये भाजपचे दोन नगराध्यक्ष पदाचे उमेदवार निवडून आले आहेत तर कारंजामध्ये भाजपच्या उमेदवाराने विजय मिळवला आहे. मंगरूळपीर नगरपरिषदमध्ये सुद्धा राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाच्या अध्यक्षपदाच्या उमेदवाराने भाजपच्या उमेदवारांचा पराभव करत विजय मिळवला आहे. तर मालेगाव नगरपंचायतमध्ये शिवसेना शिंदे पक्षाच्या उमेदवाराने काँग्रेसच्या आणि भाजपच्या उमेदवाराचा पराभव करत मालेगाव नगरपंचायत वर भगवा फडकवला आहे. वाशिम जिल्ह्यातील (पान २ वर)

## आ.नाना पटोले यांची निष्क्रियता कारणीभूत नगरपालिका निवडणुकीत काँग्रेसची धूळधाण

**भंडारा :** भंडारा जिल्ह्यातील भंडारा, पवनी साकोली आणि तुमसर या चार नगरपालिका निवडणुकांचे निकाल आज जाहीर झाले. या चारही नगरपालिकांमध्ये काँग्रेसची धूळधाण झाली असून आमदार नाना पटोले यांची निष्क्रियताच यासाठी कारणीभूत असल्याचे बोलले जात आहे. विशेष म्हणजे, प्रचारादरम्यान नानांनी भाजपवर कोणतेही टीका करायची टाळणे आणि काँग्रेसच्या उमेदवारांच्या प्रचारातही पिछाडीवर राहणे. त्यामुळे नाना भाजपकडे जाण्याच्या मार्गावर असल्याच्या चर्चांना आता आणखीन बळ मिळाले असून त्यांच्या या निष्क्रियतेमुळेच जिल्ह्यातून काँग्रेसचा सुपडा



साफ झाल्याचे बोलले जाते. लोकसभा निवडणुकीत भंडारा गोंदिया लोकसभा क्षेत्रात दणदणीत विजय मिळवणा-या काँग्रेसला विधानसभा निवडणुकीत काठावर विजय मिळवता आला होता. साकोली विधानसभेत नाना पटोले हे केवळ बॅलेट पेपरच्या भरोशावर विजय झाले होते. यातून ते काही धडा घेतील आणि या नगरपालिकेसाठी चांगली रणनीती आखतील अशी अपेक्षा होती. मात्र या नगरपालिकांच्या निकालानंतर नानांना काँग्रेसला भुईसपाट करायचे होते की काय अशा चर्चा रंगू लागल्या आहेत. एकीकडे चंद्रपूर जिल्ह्यात वडेट्टीवार यांनी ११ पैकी काँग्रेसचे ८ उमेदवार निवडून आणले. तर काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांना मात्र त्यांच्या गृह जिल्ह्यातच काय तर त्यांच्या मतदारसंघात सुद्धा काँग्रेसच्या उमेदवाराला निवडून आणता आले नाही. (पान २ वर)

## विरोधकांचे पानिपत, आता मनपासाठी एक दिलाने कामाला लागा: एकनाथ शिंदे

**मुंबई/प्रतिनिधी :** नगरपालिका व नगर परिषद निवडणुकांमध्ये महाविकास आघाडीला एकत्रित मिळालेल्या जागांपेक्षा अधिक जागा शिवसेनेला मिळाल्या आहेत. नवी मुंबईत शिवसेनेची ताकद वाढत असल्याचे स्पष्ट आहे. त्यामुळे गाफील न राहता सर्वांनी एकदिलाने कामाला लागावे आणि नवी मुंबई महापालिकेवर महायुतीचा भगवा फडकवावा, असे आवाहन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. नवी मुंबई येथे आयोजित शिवसेनेच्या पदाधिकारी मेळाव्यात ते बोलत होते. उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, या निवडणुकांमध्ये असली शिवसेना कोणाची याचा फैसला जनतेने केला आहे. महाविकास आघाडीचा



एकत्रित आकडा सिंगल डिजिटमध्ये राहिला, तर शिवसेनेचा आकडा त्यापेक्षा अधिक आहे. लोकसभा, विधानसभा आणि नगरपालिका निवडणुकांनंतर आता महापालिकेतही महायुतीचाच भगवा फडकणार, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. महापालिका निवडणुकीत शाखा-शाखांमधून काम करा, नाराजी असल्यास संवादातून ती सोडवा आणि विकास हाच अजेंडा (पान २ वर)

## पुणे जिल्ह्यात १० जागांवर राष्ट्रवादीचे नगराध्यक्ष

**पुणे/प्रतिनिधी :**१४ नगरपरिषदा आणि ३ नगरपंचायती मध्ये अजित पवारांच्या राष्ट्रवादीने बाजी मारली असून १० जागांवर वर्चस्व मिळवले आहे. तर एकनाथ शिंदे गटाला ४ आणि भाजपला ३ जागा मिळाल्या आहेत. जिल्ह्यातील १४ नगरपरिषदा आणि तीन नगरपंचायतींच्या निवडणुकीमध्ये बहुतांश ठिकाणी निवडणूक रिंगणात महायुतीतील घटक पक्ष एकमेकांसमोर उभे राहिले होते. जिल्ह्यात सगळ्या ठिकाणी महायुतीने वर्चस्व मिळवले आहे. १४ नगरपरिषदा आणि ३



नगरपंचायती मध्ये अजित पवारांच्या राष्ट्रवादीने बाजी मारली असून १० जागांवर वर्चस्व मिळवले आहे. तर एकनाथ शिंदे गटाला ४ आणि भाजपला ३ जागा मिळाल्या आहेत. पुणे जिल्ह्यात महाविकास आघाडीला एकही जागा मिळाली नाहीये. अनेक ठिकाणी महायुतीतीलच घटक पक्षांची चुरशीची लढत झाली आहे. त्यामध्ये अजितदादांनी बाजी मारल्याचे समोर आले आहे. एकनाथ शिंदे गटानेही आपले उमेदवार निवडून आणले आहेत. या निकालानंतर एकनाथ शिंदे यांनी माध्यमांशी संवाद साधताना आता खरी शिवसेना कोणाची असं म्हणत एकनाथ शिंदेंनी उद्धव ठाकरेंना टोला लगावला आहे. तर अजित पवारांनी बघा पुणे जिल्ह्यात कुणाचे वर्चस्व असं म्हणत मिश्किल टिपण्णी केली आहे. संपूर्ण राज्यात महायुतीला २०० पेक्षा अधिक जागा मिळाल्या आहेत. तर महाविकास आघाडीला (पान २ वर)









# १ व १० वरिल उर्वरित

## भाजपचा विजयी

कोणावरही टीका न करता एवढे मोठे यश मिळवले आहे, असेही देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले. टीम भाजपचा हा विजय आहे, लोकांच्या विश्वासाला आम्ही नक्कीच सार्थ ठरवू, विकासाला चालना देउ, असेही फडणवीस यांनी म्हटले.

**सर्व नेते, पदाधिका-यांनी घेतली मेहनत-** ३ हजारांच्या आसपास आमचे नगरसेवक निवडून आले असून सर्व मंत्र्यांनी आणि पदाधिकारी यांनी निवडणुकीत मोठी मेहनत केली. जवळपास १ लाख ६ हजार बूथवर काम करणा-या कार्यकर्त्यांनी ताकदीने परिश्रम घेतले. अमित शाह म्हणतात ५१ टक्के लढाई संसद ते पंचायत कार्यकर्त्यांनी डोक्यावर घेउन लढली पाहिजे. त्यानुसार कोणत्याही नरेटिव्हला बळी न पडता आम्ही या निवडणुका जिंकल्या आहेत. लोकसभेला त्यांनी खोटा नरेटिव्ह पसरवला. परंतु आता ते यशस्वी झाले नाहीत. खोटा नरेटिव्ह त्यांनी यादेखील निवडणुकीत पसरवण्याचा प्रयत्न केला. परंतु ते यशस्वी झाले नाहीत, अशी प्रतिक्रिया रविंद्र चव्हाण यांनी दिली.

## भाजपाच नंबर वन

यांनी दिली. आकडेवारी देताना ते म्हणाले, २०१७ साली आमचे १६०२ नगरसेवक होते. आता त्याच्या दुपटीने जास्त म्हणजे ३३२५ नगरसेवक निवडून आले आहेत. नगरसेवकांच्या संख्येमध्ये एकट्या भाजपाचे ४८ टक्के नगरसेवक आहेत. प्रचंड मोठे जनसमर्थन आम्हाला मिळाले आहे. आमचे सहयोगी एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांचेही अभिनंदन करतो. त्यांच्याही पक्षाने चांगली कामगिरी केली आहे.

## मोदींच्या योजनांवरचा

अंदाज आहे. एकूण निवडून आलेल्या नगरसेवकांपैकी तब्बल ४८ टक्के नगरसेवक एकट्या भाजपचे आहेत **'भाजप आता महाराष्ट्राचा नंबर १ पक्ष'** विजयानंतर पत्रकारांशी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, '२०१४ पासून भारतीय जनता पक्ष हा केवळ शहरांचाच नाही, तर ग्रामीण भागातील जनतेचाही पक्ष बनला आहे. या निकालाने भाजप हा महाराष्ट्रातील नंबर १ पक्ष असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. **महाविकास आघाडीची पिछेहाट-**या निवडणुकीत काँग्रेसने विदर्भात काही प्रमाणात यश मिळवले असले तरी, शिवसेना (ठाकरे गट) आणि राष्ट्रवादी (शरद पवार गट) यांची मोठी वाताहात झाल्याचे चित्र आहे.

## चंद्रपुरात ११ पैकी ८ जागांवर

समाधान मानावे लागले. या पार्श्वभूमीवर काँग्रेसने ३१ जागा जिंकत महाविकास आघाडीतील आपले वर्चस्व सिद्ध केले आहे.

काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी आपल्या होम ग्राउंडवर म्हणजे चंद्रपूर जिल्ह्यात भाजपला धूळ चारली आहे. त्यांनी चंद्रपूर जिल्ह्यातील ११ पैकी ८ नगरपालिकांवर काँग्रेसचा झेंडा फडकावला आहे. येथे सत्ताधारी भाजप व एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला प्रत्येकी १ जागेवर समाधान मानावे लागले आहे. एका जागेवर अपक्ष उमेदवाराने बाजी मारली आहे. काँग्रेसच्या या विजयामुळे विजय वडेट्टीवार यांची चंद्रपुरावरील पकड अधिक घट्ट झाली आहे.

## वाशिमचा निकाल ऐतिहासिक

चार नगरपरिषद व एका नगरपंचायतीमधील एकूण १२४ नगरसेवक पदांपैकी भाजपचे तब्बल ४९ उमेदवार निवडून येत भाजप जिल्ह्यातील सर्वात मोठा पक्ष ठरला आहे तर एम आय एम चे १९ नगरसेवक निवडून येत दुस-या क्रमांकाचे स्थान मिळवले आहे. त्या पाठोपाठ काँग्रेसच्या १८, ठाकरे आणि शिंदे यांच्या सेनेला प्रत्येकी १४ जागेवर विजय मिळवता आला आहे.

## आ.नाना पटोले यांची निष्क्रियता

भंडा-यात तिकीट वाटपापासूनच काँग्रेसमध्ये अंतर्गत वाद सुरू झाले होते. हे वाद चव्हाट्यावर आले नसले तरी निकालानंतर त्याचे परिणाम काँग्रेस उमेदवाराला भोगावे लागत आहेत. लोकसभा निवडणुकीत काँग्रेसचे उमेदवार असलेल्या ड?क्टर प्रशांत पडोळे यांना विजयी करण्यासाठी नाना पटोले यांनी रक्ताचे पाणी केले होते.

## विरोधकांचे पानिपत, आता

ठेवा. आरोपांना उत्तर कामातून द्यायचे आहे. गाफील राहू नका, असा संदेश देत त्यांनी कार्यकर्त्यांना सज्ज राहण्याचे आवाहन केले.

## पुणे जिल्ह्यात १० जागांवर

५० च्या आसपास जागा मिळाल्या आहेत.

पुणे जिल्ह्यातील नगराध्यक्ष विजयी उमेदवार

बारामती - नगराध्यक्षपदी सचिन सातव (राष्ट्रवादी अजित पवार गट)
लोणावळा - नगराध्यक्षपदी राजेंद्र सोनवणे (राष्ट्रवादी अजित पवार गट)
दौंड - नगराध्यक्षपदी दुर्गादेवी जगदाळे (राष्ट्रवादी अजित पवार गट)
तळेगाव दाभाडे - नगराध्यक्षपदी संतोष दाभाडे (भाजप)
चाकण - नगराध्यक्षपदी मनीषा सुरेश गोरे (शिवसेना शिंदे गट)
जुन्नर - नगराध्यक्षपदी सुजाता मधुकर काजळे (शिवसेना शिंदे गट)
आळंदी - नगराध्यक्षपदी प्रशांत कु-हाडे (भाजप)
शिरूर -नगराध्यक्षपदी ऐश्वर्या पाचर्णे (राष्ट्रवादी अजित पवार गट)
सासवड - आनंदी काकी जगताप (भाजप)
जेजुरी - नगराध्यक्षपदी जयदीप बारभाई (राष्ट्रवादी अजित पवार गट)
भोर - नगराध्यक्षपदी रामचंद्र आवारे (राष्ट्रवादी अजित पवार गट)

## अमरावती जिल्ह्यात भाजपला

आहे. यासह दर्यापूर नगरपरिषदेत काँग्रेस उमेदवार मंदाकिनी भारसाकडे नगराध्यक्ष म्हणून निवडून आल्या असून चिखलदरा येथे देखील काँग्रेसचे शेख अब्दुल शेख हैदर नगराध्यक्ष म्हणून निवडून आले आहेत. चांदुर रेल्वे नगर परिषदेत मतदारांनी काँग्रेस आणि भाजपला नाकारत वंचित बहुजन आघाडीच्या डॉ.प्रियंका विश्वकर्मा यांच्या बाजूने विजयी कौल दिला आहे. तर चांदूरबाजार नगर परिषदेत बच्चू कडू यांच्या प्रहार ने गड राखला आहे. येथून प्रहारच्या मनीषा नांगलिया यांचा विजय झाला. मोर्शी नगरपरिषदेत शिवसेना शिंदे गटाच्या प्रतीक्षा गुल्हाने नगराध्यक्ष म्हणून निवडून आल्या आहेत तर नांदगाव खंडेश्वर नगरपंचायतीत शिवसेना ठाकरे गटाच्या प्राप्ती मारोटकर नगराध्यक्ष म्हणून निवडून आल्या आहेत.

## धामणगांवात भाजपाचा दणदणीत

यांना ५८५ मते मिळाली असुन काँग्रेसच्या वैशाली गाडबैल यांना ३३९ मते मिळाली यात मंजीरी भोगे यांचा २४६ ममतांनी विजय झाला आहे. प्रभाग क्र. २ अ मधुन भाजपाचे प्रतिभा प्रदीप खोब्रागडे यांना ६११ मते प्राप्त झाली आहेत. तर काँग्रेसच्या अनिता बंडऊ मडामे यांना ५३६ मते मिळविता आली. यात खोब्रागडे यांचा ७५ मतांनी विजय झाला आहे. प्रभात २ ब मध्ये भाजपाच्या हेमकरण मां. काकंरीया यांना ६४३ मते मिळाली असुन काँग्रेसच्या अनुप भोगे यांना ४९३ मते मिळाली. यात कांकरीया यांचा १५० मतांनी विजय झाला आहे. प्रभाग क्र. ३ अ मधुन भाजपाचे मनिषा विनय शिरभाते यांना ६९२ मते तर काँग्रेसच्या शिरीन रोशन शेख यांना ५३८ मते मिळविता आली यात शिरभाते यांचा १५४ मतांनी विजय झाला आहे. प्रभात ३ ब मध्ये भाजपाच्या गिरीश उर्प बंडू पु. मुंधडा यांना ६५५ मते मिळाली असुन काँग्रेसच्या संदेश नंदकिशोर कुचेरीया यांना ५८० मते मिळाली. यात कांकरीया यांचा ७५ मतांनी विजय झाला आहे. प्रभाग क्र. ४ अ मधुन भाजपाचे रिना विजय साहू यांना ४६५ मते प्राप्त झाली आहेत. तर काँग्रेसच्या रिता जयवंत भालेकर यांना ४२६ मते मिळविता आली. यात साहू यांचा ३९ मतांनी विजय झाला आहे. प्रभात ४ ब मध्ये भाजपाच्या गोपाल शांतीलाल द्विवेदी यांना ४७२ मते मिळाली असुन काँग्रेसच्या गोपाल लोंदे यांना ४१९ मते मिळाली यातगोपाल द्विवेदी यांचा ५३ मतांनी विजय झाला.प्रभाग क्र. ५ अ मधुन भाजपाचे रंजना महेंद्र शेलोकार यांना ५६५ मते प्राप्त झाली आहेत. तर काँग्रेसच्या शितल अरुण विधळे यांना ५११ मते मिळविता आली. यात शेलोकार यांचा ५४ मतांनी विजय झाला. प्रभाग ५ ब मध्ये भाजपाच्या रवि माधवदास कुकरेजा यांना ६०५ मते मिळाली असुन काँग्रेसच्या प्रविण रा. चिंचे यांना ३१२ मते मिळाली तर याच प्रभागात अपक्ष उमेदवार प्रविण बबन रोहनकर २१ व मधुकर हनुमंत लोहबरे यांना १४८ मते मिळालीत .यात कुकरेजा यांचा २९३ मतांनी विजय झाला. प्रभाग क्र. ६ अ मधुन भाजपाचे मुरलीधर स. पतके यांना ७७३ मते तर काँग्रेसच्या आशिष सु.भोगे यांना ४०६ मते मिळविता आली.यात पतके यांचा ३६७ मतांनी विजय झाला. प्रभात ६ ब मध्ये भाजपाच्या सीमा विजय बागडे यांना ७३० मते मिळाली असुन काँग्रेसच्या नंदा बबन जगताप यांना ४४१ मते मिळाली यात बागडे यांचा २८९ मतांनी विजय झाला आहे. प्रभाग क्र. ७ अ मधुन भाजपाचे प्रियंका रितेश जवंजाळ यांना ८६३ मते प्राप्त झाली आहेत. तर काँग्रेसच्या सुचिता मनीष कान्हेरकर यांना ३७६ मते मिळविता आली. यात जवंजाळ यांचा ४८७ मतांनी विजय झाला. प्रभात ७ ब मध्ये भाजपाच्या दर्शन अनिल राठी यांना ८७५ मते मिळाली असुन काँग्रेसच्या विजय पां. काळे यांना ३६५ मते मिळाली. यात राठी यांचा ५१० मतांनी विजय झाला आहे. प्रभाग क्र. ८ अ मधुन भाजपाचे जगदिश प्रे. राय यांना ७३९ मते प्राप्त झाली आहेत. तर काँग्रेसच्या आशिष गो. शिंदे यांना ५२४ मते मिळविता आली. यात राय यांचा २१५ मतांनी विजय झाला. प्रभाग ८ ब मध्ये भाजपाच्या काजल अ. उपरीकर यांना ७४० मते मिळाली असुन काँग्रेसच्या शारदा न. जयस्वाल यांना ५१२ मते मिळाली. यात उपरीकर यांचा २२८ मतांनी विजय झाला. प्रभाग क्र. ९ अ मधुन भाजपाचे सीमा गजानन पेंदाम यांना ७७९ मते प्राप्त झाली आहेत. तर काँग्रेसच्या सुनिता उत्तम मडावी यांना ५९७ मते मिळविता आली. यात पेंदाम यांचा १८२ मतांनी विजय झाला. प्रभात ९ ब मध्ये भाजपाच्या विलास सुभाषराव बुटले यांना ७२४ मते मिळाली असुन काँग्रेसच्या चंदू पंजाबराव डहाणे यांना ६४८ मते मिळाली यात बुटले यांचा ७९ मतांनी विजय झाला. प्रभाग क्र. १० अ मधुन भाजपाचे अंजली सुजीत मारवे यांना ८३१ मते प्राप्त झाली. तर काँग्रेसच्या कल्याणी वै. वाणी यांना ८१८ मते मिळविता आली यात मारवे यांचा १३ मतांनी निसटता विजय झाला आहे. प्रभात १० ब मध्ये भाजपाच्या अंशुल शा. बडगैय्या यांना ८६४ मते मिळाली असुन काँग्रेसच्या मंजुर रउफ शेख यांना ७८५ मते मिळाली यात बडगैय्या यांचा ७९ मतांनी विजय झाला आहे.या निवडणूकीत १२१८२ मतदारांनी मतदानाचा हक्क बाजाविला असुन १० प्रभागांमध्ये ५०९ मतदारांनी नकाराधिकार(NOTA) वापरला ही चिंतनीय बाब आहे. निकालानंतर तहसील कार्यालय परिसरात भाजपा कार्यकर्त्यांचा जल्लोष पहावयास मिळाला. गावात ठिकठिकाणी डिजेच्या तालावर गुलाल उधळण्यात आला होता.

## तोडफोड प्रकरणातील आरोपींची

परेड पाहण्यासाठी मोठ्या संख्येने नागरिक रस्त्यावर जमा झाले होते. दीर्घकाळापासून परिसरात सुरू असलेल्या गुंडागर्दी, अराजकता व दहशतीमुळे त्रस्त नागरिकांच्या चेहऱ्यावर समाधान व दिलासा स्पष्टपणे दिसून आला. दुसरीकडे, या कारवाईमुळे असामाजिक तत्वांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. राजापेठ पोलिसांच्या या निर्णायक व कडक कारवाईमुळे दबंगगिरी, हिंसाचार तसेच सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करणाऱ्यांविरोधात यापुढेही कठोर आणि उघड कारवाई केली जाईल, असा स्पष्ट संदेश प्रशासनाने दिला आहे.

## महापालिका निवडणुकीसाठी

व आशीर्वाद महत्वाचे आहेत. यासाठीच आज राष्ट्रवादीचा परिवार मेळावा घेऊन अमरावती महानगरपालिकेच्या निवडणुकीचे रणशिंग फुंकत आहे. त्यासाठी मोठ्या ताकदीने व जोमाने कामाला लागायचे आहे. अमरावती महानगर पालिकेत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची सत्ता स्थापन होण्याकरिता आपल्या सहकाऱ्यांना केवळ हि निवडणूक लढायची नसून जिंकायची आहे. असे स्फूर्तीदायी प्रतिपादन अमरावतीच्या आमदार सुलभा संजय खोडके यांनी केले.

आगामी अमरावती महानगर पालिकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचा परिवार मेळावा आज दि.२१ डिसेंबर २०२५ रोजी संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन परिसरातील खुल्या मंचावर मोठ्या उत्साहात पार पडला . त्यावेळी आमदार सुलभा खोडके यांनी आपल्या संबोधनातून उपस्थितांनामध्ये नवा जोश व उत्साह निर्माण केला. यावेळी व्यासपीठावर यश खोडके, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष -प्रशांत डवरे श्री गौरक्षण संस्था व हिंदू स्मशान संस्था अध्यक्ष ॲड. रतनलाल अटल,महात्मा फुले बहूउद्देशीय संस्था अध्यक्ष -प्रभाकरराव घाटोळ,कार्याध्यक्ष - दिपक उर्फ गजानन लोखंडे,विदर्भ खाटीक समाज सेवा समितीचे अध्यक्ष - सुधीर लसणकार,भानुदासजी टवलारे, राठोड तैलिक समाज अध्यक्ष - रामेश्वर गोदे, माजी महापौर किशोर शेळके, रीना नंदा, मनपा स्थायी समिती, अमरावती चे माजी सभापती - अविनाश मार्डीकर,माजी उप महापौर शेख जफर, शैव गुरव हितकारिणी मंडळाचे कोषाध्यक्ष -जयंत पुसतकर,अमरावती जिल्हा वकील संघाचे माजी अध्यक्ष ॲड शोएबखान,नारायणराव दहाट, शिवाजीराव चौधरी, राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे वासुदेवराव वानखडे, रुपराव इंगळे,महाराणा प्रतापसिंह सार्वजनिक सेवा समितीचे अध्यक्ष अतुलसिंह राजपूत,हारूनभाई, सलीम सर, इम्रानखान, ईजाजखान,बिलालखान मराठा सेवा संघाचे अध्यक्ष - आश्विन चौधरी, मराठा सेवा संघ अंतर्गत मराठा वर - वधू सूचक केंद्र, मोती नगर अमरावती चे - प्रकाश राऊत,आयटीआय निदेशक संघटना अखिल भारतीय फेडरेशन अध्यक्ष - भोजराज काळे,राष्ट्रवादी किसान सभाचे नरेंद्र राऊत,राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे शहराध्यक्ष- ऋतुराज राऊत, राष्ट्रवादी काँग्रेस मागासवर्गीय सेल अध्यक्ष तथा माजी मनपा सभापती मंगेश मनोहर, राष्ट्रवादी काँग्रेस व्हीजेएनटी सेल अध्यक्ष भास्कर ढेवले , अविनाश बोबडे, जिल्हा परिषद, अमरावती पतसंस्था माजी अध्यक्ष -पुरुषोत्तम राणे,अखिल भारतीय कुणबी कृषक समाज मंडळ अध्यक्ष -विष्णुपंत कांबे,पप्पूशेठ खत्री, शालवन बचत गटाचे - सुभाष भटकर,संजय कुकरेजा, मधुकरराव आठवले, प्रकाशराव खडसे,अमरावती खदान व क्रशर ओनर्स असोसिएशन चे सतीश बसेरिया,अमरावती जिल्हा तैलिक समितीचे - प्रकाश बनारसे,अमरावती कासार पंच मंडळ व अंशकालीन कर्मचारी संघटना अध्यक्ष -अजय कोळपकर,महाराष्ट्र वैश्य सोनार संघाचे संपदा सागर पासेबंद,सरोज सुगनचंद गुप्ता, माजी नगरसेवक - सपना ठाकूर, भूषण बनसोड, खालिद मास्टर,योगिता गिरासे, छबूताई मातकर,महात्मा फुले बहुउद्देशीय संस्था महिला आघाडी शहर अध्यक्ष -अपर्णा डहाके आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी विविध समाजाच्या प्रतिनिधींची व्यासपीठावर लक्षणीय उपस्थिती होती. प्रामुख्याने यावेळी राष्ट्रवादी परिवारातील सर्व सहकारी तसेच महिली भगिनी , जेष्ठ नागरिक व युवक बांधव यांची मोठी गर्दी होती. कार्यक्रमाचे अंती सर्व उपस्थितांचे यश सुलभा संजय खोडके यांनी आभार मानले.

**आ. संजय खोडके यांचा दुःकश्राव्य प्रणालीद्वारे सहभाग-**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे संघटक महासचिव आ.संजय खोडके हे या मेळाव्याचे अध्यक्षस्थान भूषविणार होते. मात्र त्यांचा प्रकृतीच्या करणास्तव ते या मेळाव्याला उपस्थित राहू शकत नसल्याने त्यांनी दुकश्राव्य प्रणाली द्वारे राष्ट्रवादीच्या परिवार मेळाव्याला उपस्थित सर्व सहकाऱ्यांशी संवाद साधला. अमरावती महानगर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीला मोठा जनाधार आहे. जनतेच्या मनामध्ये असलेली राष्ट्रवादी मतांमध्ये उतरली पाहिजे. त्यामुळे मोठ्या ताकदीनिशी या निवडणुकांना सामोरे जाऊन महापालिकेवर राष्ट्रवादीचा झेंडा रोवण्याचे आवाहन आ.संजय खोडके यांनी केले.

## मोर्शी नगरपालिकेच्या निवडणुकीत

पवार गटाचे २ उमेदवार विजयी झाले. शिवसेना शिंदे गटाचे २ उमेदवार,तर प्रहार जनशक्ती पार्टी १ उमेदवार आणि अपक्ष दोन उमेदवार विजय झाले.

नगराध्यक्ष पदाचे उमेदवार प्रतीक्षा गुल्हाने यांना ७ हजार २३० मते मिळाली. प्रभाग क्रमांक एक मधून राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे डॉ.प्रदीप कुऱ्हाडे यांना ७०७ मते मिळाली. प्रभाग एक मधून साबिया अर्शी शेख इरफान यांना ५३२ मते मिळाली.

प्रभाग दोन मधून राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे विद्या विनोद ढवळे १०३१ मते मिळाली व निलेश गुलाबराव महल्ले यांना १००७ मते मिळाली आहे. प्रभाग क्रमांक तीन मधून भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे उमेदवार राखी गौरव खेरडे ८७४ मते मिळाली असून सागर अजबराव ठाकरे यांना१०४८ मते मिळाली आहे. प्रभाग क्रमांक चार मधून राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे उमेदवार कांचन वैभव भोजने हिला ६१९ मते मिळाली आहे. आनंद रमेश सदातपुरे यांना ६४३ मिळाली आहे. प्रभाग क्रमांक पाच मधून अपक्ष उमेदवार दिपाली विशाल बडोदेकर हिला ५१२ मते मिळाली आहेत. तसेच भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे उमेदवार सागर कोकाटे यांना८६३ मते मिळाली आहे. प्रभाग क्रमांक सहा मधून शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार अमन गायकी याला ६१० मते मिळाली आहेत तर भारतीय जनता पार्टीचे उमेदवार सुनिता सुनील कोहळे हिला ८०८ मते मिळाली आहेत. प्रभाग क्रमांक सात मधून भारतीय जनता पार्टीचे उमेदवार प्रीती ब्रह्मानंद देशमुख४८१ व हर्षल हरिभाऊ चौधरी ६५२ मते मिळाली आहे.

प्रभाग क्रमांक आठ मधून भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे उमेदवार रवी रामू परतेती याला ६८२ मते मिळाली आहे व भारतीय जनता पार्टीच्या उमेदवार मोनाली भास्कर फंदे हिला ३०६ मते मिळाली आहेत. प्रभाग क्रमांक नऊ मधून शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार रवींद्र रामकृष्ण गुल्हाने यांना १ हजार ३४ मते मिळाली आहे. अपक्ष उमेदवार प्रभा कैलास फंदे हिला ९०५ मते मिळाली आहे. प्रभाग क्रमांक दहा मधून प्रहार जनशक्ती पार्टीचे उमेदवार नईम खान रहमतुल्ला खान यांना १२५० मते मिळाली आहे.राष्ट्रीय काँग्रेसचे उमेदवार कमरुनिसा शेख शब्बीर हिला १२३७ मते मिळाली आहे. प्रभाग क्रमांक ११ मधून भारतीय जनता पार्टीचे उमेदवार जयश्री संजीव आगरकर ५७९ व नितीन भिमराव पन्नासे यांना ४८९ मते प्राप्त झाली आहेत.

प्रभाग क्रमांक १२ मधून राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे उमेदवार अंकुश भोजराज घारड यांना ७१३ व प्रीती राहुल देशमुख यांना ६६३ मते प्राप्त झाली आहे. निवडणूक निर्णय अधिकारी सागर ढवळे, व नायब तहसीलदार चारुदत्त पाटील, खंडविकास अधिकारी स्वप्निल मदगुल, मोर्शी नगरपालिकेचे प्रशासकीय अधिकारी अमोल ढोले इतर कर्मचाऱ्यांनी काम पाहिले.

## शंकरपट म्हणजे संस्कृती,

अर्थव्यवस्थेचे खरे शिल्पकार आहेत. अशा उपक्रमांमुळे तरुण पिढीला आपल्या परंपरेची ओळख मिळते असे प्रतिपादन तिवसा विधानसभा मतदारसंघाचे आमदार राजेश वानखडे यांनी केले. संत काशिनाथ महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त नांदगाव पेठ येथे आयोजित करण्यात आलेल्या विदर्भस्तरीय शंकरपट कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर उदघाटक म्हणून स्व.सौ.हिराबाई गुल्हाने चॅरिटेबल ट्रस्ट चे अध्यक्ष तथा भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष विवेक गुल्हाने यांची उपस्थिती होती तर प्रमुख अतिथी म्हणून सरपंच कविता डांगे, शेतकरी मित्र परिवार आयोजन समितीचे ज्ञानेश्वरराव इंगळे, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष संजय चौधरी,ट्रस्टचे पदाधिकारी मिलिंद पाटील, भाजपा तालुकाध्यक्ष वीरेंद्र लंगडे, भाजयुमो तालुकाध्यक्ष विजय भुयार, गजानन कडू, संजय तायडे, अरविंद पंडित, प्रवीण अळसपुरे, जुनेद नवाब आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे उद्घाटक विवेक गुल्हाने यांनी प्रास्ताविकातून शंकरपट आयोजनामागील भूमिका स्पष्ट केली. ते म्हणाले की, संत काशिनाथ महाराजांच्या पुण्यतिथी निमित्त शेतकरी संस्कृतीचे जतन व संवर्धन व्हावे, बैलजोडी मालकांच्या कष्टांना मान मिळावा आणि ग्रामीण परंपरा जिवंत राहाव्यात, या उद्देशाने हा उपक्रम राबवण्यात आला आहे. सर्व ग्रामस्थ, युवा शेतकरी मित्र परिवार आणि स्व. सौ. हिराबाई गुल्हाने चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या सहकार्यामुळे हा शंकरपट यशस्वी होत असल्याचेही त्यांनी सांगितले तर सरपंच कविता डांगे यांनीही आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की, 'शंकरपट हा केवळ खेळ किंवा स्पर्धा नसून ग्रामीण समाजाला एकत्र आणणारा उत्सव आहे. अशा कार्यक्रमांमुळे गावाची एकजूट वाढते, शेतकरी आणि बैलजोडी मालकांचा आत्मसन्मान उंचावतो आणि आपल्या संस्कृतीला नवी ऊर्जा मिळते.आयोजित करण्यात आलेला हा शंकरपट नांदगाव पेठच्या सामाजिक आणि सांस्कृतिक ओळखीला अधिक बळ देणारा असल्याचे ते म्हणाले.

## दर्यापूर नगराध्यक्षपदी काँग्रेसच्या

तिरंगी लढतीत शिंदे शिवसेनेचे उमेदवार प्रदीप मलिये यांनी दुसऱ्या क्रमांकाची ६४३१ मते घेतली असून २४८१ मतांनी त्यांचा पराभव झाला. तर अकोटचे विद्यमान आमदार प्रकाश भारसाकळे व माजी नगराध्यक्ष नलिनी भारसाकळे यांना केवळ ४८४० मते मिळाली असून त्यांचा दारुण पराभव झाला आहे. भाजपाचे ४ नगरसेवक निवडून आले आहेत. शिंदे शिवसेनेचे २ तर राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) १, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) १ जागेवर समाधान मानावे लागले आहे. मागिल पंचवार्षिक मध्ये सत्तेची सूत्रे भाजपाकडे होती.यंदा मात्र दर्यापूरच्या मतदारांनी नगर परिषदेत परिवर्तन घडून आणले आहे.

नगराध्यक्ष पदासाठी ७ उमेदवार रिंगणात होते. तर नगरसेवकाच्या २५ जागांसाठी १२९ उमेदवार निवडणूक रिंगणात होते. ७ व्या फेरी अखेर निवडणूक निर्णय अधिकारी दादासाहेब दराडे यांनी मंदाकिनी भारसाकळे यांना नगराध्यक्ष पदी विजयी घोषित केले. दरम्यान नगराध्यक्षांसह, विजयी नगरसेवकांना प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले. यावेळी खासदार बळवंत वानखडे, काँग्रेस तालुका अध्यक्ष सुधाकर भारसाकळे सह काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## चांदुर रेल्वे नगराध्यक्षपदी वंचित

विश्वकर्मा यांना ४३१७ मते प्राप्त होऊन त्या विजयी झाल्या. प्रभाग क्र १ मधून भाजपचे बच्चू वानरे व शालिनी राऊत हे विजयी झाले. प्रभाग क्र २ मधून भाजपचे प्रावीन्य देशमुख व वंदना हजारे, प्रभाग क्र ३ मधून भाजपचे अनील मोटवानी तर काँग्रेसच्या ॲड. कीर्ती इमले, प्रभाग क्र ४मधून आपलं चांदुर पॅनलचे हर्षल वाघ तर भाजपच्या दुर्गा भूत, प्रभाग क्र. ५ मधून दोन्ही काँग्रेसचे अनिस सौदागर व पूनम कोकाटे, प्रभाग क्र ६मधून दोन्ही भाजपचे गजानन ठाकरे व आचल प्रधान, प्रभाग क्र ७ मधून भाकपचे सुमेध सरदार व अपक्ष प्रियंका वरठे, प्रभाग क्र ८मधून दोन्ही भाजप निलेश उर्फ पप्पू भालेराव व ममता राय, प्रभाग क्र ९मधून दोन्ही वंचित बहुजन आघाडी (आपलं चांदुर) चे अरिहंत गेडाम व निलोफर आसिफ शेख, प्रभाग क्र १०मधून भाजपचे अंकित कदम व काँग्रेसच्या कल्पना लांजेवार हे विजयी झाले.

## अंजनगाव सुर्जीमध्ये नगराध्यक्ष

प्रमाणे मते मिळाली. सुनील रूपराव जवंजाळ - अपक्ष २२५ मते, डॉ. स्पृहा अनुल डकरे - (शिवसेना शिंदे गट) ५५९४ मते, विनीत डिगांबर डोंगरदीवे एमआयएम १७०६ मते, आकाश सहदेव राऊत ( वंचीत बहु. आघाडी) २७३ मते,यश गजानन लवटे( उबाठा) ६१३२ अशाप्रकारे मते घेऊन पराभूत झाले.

निवडणुकीचे कामकाज निवडणूक निर्णय अधिकारी राजेश्वर हांडे तसेच सहा. निवडणूक अधिकारी विजय लोहकरे, तहसिलदार पुष्पाताई सोळंके यांनी कामकाज पाहिले.

अंजनगाव सुर्जी नगरपरिषद निवडणुकीमध्ये प्रभाग निहाय विजयी नगरसेवक उमेदवार

प्रभाग क्र १ अ पुनम सुरज येऊल शिवसेना शिंदेगट
ब उमेश तुळशीराम भोंडे भाजप
प्रभाग २ अ सुयोग खाडे उबाठा
ब रूपाली सुधीर देवगिरे उबाठा
प्रभाग ३ अ उमा राजेश ओळंबे भाजपा
ब प्रविण देविदास नेमाडे भाजपा
प्रभाग ४ अ प्रियंका निलेश आवंडकर शिंदेगट शिवसेना
ब मो. आशिक मो.शरिफ काँग्रेस
प्रभाग ५ अ रामण्य रविंद्र आवंडकर शिवसेना शिंदे गट
ब शाहीन परवीन मुजम्मील अली कांग्रेस
प्रभाग ६ अ. नसीमा बी रहीम शाह काँग्रेस
ब शोहेब खान युसुफ खान. काँग्रेस
प्रभाग ७ अ. सीमा गजानन विजेवर उबाठा
ब. मो. रेहान अब्दुल रेहान उबाठा
प्रभाग ८ अ श्रीकांत मोहनराव जुनगरे. उबाठा.
ब सुनिता भास्कर बाळे. उबाठा
प्रभाग ९ अ. उज्वला विलास कविटकर भाजपा
ब. मनिष काशिनाथ मेन. भाजपा
प्रभाग १० अ. आयशा परविन अकबर शहा अपक्ष
ब. नाजिया बानो मो.इरफान कांग्रेस
प्रभाग ११ अ. मो. आसिफ मो. ताज कांग्रेस
ब.आफरिन कौसर अ. नईम
प्रभाग १२ अ. योगिता प्रदीप देशमुख कांग्रेस
ब. मो. नाजिम मो. अय्युब कांग्रेस
प्रभाग १३ अ आबेदा बी. मो. आरिफ समाजवादी पार्टी
ब. इब्राहिम बेग हसन बेग समाजवादी पार्टी
प्रभाग १४ अ. अविनाश ढेंगे. उबाठा
ब प्रियंका शंकरदादा मालठाणे. भाजप यांचा समावेश आहे.

**फेर मतमोजणीची मागणी-** नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीत केवळ १२४ मतांनी पराभव झालेल्या राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे उमेदवार आयेशा बानो रशीद खा यांनी निवडणूक अधिकाऱ्यांकडे फेर मतमोजणीचा अर्ज केला. फेर मतमोजणी करिता अंजनगाव नगरपालिकेमध्ये खासदार बळवंत वानखडे , माजी पालकमंत्री यशोमती ठाकूर,बाळासाहेब हिंगणीकर ठाण मांडून बसले होते. फेरमतमोजणीची मागणी फेटाळण्यात आल्याचे समजते. यावेळी मोठा तणाव नगरपालिकेजवळ झाला असल्याने पोलिसांनी अतिरिक्त कुमक बोलाविले होते. यादरम्यान निवडणूक अधिकाऱ्यांनी भारतीय जनता पार्टीचे उमेदवार यांना अंजनगाव नगरपालिकेच्या नगराध्यक्षपदी निवडून आल्याबद्दल चे प्रमाणपत्र अविनाश गायगोले यांना दिले. त्यामुळे नगरपालिकेसमोर भा ज पा. मोठ्या संख्येने जमा झालेले कार्यकर्ते परत निघून गेले.

## अचलपूर नगराध्यक्ष पदी भाजप

स्वाभिमान पार्टीचे ही उमेदवार काही प्रभागात उभे असल्याने अनेक उमेदवारांचा निसटता पराभव झाला. यामध्ये भारतीय जनता पक्षाचे शहराध्यक्ष कुंदन यादव यांचाही पराभव झालेला आहे. तसेच अनेक ठिकाणी उमेदवारांची गर्दी जास्त असल्याने कमी मतांनी सुद्धा अनेकांचा पराभव झालेला आहे. यामुळे विजय झालेल्या उमेदवारांमध्ये आनंदाचे वातावरण पाहायला मिळाले तर काही मतांनीच पराभव झालेल्या उमेदवारांच्या समर्थकांमध्ये नाराजीचा सुरू उमटत होता.अचलपूर नगरपरिषद नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीमध्ये पहिल्या फेरीपासून भारतीय जनता पक्षाच्या उमेदवार म्हणून रुपाली अभय माथने यांनी लीड घेतलेली होती. आणि त्यांना एकूण वीस फेरीमध्ये ३२ हजार ४७१ मत प्राप्त झालेले आहे. तर दुसऱ्या क्रमांकावर एमआयएमचे शबाना बानो गुल हुसेन यांना १८,४४१ मत प्राप्त झालेले आहे तिसऱ्या क्रमांकावर काँग्रेस पक्षाचे नूर सबहा एहतेश्याम नबील यांना ११,९४७ मत प्राप्त झालेले आहे .त्यानंतर शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार म्हणून रेखा गड्रेल यांना १७५२, शिवसेना उ . बा . ठा गटाचे अधिकृत उमेदवार राधिका घोटकर यांना १३८० मत, प्रहार जनशक्ती पक्षाचे उमेदवार म्हणून सारिका पिंपळे यांना २७७५ मत ,अपक्ष उमेदवार पर्वणी सुनील बावणे यांना ४३१ मत आणि नोटा ४०१ असे एकूण ६९ हजार ५९८ मताची मोजणी करण्यात आली. भारतीय जनता पक्षाचे उमेदवार रुपाली अभय माथने यांची जनतेनी मोठ्या मताधिक्याने निवड केल्याने जुळ्या शहरात आनंदाचे वातावरण पाहायला मिळत आहे. समर्थकांनी ढोल ताशे , फटाक्याचे आतिशबाजी करून पेढे वाटप करून आनंद साजरा केला आहे. यावेळी अचलपूर येथील कल्याण मंडपम मध्ये निवडणूक निर्णय अधिकारी बळवंत अरखराव यांच्याकडून प्रमाणपत्र घेण्यासाठी भारतीय जनता पक्षाच्या नवनियुक्त नगराध्यक्ष रुपाली माथने यांच्यासह भारतीय जनता पक्षाचे आमदार प्रवीण पोटे पाटील, अचलपूर मतदार संघाचे आमदार प्रवीण तायडे, तिवसा आमदार राजेश वानखडे, भाजपाचे जिल्हा सरचिटणीस सुधीर रसे ,नितीन गूळदे ,तुषार खेरडे, युवा स्वाभिमान पार्टीचे बंटी केजडीवाल,छोटू लाडोळे आदी उपस्थित होते. आज सकाळी कल्याण मंडपम मध्ये दहा वाजता मतमोजणीला प्रारंभ झाला. यामध्ये एकूण १२ टेबल होते तर वीस फेऱ्यांमधून मतमोजणी करण्यात आली .यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून अचलपूर उपविभागीय अधिकारी बळवंत अरखराव,तहसीलदार संजय गरकल, अचलपूर नगर परिषदेचे प्रशासक धीरज कुमार गोहाड यांच्यासह अधिकारी -कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेतले .यावेळी कल्याण मंडपम मध्ये पोलिसांचा तगडा बंदोबस्त होता. यावेळी अचलपूर पोलीस उपविभागीय अधिकारी शुभम कुमार यांच्यासह परतवाडा, अचलपूर चे तिन्ही पोलीस स्टेशनचे अधिकारी - कर्मचारी सुद्धा उपस्थित होते .मतमोजणीचा निकाल जाहीर झाल्यानंतर विजय उमेदवारांच्या समर्थकांनी आनंदोत्सव साजरा केला . जुळ्या शहरातील २० प्रभागात दोन्ही शिवसेना पक्ष ,राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार गटाचे उमेदवार नगरसेवक पदासाठी रिंगणात होते. पण दोन्ही शिवसेना पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार गटाचे एकही उमेदवाराचा नगरसेवक पदासाठी जनतेनी कौल दिला नाही .अचलपूर नगर परिषदेचा नवनिर्वाचित नगराध्यक्ष रुपाली माथने या कल्याण मंडपम मध्ये दुचाकी वाहनावर आल्या .त्यांचा या साध्या राहणीमानाची चर्चा जुळ्या शहरात सुरू आहे . परतवाडा शहरातील कल्याण मनपा येथे आज मतमोजणी प्रक्रिया संपन्न झाली पण या प्रक्रियेमध्ये पत्रकार बांधवांना विविध समस्यांचा सामना करावा लागला. त्यांना मतमोजणीची माहिती मिळवण्यासाठी सुद्धा विविध समस्यांचा सामना करावा लागला व पिण्याचे पाणी, बसण्याची व्यवस्था व नाश्त्याची सुद्धा व्यवस्था करण्यात आलेली नव्हती .भारतीय जनता पक्षाचे शहराध्यक्ष म्हणून कुंदन यादव यांचाही प्रभाग क्रमांक चार मधून पराभव झालेला आहे. त्यांच्या विरोधात युवा स्वाभिमान पार्टीचे उमेदवार सुद्धा रिंगणात होते. यामुळे मत विभाजनाचा फटका बसून काँग्रेस पक्षाच्या उमेदवाराचा या प्रभागातून विजय झालेला आहे .प्रभाग क्रमांक १५ बुंदेलपुरा वार्डातून अपक्ष उमेदवार म्हणून ८ व्यांदा कल्लू महाराज दीक्षित यांचा विजय झालेला आहे .कल्लू महाराज दीक्षित यांनी नगरपालिका मध्ये नगराध्यक्षपद ही भूषवलेले आहे. त्यांचा तगडा जनसंपर्क,केलेली विकासकामे यामुळे त्यांना पुन्हा जनतेनी निवडून दिले आहे .प्रभाग क्रमांक १८ ब प्रहार चे संजय तट्टे हे रिंगणात होते. त्यांनी यापूर्वी सुद्धा नगरसेवक म्हणून नगर परिषदेत प्रतिनिधित्व केलेले आहे. त्यांचा मात्र २२ मतांनी पराभव झालेला आहे. त्यांना ६९१ मत ,काँग्रेस पक्षाचे उमेदवार यांना ७१३ मते मिळालेली आहे. २२ मतांनी त्यांचा पराभव झाल्यामुळे त्यांच्या समर्थकांनी दुबार मतमोजणीची मागणी केली होती

# जनमाध्यम

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ सोमवार, २२ डिसेंबर २०२५ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

एक प्रतिष्ठित सवय

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# मंगरुळपीर नगरपरिषदेत राष्ट्रवादी अजित पवार गटाची बाजी, नगराध्यक्षपदी अशोक परळीकर

**■ प्रतिनिधी | मंगरुळपीर ■**

**मंगरुळपीर नगरपरिषद निवडणुकीचे निकाल जाहीर झाले असून, या निकालांनी संपूर्ण तालुक्यातील राजकीय वातावरण ढवळून निघाले आहे. नगरपरिषदेत भाजपला सर्वाधिक नगरसेवक निवडून आणण्यात यश मिळाले असले, तरी नगराध्यक्ष पदावर राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) चे उमेदवार अशोक परळीकर यांनी ९०४४ मते घेत ४४९० मतांनी विजय मिळवला आहे. तर भाजपचे उमेदवार डॉ. दिलीप रत्नपारखी यांनी ४५५४ मते घेतली असुन त्यांचा ४४९० मतांनी पराभव स्वीकारावा लागला आहे.**



या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) चे माजी मंत्री सुभाष ठाकरे यांनी प्रभावी रणनीती राबवत नगरपालिकेवर आपला झेंडा रोवल्याचे स्पष्ट झाले आहे. नगराध्यक्ष पद राष्ट्रवादीकडे गेल्याने आगामी काळात मंगरुळपीर नगरपरिषदेतील सत्तासमीकरणे पूर्णतः बदलणार असल्याचे संकेत मिळत आहेत. नगरपरिषदेत एकूण नगरसेवकांच्या संख्येत भाजपने आघाडी घेत १० जागा मिळवल्या. मात्र राष्ट्रवादी अजित पवार गटाने ५ जागा मिळवत निर्णायक भूमिका

## संख्याबळ भाजपकडे, सत्ता राष्ट्रवादीकडे

बजावली. काँग्रेस, शिवसेना (शिंदे गट), श्घ्ष आणि अपक्ष उमेदवारांनीही निवडणुकीत आपली उपस्थिती दाखवली. अपक्ष नगरसेवकांची संख्या तीन असल्याने त्यांची भूमिकाही नगराध्यक्ष निवडीत निर्णायक ठरली आहे.

**नगराध्यक्षपदी अशोक परळीकर :** नगराध्यक्ष पदासाठी झालेल्या चुरशीच्या राजकीय हालचालींनंतर अशोक परळीकर यांची नगराध्यक्षपदी निवड झाली. त्यांच्या निवडीमुळे राष्ट्रवादी कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण असून, शहरात जल्लोष साजरा करण्यात आला. विजयाच्या आनंदात फटाके फोडून, मिठाई वाटप करण्यात आले.

**आगामी राजकीय घडामोडींकडे लक्ष :** या निकालांनंतर मंगरुळपीर नगरपरिषदेतील सत्तास्थापना, स्थायी समिती, विषय समित्यांची रचना तसेच विरोधकांची भूमिका याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. नगराध्यक्ष पद राष्ट्रवादीकडे गेल्याने आगामी काळात स्थानिक राजकारणात मोठ्या हालचाली होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

**नगरपरिषदेत पक्षनिहाय संख्याबळ :** भाजप – १० नगरसेवक राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) – ०५ नगरसेवक काँग्रेस – ०१ नगरसेवक MIM – ०१ नगरसेवक शिवसेना (शिंदे गट) – ०१ नगरसेवक अपक्ष – ०३ नगरसेवक.

**प्रभागनिहाय विजयी उमेदवार :** प्रभाग क्रमांक ०१ भाजपच्या लातबाई चितलांगे व अनिल गावंडे यांनी विजय मिळवला. प्रभाग क्रमांक ०२ अपक्ष फैसल खान शफी खान व राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या सायराबानो शब्बीर खान विजयी झाल्या. प्रभाग क्रमांक ०३ अपक्ष बिलाल अहमद अब्दुल अखिल व काँग्रेसच्या शबाना परविन मिर्झा अझहर यांनी यश संपादन केले. प्रभाग क्रमांक ०४ या प्रभागात राष्ट्रवादी अजित पवार गटाने वर्चस्व राखत शेरबानो मोहम्मद जमीर कुरेशी व नसीम परविन लतीफ खान या दोन्ही उमेदवारांना विजयी केले. प्रभाग क्रमांक ०५ MIM च्या साहेल खादीजा अब्दुल वाहिद तर अपक्ष फरहाना परविन आसिम खान विजयी झाल्या. प्रभाग क्रमांक ०६ शिवसेना शिंदे गटाच्या सपना गणेश बजाज व भाजपचे सुधीर घोडचर विजयी झाले. प्रभाग क्रमांक ०७ भाजपच्या प्रतिमा भोजने व विरेंद्रसिंह ठाकूर यांनी विजय मिळवला. प्रभाग क्रमांक ०८ राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या किरणताई अशोक परळीकर व भाजपचे श्रीहरी इंगोले विजयी झाले. प्रभाग क्रमांक ०९ या प्रभागात भाजपने आपले वर्चस्व राखत रुपाली मनोज खोडे व राजु नंदलाल जयस्वाल यांना विजयी केले. प्रभाग क्रमांक १० भाजपचे गणेश खोडे व आशाबाई पवार तसेच राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या वैशाली संदीप हरिहर विजयी झाल्या.

# वाशिम नगराध्यक्षपदी भाजपचे अनिल केंदळे विजयी



**■ प्रतिनिधी | वाशिम ■**

नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ साठीची मतमोजणी प्रक्रिया पूर्ण झाली असून नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीत भाजपचे उमेदवार अनिल केंदळे यांनी दणदणीत विजय मिळविला आहे. २० डिसेंबर रोजी झालेल्या मतदानानंतर २१ डिसेंबर रोजी मतमोजणी सुरू झाली होती. अखेरच्या फेरीनंतर निकाल स्पष्ट होताच शहरात राजकीय हालचालींना वेग आला.

भाजपचे अनिल केंदळे यांनी एकूण २३,९४२ मते मिळवली, तर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाच्या रेखाताई सुरेश मापारी यांना १५,९७३ मते मिळाली. यामुळे ७,९६९ मतांची भक्कम आघाडी घेत अनिल केंदळे यांनी नगराध्यक्ष पदावर विजय मिळविला. ही लढत सुरुवातीपासूनच चुरशीची असली तरी अंतिम टप्प्यात भाजपच्या उमेदवाराने स्पष्ट आघाडी घेतली. मागील दोन दिवसांपासून अंतिम निकालाकडे संपूर्ण वाशिम शहराचे लक्ष लागले होते. निकाल जाहीर होताच भाजप कार्यकर्त्यांनी जल्लोष केला, तर प्रतिस्पर्धी गटांमध्ये आत्मपरीक्षण सुरू झाले आहे.

नगरसेवक पदाच्या निकालातही राजकीय समीकरणे ठळकपणे समोर आली आहेत. भाजपचे १४ नगरसेवक निवडून आले असून, उबाठा गटाचे १३, एमआयएमचे २, काँग्रेसचे २, तर १ अपक्ष उमेदवार विजयी झाला आहे. त्यामुळे नगरपरिषदेत भाजपचे वर्चस्व स्पष्ट झाले आहे.

**पक्षीय बलाबल**

**भाजपा - १४**
**उबाठा - १३**
**एम.आय.एम. - २**
**काँग्रेस - २**
**अपक्ष- १**

या निवडणुकीत अनेक राजकीय दिग्गजांना पराभवाचा सामना करावा लागला. एक माजी उपाध्यक्ष व एका माजी उपाध्यक्षांची पत्नी, तीन माजी नगराध्यक्ष, तसेच एका माजी नगराध्यक्षांचे नातू व दुसऱ्या माजी नगराध्यक्षांचा मुलगा पराभूत झाले. याशिवाय माजी आमदार लखन मलिक यांचा मुलगा आणि माजी आमदार पुरुषोत्तम राजगुरू यांची पत्नी यांनाही पराभव पत्करावा लागला. या निकालामुळे वाशिमच्या राजकारणात मोठा बदल घडून आल्याचे चित्र स्पष्ट झाले असून, आगामी काळात नगरपरिषदेच्या कारभाराकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# मालेगाव नगर पंचायतीवर शिंदे सेनेचा वरचष्मा

## नगराध्यक्षपदी ओमप्रकाश मधुकर खुरसडे विजयी



**पक्षीय बलाबल : शिंदेसेना- ८ काँग्रेस- ६ भाजपा- ३ एकुण- १७**

**■ प्रतिनिधी | मालेगाव ■**

नगरपंचायत मालेगाव निवडणुकीचा निकाल २१ डिसेंम्बर रोजी जाहीर झाला असून तहसिल कार्यालयावर कार्यकर्त्यांनी सकाळ पासून च गर्दी केली होती. या मतमोजणीत नगराध्यक्ष ओमप्रकाश मधुकर खुरसडे (शिंदे सेना) यांचा विजय झालेला आहे .

**प्रभाग निहाय विजयी उमेदवार पुढील प्रमाणे आहेत :** प्रभाग क्रमांक १ - सौ.वनमाला प्रेमानंद डाखोरे (काँग्रेस), प्रभाग क्रमांक २- सौ.रज्जू गजानन काळे (शिंदे सेना), प्रभाग क्रमांक ३- सोनाजी रामेश्वर घुगे (शिंदेसेना), प्रभाग क्रमांक ४-शहा मरियमबी शाबीर शहा (काँग्रेस), प्रभाग क्रमांक ५-आजाद खान अजिज खान पठाण (शिंदे सेना), प्रभाग क्रमांक ६- सविता संजय सारडा ( शिंदे सेना) , प्रभाग क्रमांक ७- ज्योती सखाराम सौभागे (काँग्रेस) प्रभाग क्रमांक ८- इंदिराबाई कैलास गुजरे (शिंदे सेना), प्रभाग क्रमांक ९- विनोद माणिकराव बानाईतकर (भाजपा), प्रभाग क्रमांक १०- प्रियंका अभय घुगे (शिंदे सेना), प्रभाग क्रमांक ११- राधा महादेव खवले (शिंदे सेना ), प्रभाग क्रमांक १२- ज्ञानेश्वर रमेश काटेकर (भाजपा) , प्रभाग क्रमांक १३- राधा दयाराम गायकवाड (शिंदे सेना), प्रभाग क्रमांक १४-सलीमाबी हारून शेख (काँग्रेस), प्रभाग क्रमांक १५- संजय रामभाऊ बळी (भाजपा), प्रभाग क्रमांक १६- योगेश रामचंद्र बळी (काँग्रेस), प्रभाग क्रमांक १७- निलेश गोपाल मानधने (काँग्रेस) हे विजयी झालेले आहेत. पोलीस प्रशासनाने चोख बंदोबस्त केला होता . निकालाकरता महसुल विभाग नगरपंचायत विभाग च्या सर्व कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले. विजयी उमेदवाराला तहसीलदार दीपक पुंड नगरपंचायत मुख्याधिकारी पंकज सोनोणे यांनी प्रमाणपत्राचे वाटप केले.

## शिवाजी शिक्षण संस्थेचे स्वीकृत सदस्य ठोकळ यांचा सत्कार

**अकोला :** विदर्भात ख्यातनाम श्री शिवाजी शिक्षण संस्थेत कार्य करण्याची संधी मिळणे ही विजय ठोकळ यांच्या सेवाकार्याची पावती असल्याचे प्रतिपादन कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती शिरीष धोत्रे यांनी केले.

श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या स्वीकृत सदस्यपदी सेवाभावी विजय ठोकळ यांची नियुक्ती झाल्याबद्दल इंडियन रेडक्रॉस सोसायटीच्या वतीने आयोजित सत्कार कार्यक्रमात धोत्रे बोलत होते.विद्यार्थ्यां अभावी एकीकडे शाळा बंद पडत असतांना शिवाजी विद्यालयच्या मुख्य शाखेत विद्यार्थी संख्या ७०० वरून १३०० वर नेण्याच्या कार्याची ही पावती असावी असे नमूद करून आपण अधिक गती ने विद्यार्थी सेवा कार्य करू असा आशावाद मुख्याध्यापक ठोकळ यांनी यावेळी व्यक्त केला. आपल्या प्रास्ताविकात रेडक्रॉसचे चेअरमन डॉ किशोर मालोकर यांनी मनोगत व्यक्त केले.

# कारंजा नगर परिषदेवर एमआयएमची सत्ता

**■ प्रतिनिधी | कारंजा ■**

***कारंजा नगर परिषद निवडणुकीत ऐतिहासिक निकाल लागला असून एमआयएमच्या उमेदवार फ़रीदा बानो शफी पूंजानी यांनी १६८३२ मते भाजपच्या उमेदवार निशा गोलच्छा यांना १६७१५ मते व राष्ट्रवादी च्या नाजिया खान यांना ५६८० मते मिळाली. एम आय एमच्या फ़रीदा बानो पूंजानी यांनी भाजपाच्या निशा गोलच्छा यांचा ११७ मतांनी पराभव करत नगर परिषदवर एमआयएमची सत्ता मिळवली आहे.***

आज सकाळी १० वाजता मतमोजणीस प्रारंभ होऊन निवडणूक आयोगाच्या नियमानुसार शांततेत पार पडलेल्या मतमोजणीनंतर दुपारी ३ वाजेपर्यंत सर्व प्रभागांचे निकाल जाहीर करण्यात आले. निकाल जाहीर होताच शहरात एमआयएम कार्यकर्ते, पदाधिकारी व समर्थकांनी फटाके फोडून, घोषणाबाजी करत आनंदोत्सव साजरा केला.

## फ़रीदा बानो मो शफी पूंजानी यांचा निर्णायक विजय



**या निवडणुकीत नगर परिषदेत पक्षनिहाय संख्याबळ पुढीलप्रमाणे आहे :** एमआयएम १६, भाजप १३, राष्ट्रवादी काँग्रेस १, अपक्ष १ असून एमआयएमने सर्वाधिक जागा मिळाल्याने नगर परिषदेत सत्ता स्थापनेचा मार्ग मोकळा ठेवला आहे.

या निकालामुळे कारंजा शहराच्या राजकीय समीकरणात मोठा बदल झाला असून एमआयएमने प्रथमच नगर परिषदेत निर्णायक वर्चस्व मिळवले आहे. पूंजानी यांच्या विजयाला शहरातील विविध समाजघटकांकडून शुभेच्छांचा वर्षाव होत असून आगामी काळात शहराच्या विकासाकडे लक्ष दिले जाईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. दरम्यान, निवडणूक प्रक्रियेदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस प्रशासनाकडून चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. संपूर्ण प्रक्रिया शांततेत व सुरळीत पार पडली.

कारंजा नगरपालिकेच्या निवडणुकीत भाजपने अनपेक्षित राजकीय वाढ करीत शहराच्या राजकारणात आपले बळ ठामपणे सिद्ध केले आहे. मागील नगरपालिका निवडणुकीत भाजपाचे केवळ २ नगरसेवक निवडून आले होते, मात्र यावेळी आमदार सई ताई डहाके यांच्या अथक प्रयत्नांमुळे भाजपाचे तब्बल १३ नगरसेवक निवडून आले असून ही वाढ राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरली आहे. भाजपने संघटनात्मक बांधणी, मतदारांशी थेट संवाद आणि बूथ पातळीवरील नियोजनावर भर दिल्याचे निकालातून स्पष्ट झाले आहे.

# डव्हा येथे श्रीमद भागवत सप्ताहाची सांगता

**मालेगाव :** तालुक्यातील श्री क्षेत्र डव्हा येथील श्री माने नवले नाथ महाराज संस्थान डव्हा येथे प.पु. श्री अर्जुन बाबा यांच्या पुण्यतिथी निमित्त श्रीमद भागवत सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते, दिनांक १४ डिसेंबर ते २० डिसेंबर पर्यंत भागवत सप्ताहा मध्ये रोज रात्री सहा ते आठ कीर्तनाचा कार्यक्रम होता यामध्ये कीर्तनकार म्हणून ह भ प सानप महाराज पाळोदी, ह भ प गजानन महाराज गोटे, ह भ प सुरेश महाराज वाघ राजुरा, ह भ प गणेश महाराज वाझुळकर शेलगाव ओंकार गीर, ह भ प विजय महाराज सुळे करंजी, ह भ प सुभाष महाराज खरोळा, यांचे कीर्तन झाले असून शेवटी सांगता ह भ प गजानन महाराज वाजुळकर यांचे काल्याचे किर्तन २० डिसेंबरला झाले असून नंतर भव्य असा महाप्रसाद वाटप संस्थांच्या वतीने करण्यात आला या प्रसादाचा भागवत सप्ताह परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने घेतला परमपूज्य श्री अर्जुन बाबा, यांच्या पुण्यतिथी निमित्त भागवत सप्ताहाचे हे बारावे वर्ष असून या सप्ताह मध्ये भागवत वाचक म्हणून ह भ प गजानन महाराज वाझुळकर शेलगावकर हे असतात, तसेच ह भ प भागवत बळी महाराज यांच्या नेतृत्वात अडबंगनाथ ग्रंथाचे पारायण संपन्न झाले, दरवर्षी प्रमाणे याही वर्षी सर्व कार्यक्रमाचा



लाभ भावी भक्तांनी मोठ्या संख्येने घेतला असल्याची माहिती ट्रस्टचे उपाध्यक्ष क्षिरसागर चिवरा यांनी दिली

# रिसोड नगरपरिषदेत सत्ता परिवर्तन : माजी मंत्री अनंतराव देशमुख यांचा रिसोडवर करिष्मा कायम

## भाजपा- शिवसेना युतीचे भगवानराव क्षीरसागर विजयी

**■ प्रतिनिधी | रिसोड ■**

रिसोड नगरपरिषद निवडणुकीत भाजपा रिसोड मालेगाव विधानसभा निवडणूक प्रमुख नकुल देशमुख यांच्या नेतृत्वात भारतीय जनता पक्षाचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार भगवानराव क्षीरसागर यांनी विजय मिळवला या विजयामुळे रिसोड नगरपरिषद मध्ये अनंतराव देशमुख, नकुल देशमुख यांची नगरपरिषद निवडणुकीत कायम सत्ता आबाधीत ठेवली आहे. रिसोड नगरपरिषदेचा अस्तित्वापासून ते आतापर्यंतचा इतिहास बघता तुरळ दिवसच विरोधकांचे स्वतः राहिलेली आहे या नगर परिषदेवर कायम माजी मंत्री अनंतराव देशमुख भाजप नेते नकुल देशमुख यांची सत्ता राहिलेली आहे याही वेळी अनंतराव देशमुख नकुल देशमुख यांनी व्युह रचना करत नगराध्यक्ष पदासाठी भगवानराव क्षीरसागर यांची निवड करत त्यांचा भारतीय जनता पक्षात प्रवेश घेतला. सोबतच नगरसेवक पदासाठी प्रत्येक प्रभागांमध्ये जनतेशी कनेक्टेड आणि लोकप्रिय चेहरे दिले त्यामुळे निवडणुकीच्या सुरुवातीसच नकुल देशमुख आणि अनंतराव देशमुख यांची ही चाणक्य नीति आघाडी घेणारी ठरली त्यानंतर माजी मंत्री अनंतराव देशमुख, भाजपा रिसोड मालेगाव विधानसभा निवडणूक प्रमुख नकुल देशमुख, भाजपा नेत्या अमृता देशमुख यांनी शिस्तबद्धरीत्या प्रत्येक प्रभागातील आणि शहरातील मतदारापर्यंत पोहोचत डोर टू डोअर प्रचार केला. सोबतच भारतीय जनता पक्षाच्या राज्याचे नेतृत्व मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनात इतिहासात प्रथमता रिसोड नगर परिषदेत भाजपने सत्ता काबीज केली.



**रिसोड नगर परिषद अस्तित्वापासून पहिल्यांदाच रिसोड वर भाजपाची सत्ता :** रिसोड नगरपरिषद अस्तित्वात आली तेव्हापासून ते आत्तापर्यंत अनंतराव देशमुख यांचे नगर परिषदेवर वर्चस्व राहिलेले आहे अनंतराव देशमुख नकुल देशमुख यांनी भाजप पक्ष प्रवेश केल्यानंतर इतिहासात पहिल्यांदा रिसोड नगरपरिषदेत भारतीय जनता पक्षांनी सत्ता काबीज केली आहे.

ङनकुल देशमुख ठरले मॅनेजमेंट गुरुङ

भाजपा रिसोड मालेगाव विधानसभेचे निवडणूक प्रमुख नकुल देशमुख यांनी सुरुवातीपासूनच निवडणुकीचे सूत्र हातात घेतली होती नगराध्यक्ष उमेदवार नगरसेवक पदाचे उमेदवार निवडीपासून त्यांनी पुढाकार घेत जनतेतील उमेदवार दिले. सोबतच शिस्तबद्ध प्रचार यंत्रणा, सोशल मीडिया याचा यशस्वी व्यवस्थापन करत निवडणुकीत विजय संपादन केला.

**मास्टर माईंड ठरल्या अमृताताई देशमुख :** रिसोड नगरपरिषद निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने इतिहासात पहिल्यांदा सत्ता मिळवत विजय संपादन केला यामध्ये अनंतराव देशमुख यांनी रिसोडमध्ये ३५ वर्षापासून रिसोड वर्चस्व आबादी ठेवले यामध्ये भाजपा नेत्या अमृताताई देशमुख यांनी मास्टर माइंड ची भूमिका निभावली अतिशय मायक्रो प्लॅनिंग, पदाधिकारी कार्यकर्ते यांना अतिशय शिस्तबदरीत्या नियोजन त्यांनी दिले. सोबतच प्रचार यंत्रणा कशी असावी, प्रत्येक प्रभागांमध्ये मतांचे गणित काय या सर्व बाबींचा विचार करून आणि वेळोवेळी बदलणारी गणिते आणि त्यावर अचूक उपाय योजना भाजप नेत्या अमृताताई देशमुख यांनी केल्या त्यामुळे रिसोड नगरपरिषद निवडणुकीत भाजपा नेत्या अमृताताई देशमुख मास्टर माईंड ठरल्या आहेत.



# भाजपाने ईव्हीएमची मशीन विधानसभेसारखीच सेट केली

**संजय राऊत यांची टीका**

**मुंबई-** राज्यातील २८८ नगरपालिका आणि नगरपरिषद निवडणुकींचा निकाल लागत आहे. या निवडणुकीत महायुतीचा मोठा विजय झाल्याचे दिसून येत आहे. तब्बल २०० हून अधिक नगरपालिकांवर महायुतीला विजय मिळाला असून भाजपाने १०० हून अधिक नगरपालिका आणि नगरपरिषदा आपल्या ताब्यात घेतल्या आहेत. या निकालावरून शिवसेनेचे (ठाकरे) नेते संजय राऊत यांनी जोरदार टीका केली आहे. भाजपाने विधानसभेला सेट केलेल्या ईव्हीएम मशीनने त्याचप्रकारचे निकाल दिले असल्याचे ते म्हणाले.

उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्या बैठकीनंतर माध्यमांशी बोलताना संजय राऊत म्हणाले, 'विधानसभेचे आकडे पाहिले तर आज नगरपालिकेचे निकालही त्याचप्रकारे लागलेले दिसतात. मशीन त्याचप्रकारे सेट असल्याचे दिसते. भाजपा १२५, एकनाथ शिंदे ५९ आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाला ४० – ४२ जागा मिळाल्या आहेत. त्याच मशीन, तिच सेटिंग आणि तोच पैसा यांचा हा निकाल आहे.

'या निवडणुकीत पैशांची गारपिट झाली. या गारपिटीत कोण टिकणार? आमच्यासारखे शेतही त्यात झोपले गेले. ३० कोटी बजेट असलेल्या नगरपालिका जिंकण्यासाठी भाजपा आणि शिंदेंनी १५० कोटी खर्च केले. नगरपालिका निवडणुकीत आतापर्यंत कुणीही प्रचारासाठी चार्टर्ड प्लेन वापरले नव्हते. आम्ही कार्यकर्त्यांवर निवडणुका सोडल्या होत्या. पण इथे स्पर्धा सत्तेतील तीन पक्षातच होती. त्यामुळे पैशांचा प्रचंड धुरळा उडाला', असेही संजय राऊत म्हणाले.

मुंबई महानगरपालिका निवडणुकीसाठी उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे या दोन्ही नेत्यांची चर्चा झाली असून जागावाटप ठरले आहे. कुणी कुठे लढायचे, हेदेखील ठरलेले आहे. ज्या काही अडचणी होत्या, त्यात स्वतः उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांनी लक्ष घालून त्या दूर केल्या. सर्व कार्यकर्त्यांचे समाधान होईल, याची काळजी घेतली. तरीही युतीमध्ये काही गोष्टी कटुतेने सोडवायच्या असतात. कार्यकर्त्यांच्या भावनांचा मान राखायचा असतो. त्यामध्ये आम्ही यशस्वी झालो, असे आम्हाला वाटते, असेही संजय राऊत म्हणाले.काँग्रेसने स्वबळावर मनपा निवडणूक लढण्याचा निर्णय घेतला आहे. यावर बोलताना संजय राऊत म्हणाले, काँग्रेसशी चर्चा करण्याचा आमचा शेवटपर्यंत नक्कीच प्रयत्न राहिल. काँग्रेस हा महाविकास आघाडीतील प्रमुख पक्ष आहे. काँग्रेसची स्वतःची मतपेटी आहे. आमच्या इंडिया आघाडीतील तो एकमेव राष्ट्रीय पक्ष आहे. राज ठाकरे यांच्याबाबत त्यांच्या काही भूमिका आहेत. भाजपाचा पराभव करण्यासाठी आपल्याला सर्व घटक घ्यावे लागतील. हे काँग्रेसच्या दिल्लीतील नेत्यांशी ही बोललो. काँग्रेसचे मन वळविण्याचा प्रयत्न सुरू आहे.

## डॉ. मैथिली तांबे ठरल्या महाराष्ट्रात सर्वाधिक मतांनी निवडून येणाऱ्या नगराध्यक्षा



**संगमनेर -** गेल्या चाळीस वर्षांतील सर्वात अटीतटीची आणि हाय-व्होल्टेज ठरलेली संगमनेर नगरपरिषदेची निवडणूक तांबे-थोरात परिवाराने एकतर्फी जिंकली आहे. संपूर्ण राज्याचे लक्ष लागलेल्या या लढाईत डॉ. मैथिली सत्यजित तांबे यांनी विरोधकांना पराभूत करत नगराध्यक्षपदावर नाव कोरले आहे. महत्त्वाचे म्हणजे तब्बल १६,६४४ मतांचे मताधिक्य घेत त्यांनी महाराष्ट्रात सर्वाधिक फरकाने विजयी होण्याचा मान मिळवला आहे.केवळ नगराध्यक्षपदच नव्हे, तर नगरसेवक पदाच्या निवडणुकीतही 'संगमनेर सेवा समिती'ने विरोधकांचा सुपडा साफ केला आहे. एकूण ३० जागांपैकी २७ जागांवर समितीचे उमेदवार विजयी झाले असून, विरोधकांना केवळ नावापुरत्या जागांवर समाधान मानावे लागले. यामध्ये शिवसेनेचा १ आणि २ अपक्ष उमेदवारांचा समावेश आहे.ही निवडणूक तांबे-थोरात विरुद्ध खताळ-विखे अशा मोठ्या संघर्षात रूपांतरित झाली होती.

महायुतीच्या उमेदवार सुवर्णा खताळ यांच्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुजय विखे पाटील यांनी मोठी ताकद लावली होती. मात्र, संगमनेरच्या मतदारांनी आमदार बाळासाहेब थोरात आणि सत्यजित तांबे यांच्या नेतृत्वावर पुन्हा एकदा विश्वास दाखवला.

# भाजपाला एका वर्षात ३,११२ कोटींची देणगी

## निवडणूक रोखे रद्द झाल्यानंतर देणग्यांमध्ये तिप्पट वाढ

**मुंबई -** सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक रोखे योजना रद्द केल्याच्या एक वर्षानंतर, एक धक्कादायक आकडेवारी समोर आली आहे. कॉर्पोरेट ट्रस्टने राजकीय पक्षांना मोठ्या प्रमाणात देणग्या दिल्या आहेत. न्यायालयाने निवडणूक रोखे योजना रद्द केल्यानंतर, राजकीय पक्षांना पहिल्याच आर्थिक वर्षात भरपूर पैसे मिळाले आहेत. २०२४-२५ या आर्थिक वर्षात, नऊ निवडणूक ट्रस्टनी विविध राजकीय पक्षांना एकूण ३,८११ कोटी रुपयांचे देणगी दिली आहे. भाजपाला याचा सर्वात मोठा फायदा झाला आहे. काँग्रेसलाही कोट्यवधी रुपयांच्या देणग्या मिळाल्या आहेत.

सर्वोच्च न्यायालयाने इलेक्टोरल बाँड्स (निवडणूक रोखे) द्वारे दिली जाणारी निनावी राजकीय देणगी योजना रद्द केल्यानंतर पहिल्याच आर्थिक वर्षात नऊ 'इलेक्टोरल ट्रस्ट'नी २०२४-२५ मध्ये राजकीय पक्षांना एकूण ३,८११ कोटी रुपयांच्या देणग्या दिल्या आहेत. केंद्रातील सत्ताधारी भारतीय जनता पक्षाला (भाजपा) यापैकी ३,११२ कोटी रुपये मिळाले आहेत. भारतीय निवडणूक आयोगाकडे विविध ट्रस्टनी सादर केलेल्या अहवालानुसार, काँग्रेसला या देणग्यांपैकी ८ टक्क्यांहून कमी म्हणजेच २९९ कोटी रुपये मिळाले आहेत. उर्वरित ४०० कोटी रुपये इतर सर्व पक्षांना मिळाले आहेत. राजकीय पक्षांना मिळालेल्या एकूण देणग्यांचा आकडा यापेक्षा जास्त असू शकतो, कारण- इलेक्टोरल ट्रस्ट हा निधी मिळवण्याचा एक प्रमुख मार्ग असला तरी तो एकमेव मार्ग नाही.



शनिवार, २० डिसेंबरपर्यंत नोंदणीकृत १९ ट्रस्टपैकी १३ ट्रस्टचे अहवाल उपलब्ध झाले आहेत. त्यापैकी नऊ ट्रस्टनी पक्षांना ३,८११ कोटी रुपयांची मदत दिल्याचे जाहीर केले आहे. २०२३-२४ मधील १,२१८ कोटी रुपयांच्या तुलनेत यामध्ये २०० टक्क्यांहून अधिक वाढ झाली आहे. दरम्यान, जनहित, परिवर्तन, जयहिंद आणि जयभारत या चार ट्रस्टनी २०२४-२५ मध्ये 'शून्य' मदत दिल्याचे जाहीर केले आहे.

# शिंदे गटाने भिवंडीतून २०८ बोगस मतदार आणले

## भाजप - काँग्रेसने दिले पुरावे; पोलिसांचा कसून तपास

**मुंबई -** शिंदे गटाने २०८ बोगस मतदार भिवंडीतून आणल्याचा आरोप भाजप आणि काँग्रेसने केला आहे. कोहोज गाव परिसरातील एका सभागृहात शेकडो महिला व पुरुष जमले होते. भाजप आणि काँग्रेसच्या तक्रारीनंतर पोलिसांनी कोहोज गावात जाऊन या २०८ जणांना ताब्यात घेतले. हे लोक स्थानिक नाहीत बाहेरून आलेले आहेत, इतक्या मोठ्या प्रमाणावर ते येथे का आले याचा आम्ही तपास करीत आहोत अशी माहिती अंबरनाथ पूर्व पोलीस ठाण्याच्या अधिकाऱ्यांनी दिली.



निवडणुकीची वेळ संपायला आली की या २०८ बोगस मतदारांना रांगेत घुसवून त्यांच्याकडून बोगस वोटिंग करवून घ्यायचे हा शिंदे गटाचा ॲक्शन प्लॅन असल्याचा आरोप भाजपचे गुलाबराव करंजुले यांनी केला. बुवापाडा येथील काँग्रेसचे उमेदवार प्रकाश पाटील यांनीही शिंदे गटाने मोठ्या प्रमाणावर बाहेरून बोगस मतदार आणले आहेत, त्यांच्यावर तत्काळ कारवाई करा अशी मागणी केली.पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन या सर्व महिला, पुरुष आणि मुलांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडील आधारकार्डावर भिवंडीचा पत्ता असल्याचे त्यांना आढळले. फिरत्या तपास पथकाकडून त्याचा तपास सुरू आहे.

लवकरच या प्रकरणाची माहिती समोर येईल असे अंबरनाथ पोलिसांनी सांगितले.

# पत्नीला घरखर्चाचा हिशेब ठेवण्यास सांगणे क्रूरता नाही

## सुप्रीम कोर्टाची महत्वपूर्ण टिप्पणी

**मुंबई -** पतीने आपल्या पत्नीला घरखर्चाचा हिशोब ठेवायला सांगणे म्हणजे क्रूरता ठरत नाही, अशी महत्त्वपूर्ण टिप्पणी सुप्रीम कोर्टाने केली. पत्नीने पतीविरोधात दाखल केलेली याचिकासुद्धा सुप्रीम कोर्टाने फेटाळून लावली.

न्यायाधीश बी. व्ही. नागरत्ना आणि न्यायाधीश आर. महादेवन यांच्या खंडपीठाने यावर सुनावणी करताना म्हटले की, एखाद्या पुरुषाने त्याच्या पत्नीला घरातील सर्व झालेल्या खर्चाचा हिशोब ठेवण्यासाठी ॲक्सेल शीट बनवायला लावणे म्हणजे पतीने पत्नीविरोधात क्रूरता केली आहे, असे मानले जाऊ शकत नाही. बरेज पुरुष आर्थिक कारणांवरून पत्नीवर वर्चस्व ठेवण्याचा प्रयत्न करत असतात, परंतु पतीच्या आर्थिक वर्चस्वाचा पत्नीचा आरोप क्रूरता असू शकत नाही. तसेच हे फौजदारी कारवाई करण्याइतपत ठोस कारण असूच शकत नाही, असे कोर्टाने नमूद केले. वैवाहिक आयुष्य जगताना पती आणि पत्नीमध्ये अनेकदा खटके उडत असतात. म्हणून त्याला क्रूरता म्हणता येत नाही, असेही कोर्टाने म्हटले.



# देशात पाच हजार शाळांमध्ये शून्य विद्यार्थी, सरकारी शाळांचे भीषण वास्तव

**नवी दिल्ली -** देशातील सरकारी शिक्षण व्यवस्थेतील गंभीर वास्तव संसदेत सादर झालेल्या ताज्या आकडेवारीतून समोर आले आहे. २०२४–२५ या शैक्षणिक वर्षात देशातील ५,१४९ सरकारी शाळांमध्ये एकाही विद्यार्थ्याची नोंद नसल्याचे सरकारने स्पष्ट केले आहे. या शाळा कागदोपत्री अस्तित्वात असल्या तरी प्रत्यक्षात त्या पूर्णपणे रिकाम्या असल्याचे चित्र आहे.

इंडिया टुडेने याबाबत वृत्त दिले आहे. देशात सध्या १०.१३ लाख सरकारी शाळा कार्यरत आहेत. मात्र त्यापैकी हजारो शाळांमध्ये विद्यार्थीच नसणे ही बाब केवळ प्रशासकीय अडचण नसून, संपूर्ण यंत्रणेतील विसंगती अधोरेखित करणारी आहे. विशेष म्हणजे, शून्य प्रवेश असलेल्या या शाळा देशभर समान प्रमाणात पसरलेल्या नसून त्या काही ठरावीक राज्यांमध्येच एकवटल्या आहेत.



उपलब्ध आकडेवारीनुसार, शून्य प्रवेश असलेल्या सुमारे ७० टक्के सरकारी शाळा तेलंगणा आणि पश्चिम बंगाल या दोन राज्यांमध्ये आहेत. २०२४–२५ मध्ये शून्य विद्यार्थी असलेल्या ५,१४९ शाळांपैकी सुमारे ३,६०० ते ३,७०० शाळा केवळ या दोन राज्यांमध्ये आहेत. जिल्हा पातळीवर पाहिले असता, देशातील सुमारे १०० जिल्ह्यांमध्ये किमान १० सरकारी शाळा अशा आहेत जिथे एकही विद्यार्थी नाही. यामध्ये तेलंगणाचे सर्व ३३ जिल्हे आणि पश्चिम बंगालमधील २३ पैकी २२ जिल्हे समाविष्ट आहेत.

ही समस्या केवळ शून्य प्रवेशापुरती मर्यादित नाही. २०२४–२५ मध्ये देशभरात ६५,०५४ सरकारी शाळांमध्ये १० पेक्षा कमी विद्यार्थी आहेत. या शाळांमध्ये सुमारे १.४४ लाख शिक्षक नियुक्त असूनही वर्गखोल्या रिकाम्याच असल्याचे दिसून येते. २०२२–२३ मध्ये शून्य किंवा अत्यल्प प्रवेश असलेल्या शाळांची संख्या ५२,३०९ होती, ती दोन वर्षांत २४ टक्क्यांनी वाढून ६५,०५४ वर पोहोचली आहे.

राज्यानुसार पाहिले असता, पश्चिम बंगालमध्ये सर्वाधिक ६,७०३ सरकारी शाळांमध्ये १० पेक्षा कमी किंवा शून्य विद्यार्थी आहेत. या शाळांमध्ये २७,३४८ शिक्षक नियुक्त आहेत. राज्यातील सरकारी शाळांची संख्या घटत असतानाही बहुतेक जिल्ह्यांमध्ये शून्य प्रवेश असलेल्या शाळा कायम असल्याचे चित्र आहे.

उत्तर प्रदेशमध्ये १० पेक्षा कमी किंवा शून्य प्रवेश असलेल्या ६,५६१ सरकारी शाळा असून त्याठिकाणी २२,१६६ शिक्षक कार्यरत आहेत.

देशातील सर्वाधिक, म्हणजे १.३७ लाख सरकारी शाळा उत्तर प्रदेशात आहेत. मात्र लोकसंख्येतील बदल आणि स्थलांतरानुसार शाळांचे पुनर्रचना न झाल्याने अनेक ठिकाणी शाळा गरजेपेक्षा अधिक राहिल्या आहेत.

महाराष्ट्रातही अशीच स्थिती दिसून येते. राज्यातील ६,५५२ सरकारी शाळांमध्ये १० पेक्षा कमी किंवा शून्य विद्यार्थी असून ११,०५६ शिक्षक नियुक्त आहेत. आदिवासी व ग्रामीण भागातून होणारे स्थलांतर आणि काही भागांतील शाळांचे अनावश्यक जाळे यामुळे अनेक शाळा रिकाम्या पडल्याचे स्पष्ट होत आहे.

या आकडेवारीमुळे सरकारी शिक्षणव्यवस्थेतील नियोजन, गुणवत्ता आणि प्रशासन यांवर गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. शाळा अस्तित्वात असूनही विद्यार्थ्यांचा अभाव राहणे ही बाब पुढील शैक्षणिक धोरणांसाठी मोठे आव्हान ठरणार असल्याचे चित्र आहे.

## महाराष्ट्रातील २४६ नगर परिषदांमधील नगराध्यक्ष

**राज्यातील २४६ नगरपरिषदांच्या नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीचे निकाल हाती आले आहेत. २४६ जागांसाठी झालेल्या निवडणुकीत भाजपने सर्वाधिक ठिकाणी विजय मिळवला आहे. यात दुसऱ्या क्रमांकावर शिंदेंची शिवसेना राहिली आहे. सर्वाधिक नगराध्यक्षपद निवडणूक जिंकलेल्या भाजप आणि दुसऱ्या क्रमांकावरील पक्षात भरपूर अंतर आहे.**



- महाराष्ट्रातील विजयी नगराध्यक्षांची
- चंदगड नगरपंचायत- सुनील कावनेकर (भाजप)
- अनगर नगरपंचायत- प्राजक्ता पाटील (भाजप)
- जामनेर नगरपरिषद- साधना महाजन (भाजप)
- दोंडाईचा नगरपरिषद- नयनकुमार रावल (भाजप)
- मेढा नगरपंचायत- रुपाली वारागडे (भाजप)
- करमाळा न.प.- मोहिनी संजय सावंत (करमाळा शहर विकास आघाडी)
- मलकापूर नगरपंचायत- रश्मी कोठावळे (जनसुराज्य शक्ती पक्ष)
- हातकणंगले न.पं.- अजितसिंह पाटील (शिवसेना शिंदे गट)
- औसा नगरपरिषद- परवीन नवाबुद्दीन शेख (अजित पवार गट)
- आटपाडी नगरपंचायत- यु.टी. जाधव (भाजप)
- उरण नगरपरिषद- भावना घाणेकर (शरद पवार गट)
- पन्हाळा नगरपरिषद- जयश्री पवार (जनसुराज्य शक्ती पक्ष)
- तळेगाव नगरपरिषद- संतोष दाभाडे (भाजप)
- मुखेड नगरपरिषद- बालाजी खतगावकर (शिंदे गट)
- अलिबाग नगरपरिषद- अक्षया नाईक (शेकाप)
- म्हसवड नगरपालिका- पूजा वीरकर (भाजप)
- फुलंब्री नगरपंचायत- राजेंद्र ठोंबरे (ठाकरे गट)
- गंगापूर नगरपंचायत- संजय जाधव (अजित पवार गट)
- अंबाजोगाई नगरपरिषद- नंदकिशोर मुंदडा
- कळमनुरी नगरपालिका- आश्लेषा चौधरी (शिंदे गट)
- वाई नगरपरिषद- अनिल सावंत (भाजप)
- जिंतूर नगरपरिषद- प्रताप देशमुख (भाजप)
- पालघर नगरपरिषद- उत्तम घरत (शिंदे गट)
- तासगाव न.प.- विजया पाटील (स्वाभिमानी विकास आघाडी)
- जेजुरी न.प.निवडणूक- जयदीप बारभाई (अजित पवार गट)
- उरूण ईश्वरपूर नगरपरिषद- आनंदराव मलगुंडे (शरद पवार गट)
- इंदापूर नगरपरिषद- भरत शाह (अजित पवार गट)
- मैंदर्गी नगरपरिषद- अंजली बाजारमठ (भाजप)
- मालवण नगरपरिषद - ममता वराडकर (शिंदे गट)
- पाचगणी नगरपालिका- दिलीप बगाडे (अजित पवार गट पुरस्कृत)
- सावंतवाडी नगरपरिषद- श्रद्धाराजे भोसले (भाजप)
- कणकवली नगरपरिषद- संदेश पारकर (शहरविकास आघाडी)
- गेवराई नगरपरिषद- गीता पवार (भाजप)
- भोर नगरपालिका- रामचंद्र आवारे (अजित पवार गट)
- गंगाखेड नगरपरिषद- उर्मिला केंद्रे (अजित पवार गट)
- देवळाली प्रवरा नगरपालिका- सत्यजित कदम (भाजप)
- अक्कलकोट नगरपरिषद- मिलन कल्याणशेट्टी (भाजप)
- रोहा नगरपालिका- वनश्री समीर शेडगे (अजित पवार गट)
- धामणगाव नगरपरिषद- डॉ. अर्चना रोठे (भाजप)
- विटा नगरपरिषद- काजल संजय म्हेत्रे (शिंदे गट)
- वडगांव मावळ न.पं.- अबोली ढोरे, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार
- पेण नगरपालिका- प्रीतम पाटील (भाजप)
- सासवड नगरपालिका- आनंदी जगताप (भाजप)
- मंगळवेढा नगरपालिका- सुनंदा बबनराव आवताडे (भाजप)
- तुळजापूर नगरपरिषद- पिंटू गांगणे (भाजप)
- चिपळूण नगरपरिषद- उमेश सकपाळ (शिंदे गट)
- खेड नगरपरिषद- माधवी बुटाला (शिवसेना)
- राजापूर नगरपरिषद- हुस्नबानू खलिपे (काँग्रेस)
- धर्माबाद न.पं.- संगीता बोलमवार (मराठवाडा जनहित पार्टी)
- बिलोली नगरपंचायत- संतोष कुलकर्णी (मराठवाडा जनहित पार्टी)
- कुंडलवाडी नगरपंचायत- कोटलवार (भाजप)
- डहाणू नगरपरिषद- राजेंद्र माच्छी (शिंदे गट)
- फुलंब्री नगरपंचायत - राजेंद्र ठोंबरे (ठाकरे गट)
- वैजापूर नगरपालिका- दिनेश परदेशी (भाजप)
- पैठण नगरपालिका- विद्या कावसानकर (शिंदे गट)
- सिल्लोड नगरपालिका- समीर सत्तार (शिंदे गट)
- कन्नड नगरपंचायत- शेखर फरीन बेगम (काँग्रेस)
- माथेरान नगरपालिका- चंद्रकांत चौधरी (शिंदे गट)
- बुलढाणा नगरपरिषद- पूजा संजय गायकवाड (शिंदे गट)
- चांदूर नगर परिषद- प्रियंका विश्वकर्मा (आपलं चांदूर पॅनेल)
- खुलताबाद नगरपरिषद- आमीर पटेल (काँग्रेस)
- महाबळेश्वर नगरपालिका- सुनील शिंदे (अजित पवार गट)
- अंबरनाथ नगरपालिका- तेजश्री करंजुले (भाजप-आघाडीवर)
- खोपोली नगरपालिका- कुलदीपक शेंडे (शिंदे गट)

## विखे-पाटलांच्या बालेकिल्ल्यात भाजपची मुसंडी

**अहिल्यानगर-** राज्याचे लक्ष लागून असलेल्या अहिल्यानगर जिल्ह्यातील १२ नगरपरिषदांच्या नगराध्यक्षपदाचे निकाल जाहीर झाले असून, जिल्ह्याच्या राजकारणात भाजपने आपले वर्चस्व पुन्हा एकदा सिद्ध केले आहे. जिल्ह्यातील एकूण १२ पैकी तब्बल ७ नगरपरिषदांच्या नगराध्यक्षपदावर भाजपने विजय मिळवला आहे. तर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेने २ ठिकाणी यश मिळवले आहे. दुसरीकडे, काँग्रेस आणि महाविकास आघाडीला प्रत्येकी एका जागेवर समाधान मानावे लागले आहे.अहिल्यानगर जिल्ह्यात महायुतीमधील भाजप, शिवसेना (शिंदे गट) आणि राष्ट्रवादी (अजित पवार गट) यांनी स्वतंत्रपणे निवडणुका लढवल्या होत्या.

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक २७ ■ सोमवार, २२ डिसेंबर २०२५ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


# सत्ता पक्ष जिंकला, पण पालकमंत्री हरले

## जनतेचा हिसका फुटला : भाजप दुसऱ्या क्रमांकावर फेकला

### -जनमाध्यम'चे भाकीत पुन्हा ठरले अचूक

**वर्धा जनमाध्यम :** वर्धा जनमाध्यमने 'भाजप जिंकेल, पण पालकमंत्री हरेल' असा दिलेला इशारा अखेर अक्षरशः खरा ठरला आहे. आज जाहीर झालेल्या निकालाने सत्ताधाऱ्यांच्या तोंडावर तमाचा बसला असून, भाजपला थेट दुसऱ्या क्रमांकावर समाधान मानावे लागले. हा निकाल केवळ निवडणुकीचा नसून, सत्तेच्या माजाविरोधातील जनतेचा रोखठोक निकाल आहे.

भाजपच्या नगराध्यक्षपदाच्या उमेदवार निलेश किटे यांना झालेला विरोध हा वरवरचा नव्हता. हा विरोध थेट पालकमंत्री पंकज भोयर यांच्या कारभाराविरोधातील होता. शहरात चर्चा होती उमेदवार कोण आहे यापेक्षा मागे सूत्रे कोण हलवत आहे हेच जनतेला नको होते. निकालातून हेच स्पष्ट झाले.



निलेश किटे हे पालकमंत्र्यांचे निकटवर्ती म्हणून ओळखले जात होते. सत्तेचा दबाव, अधिकाऱ्यांवर धाक अशी प्रतिमा तयार झाल्याने नागरिकांमध्ये प्रचंड असंतोष खदखदत होता. हे नगराध्यक्ष झाले असते, तर स्वतःला मंत्रीच समजले असते, अशी उघड चर्चा चौकाचौकात होती. अखेर नागरिकांनी मतदानातूनच त्यांना जागा दाखवली.

विशेष म्हणजे हा विरोध केवळ विरोधकांकडून नव्हता. भाजपचेच अनेक कार्यकर्ते आणि समर्पित मतदारांनी या वेळेस उघड बंड केले. पक्ष चालतो, पण माज चालत नाही, असा स्पष्ट संदेश मतपेटीतून दिला गेला. हा भाजपसाठी अंतर्गत धोक्याचा इशारा मानला जात आहे.या सगळ्या पार्श्वभूमीवर शहरातील मतदारांनी पर्याय निवडला आणि तो पर्याय ठरला शिवसेना. शिवसेनेचे उमेदवार रविकांत बालपांडे यांना व्यापक पाठिंबा मिळाला. हा विजय म्हणजे शिवसेनेपेक्षा अधिक सत्तेच्या अहंकाराविरोधातील जनतेचा उठाव आहे, अशीच भावना शहरात व्यक्त होत आहे.

**एकंदरीत काय** -हा निकाल म्हणजे पालकमंत्र्यांच्या कार्यशैलीवर जनतेने दिलेला थेट अविश्वास ठराव आहे. भाजपचे झेंडे उरले, पण नेतृत्वाचा पराभव झाला. आज पुन्हा एकदा ठामपणे सिद्ध झाले, भाजप जिंकला, पण पालकमंत्री हरले! जनमाध्यमच्या भाषेत सांगायचे तर, जनतेने सत्तेचा माज चिरडून टाकला.

**नगर परिषद,वर्धा**
**सुधीर पांगुळ,** नवनिर्वाचित अध्यक्ष (काँग्रेस)
-पक्षीय बलाबल
-भाजपा - २५
-काँग्रेस - ०५
-राष्ट्रवादी शरद पवार - ०५
-माकपा - ०१
-राष्ट्रवादी अजित पवार - ०२
-अपक्ष - ०२
-एकूण - ४०

# पराभूत आमदाराने जिल्हा जिंकला, पालकमंत्र्यांचा गड कोसळला

## -पुलगाव-देवळी-वर्धा काँग्रेसकडे; सत्ताधाऱ्यांना जनतेचा दणका

### -नगराध्यक्षपदासह नगरपालिकेवर काँग्रेसची ठाम सत्ता; भाजपच्या अहंकाराला पुलगावची करारी चपराक

**पुलगाव । जनमाध्यम :** जिल्ह्यातील राजकारणाला हादरवून सोडणारा निकाल पुलगाव नगरपालिकेतून बाहेर पडला आहे. पराभूत आमदाराने जिल्ह्यात वर्धा, पुलगाव आणि देवळी तीन नगराध्यक्ष निवडून आणत आपली पकड सिद्ध केली. पण सत्तेतील पालकमंत्र्यांना स्वतःचा गडही राखता आला नाही. हा विरोधाभास म्हणजे सत्ताधाऱ्यांसाठी इशारा आणि सांगली जिल्ह्यासाठी राजकीय शोकांतिका ठरत असल्याची तीव्र चर्चा सुरू आहे.

जनतेतून थेट निवड झालेल्या नगराध्यक्षपदाच्या लढतीत काँग्रेसच्या सौ. कविता सुनील ब्राह्मणकर यांनी भाजपच्या सौ. ममता नितीन बडगे यांचा १,७१५ मतांनी दणदणीत पराभव केला. पुलगावसारख्या भाजपच्या बालेकिल्ल्यात काँग्रेसचा तिरंगा फडकणे म्हणजे अहंकाराला बसलेला जोरदार धक्का असल्याचे राजकीय जाणकार सांगतात.

नगराध्यक्षपदासाठी झालेल्या थेट मतदानात कविता ब्राह्मणकर यांना ७,६१०, तर ममता बडगे यांना ५,८९५ मते मिळाली. देवळी-पुलगाव मतदारसंघात भाजपचे आमदार असतानाही आणि शहरात पक्षाची यंत्रणा सक्रिय असतानाही काँग्रेसने मिळवलेला हा विजय भाजपसाठी धोक्याची घंटा, तर काँग्रेससाठी राजकीय संजीवनी ठरला आहे. या निकालामुळे माजी आमदार रणजित कांबळे यांना मोठे बळ मिळाल्याचे स्पष्ट झाले.



नगरसेवक पदाच्या निवडणुकीतही काँग्रेसने बाजी मारत १० जागा जिंकल्या. भाजपला ८ जागांवर समाधान मानावे लागले, तर ३ जागांवर अपक्षांनी विजय मिळवत सत्ताकारणाचे गणित बदलले. स्पष्ट बहुमताच्या दिशेने काँग्रेसने टाकलेले हे पाऊल आगामी स्थानिक राजकारणाची दिशा ठरवणारे ठरणार आहे.

प्रभागनिहाय निकाल पाहता काँग्रेसची सरशी ठळकपणे दिसते. रखडलेला विकास, दुर्लक्षित मूलभूत सुविधा आणि सत्ताधाऱ्यांचा दुरावा या साऱ्याचा राग मतपेटीतून व्यक्त झाल्याचे चित्र आहे. पुलगावच्या मतदारांनी या निकालातून काम करा, नाहीतर घरी जा असा स्पष्ट संदेश दिला आहे. निकाल जाहीर होताच शहरात आनंदोत्सवाला उधाण आले. गुलालाची उधळण, फटाक्यांची आतषबाजी आणि घोषणा यांनी पुलगाव दुमदुमून गेला. हा विजय माझा नसून पुलगावच्या जनतेचा आहे. विकासालाच मत मिळाले, अशी प्रतिक्रिया नवनिर्वाचित नगराध्यक्ष कविता ब्राह्मणकर यांनी दिली. दुसरीकडे भाजप गोटात मात्र शांतता, नाराजी आणि पराभवाच्या कारणांची चाचपणी सुरू असल्याचे चित्र आहे.

**नगर परिषद, पुलगावः पक्षीय बलाबल**
काँग्रेस : १०
भाजपा : ०८
अपक्ष : ०३
एकूण : २१
पुलगावचा कौल स्पष्ट काँग्रेस सत्तेत, भाजप संकटात!

# कुणावारांनी राखला गड

## हिंगणघाटमध्ये भाजपचा महाविजय; डॉ. नयना तुळसकरांचा १८ हजार मतांनी ऐतिहासिक 'स्ट्राईक'

**वर्धा जनमाध्यम :** हिंगणघाट नगरपालिकेच्या नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीत भाजपने विरोधकांना नामोहरम करत एकतर्फी सत्ता काबीज केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रचारात ज्या उमेदवाराचे उघडपणे कौतुक केले होते, त्या डॉ. नयना उमेश तुळसकर यांनी तब्बल ३० हजार ६०० मते घेत नगराध्यक्षपदावर आपली मोहोर उमटवली. तब्बल १८ हजारांहून अधिक मतांनी मिळालेला हा विजय केवळ निवडणूक नसून राजकीय ताकदीचे प्रदर्शन ठरला आहे.

राष्ट्रवादी (शरद पवार गट) यांच्या शुभांगी डोंगरे यांना १२ हजार ५००, उबाठाच्या नीता धोबे यांना ६ हजार ५००, तर राष्ट्रवादी (अजित पवार गट) यांच्या योगिता घुसे यांना अवघी ४ हजार ४०० मते मिळाली. विरोधकांचे आकडे पाहता ही लढत एकतर्फीच ठरल्याचे स्पष्ट झाले. जिल्ह्यातीलच नव्हे तर विदर्भातील सर्वाधिक मतांनी झालेला हा विजय ठरण्याची दाट शक्यता असून, हिंगणघाटने भाजपला 'रेकॉर्ड ब्रेक' निकाल दिला आहे.

या विजयामागे आमदार समीर कुणावार यांची रणनीती, ताकद आणि राजकीय अचूकता निर्णायक ठरली. डॉ. तुळसकर यांच्या उमेदवारीवर आमदार कुणावार यांनी शिक्कामोर्तब करताच भाजपने अर्धी लढाई जिंकली होती, असे बोलले जात होते. योग्य उमेदवार, काटेकोर नियोजन आणि बूथ पातळीवरील पकड यामुळे कुणावारांनी आपला राजकीय गड पुन्हा एकदा अभेद्य असल्याचे सिद्ध केले.

डॉ. नयना तुळसकर या सुशिक्षित, अभ्यासू आणि सुस्वभावी उमेदवार



अशी ओळख असलेल्या नेत्या आहेत. त्यांना पती प्राचार्य उमेश तुळसकर यांची मृदुभाषी, संयत साथ लाभली. तुळसकर दाम्पत्याने हिंगणघाट जिंकले, अशी चर्चा मतमोजणीनंतर राजकीय वर्तुळात रंगली.

प्रचारादरम्यान मेडिकल कॉलेजच्या मुद्द्यावर भाजपविरोधकांनी वातावरण तापवण्याचा प्रयत्न केला. मात्र आमदार कुणावार यांनी वेळीच डावपेच बदलत मुख्यमंत्री फडणवीस यांची सभा घेतली. या सभेत मेडिकल कॉलेजचा मुद्दा विरोधकांच्या हातातून निसटला आणि सभा थेट डॉ. तुळसकर यांच्या गुणगौरवात बदलली. त्यांच्या शैक्षणिक पात्रतेचा उल्लेख करत मुख्यमंत्र्यांनी विदर्भातील सर्वाधिक शिक्षित उमेदवार अशी पावती दिली. एवढ्यावरच न थांबता राज्याच्या घनकचरा व्यवस्थापनाचा आराखडा तयार करण्याची जबाबदारीही जाहीरपणे त्यांच्यावर सोपवली. याच क्षणी निवडणुकीचा कौल भाजपच्या बाजूने झुकला.

विरोधकांची फाटाफूट ही भाजपसाठी संजीवनी ठरली. सर्व प्रमुख पक्षांनी स्वतंत्र उमेदवार दिल्याने लढत बहुरंगी झाली आणि मतांचे मोठे विभाजन झाले. मात्र तरीही डॉ. तुळसकर यांचे मताधिक्य इतके प्रचंड आहे की इतर सर्व प्रमुख उमेदवारांच्या मतांची बेरीजही त्यांच्या मतांपुढे फिकी ठरते. हा भाजपच्या संघटनशक्तीचा आणि तुळसकर दाम्पत्याच्या करिष्म्याचा स्पष्ट पुरावा आहे.

४० पैकी तब्बल २७ नगरसेवक भाजपचे निवडून आल्याने हिंगणघाट नगरपालिकेत भाजपची एकहाती सत्ता प्रस्थापित झाली आहे. या निकालाने आमदार समीर कुणावार यांनी केवळ गड राखलाच नाही, तर विरोधकांना जोरदार राजकीय धडा देत हिंगणघाटवर भाजपचे निर्विवाद वर्चस्व पुन्हा एकदा सिद्ध केले आहे.

**नगर परिषद, हिंगणघाट**
**- नयना तुळस्कर,** नवनिर्वाचित अध्यक्ष, (भाजपा)
पक्षीय बलाबल
भाजप - २७
शिवसेना उबाठा - ०२
राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) - ०२
राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) - ०५
अपक्ष - ०२
आरटीआय - ०२
एकूण - ४०

# मात्तबरांची माती, घराणेशाहीला सुरुंग

## -पारंपरिक प्रभाग कोसळले, बडे नेते धुळीस मिळाले

## -मतदारांचा स्पष्ट कौल नावाला नाही, कामाला मत

**सिंदी रेल्वे । जनमाध्यम :** नगरपालिकेच्या या निवडणुकीने शहराच्या राजकारणात अक्षरशः भूकंप घडवला आहे. वर्षानुवर्षे सत्तेत मिरवणारे, 'मात्तबर' म्हणून ओळखले जाणारे अनेक नेते मतदारांच्या रोषात जमिनीवर आपटले. परंपरा, ओळखी, नाती आणि घराणेशाही यांना मतदारांनी ठाम नकार देत राजकारणाची दिशा बदलून टाकली आहे.

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे शहराध्यक्ष प्रकाशचंद्र डफ यांचा त्यांच्या पारंपरिक प्रभागातूनच पराभव झाला. हा धक्का पचवण्या आधीच नगराध्यक्षपदासाठी काँग्रेसच्या उमेदवार असलेल्या त्यांच्या अर्धांगिनी वनितातांई यांनाही तिसऱ्या क्रमांकावर समाधान मानावे लागले. काँग्रेससाठी हा निकाल म्हणजे अंतर्मुख होण्याचा इशारा मानला जात आहे. दुसरीकडे भाजपचे माजी शहराध्यक्ष व माजी नगरसेवक, शहरातील मोठे नेते मानले जाणारे प्रविण सिर्सीकर यांनाही मतदारांनी सपशेल नाकारले. 'अजिंक्य' समजले जाणारे हे नेते पराभवाच्या धक्क्याने राजकीयदृष्ट्या हादरले असून भाजप गोटात मोठी खळबळ उडाली आहे. याच निवडणुकीत माजी नगरसेवक, नगरसेविका आणि त्यांच्या कुटुंबीयांनाही मतदारांनी साफ नकार दिला. माजी नगरसेविका सुमन पाटील, माजी



नगरसेविका अंजली उमाटे यांचे पती राजू उमाटे, माजी नगरसेविका वनिता मदनकर, माजी उपाध्यक्षा वंदना डकरे यांचे सुपुत्र सुशांक डकरे, माजी नगरसेविका मनीषा पेटकर यांचे पती मनोज पेटकर, माजी नगरसेविका बोभाटे यांचे सुपुत्र संदीप बोराटे, माजी नगराध्यक्ष संगीता शेंडे यांचे पती सुनिल शेंडे व भाऊज सोनाली शेंडे, माजी नगराध्यक्षा बबिता तुमाने, माजी नगराध्यक्ष कै. गणेश वर्जे यांच्या पत्नी मीरा वर्जे, तसेच माजी नगरसेविका नंदिनी भुते या सर्वांनाच मतदारांनी घरी बसवले. प्रस्थापितांची सत्ता अक्षरशः जमीनदोस्त झाल्याचे हे चित्र आहे. दरम्यान, पत्रकार अमोल सोनटक्के यांनी पहिल्यांदाच अपक्ष म्हणून निवडणूक लढवत दमदार आणि लक्षवेधी लढत दिली. तर पत्रकार प्रशांत बोरीकर यांच्या अर्धांगिनी राजश्री बोरीकर यांनी पहिल्याच निवडणुकीत विजय मिळवत नव्या चेहऱ्यांची लाट अधोरेखित केली. विशेष बाब म्हणजे राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट), शिवसेना (एकनाथ शिंदे) आणि शिवसेना (उद्धव ठाकरे) या पक्षांनी नगराध्यक्षपदासह नगरसेवक पदासाठी उमेदवार दिले; मात्र एकही जागा न मिळवता खातेही उघडता आले नाही. या पक्षांसाठी हा निकाल म्हणजे राजकीय अस्तित्वावरचा प्रश्न ठरला आहे. निकाल जाहीर होताच विजयी उमेदवारांनी पेढे वाटून, गुलाल उधळत, ढोल-ताशांच्या गजरात विजयी मिरवणूक काढली. शहरात जल्लोष असला तरी पराभूत गोटात मात्र शांतता, नाराजी आणि आत्मपरीक्षणाची वेळ आली आहे.

थोडक्यात काय तर
ही निवडणूक म्हणजे मात्तबर राजकारणाच्या अंताची घंटा आहे.
मतदारांनी स्पष्ट संदेश दिला आहे.

## मध्यरात्रीच्या रस्ते कामामुळे वन्यप्राणी बिथरले

### -राष्ट्रीय महामार्गावर बिबट्याचा मृत्यू; आष्टी-थार रस्त्यावर वाघाचा व्हिडीओ व्हायरल

**आष्टी (शहीद) । जनमाध्यम-** आष्टी ते कारंजा (घा.) मार्गावर सुरू असलेल्या मध्यरात्रीच्या सिमेंट रस्ते बांधकामामुळे वन्यप्राण्यांचे नैसर्गिक मार्ग बाधित झाले असून त्याचे गंभीर परिणाम समोर येऊ लागले आहेत. राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६ वर अज्ञात वाहनाच्या धडकेत एका बिबट्याचा मृत्यू, तर आष्टी-थार रस्त्यावर वाघ व त्याच्या बछड्यांचा रस्त्यावर फिरतानाचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.




## दोन आमदार असूनही भाजपला धक्का : आर्वीत १४ वर सत्ता; पण जनादेश मात्र नाराजीचा

**आर्वी । जनमाध्यम :** आर्वी नगर परिषदेच्या निवडणूक निकालांनी सत्ताधाऱ्यांची झोप उडवली आहे. दोन-दोन आमदारांचे प्रतिनिधित्व, मुख्यमंत्री कार्यालयाशी थेट जवळीक आणि सत्तेचा सर्व ताकदीचा वापर करूनही भाजपला आर्वीत निर्विवाद कौल मिळू शकलेला नाही. २५ पैकी १४ नगरसेवक निवडून येत भाजप सत्तेत आला असला, तरी हा निकाल विजयापेक्षा इशारा देणारा ठरला आहे. मात्र पालकमंत्री पंकज भोयर यांनी गड राखण्यास अपयश ठरले परंतु २५ नगरसेवक निवडून आणले, परंतु आर्वीत विधानसभेचे आमदार सुमित वानखेडे आणि विधान परिषदेचे आमदार दादाराव केचे हे दोन दोन आमदार असूनही २५ नगरसेवक पैकी १४ नगरसेवक निवडून आले, म्हणजेच अपयश म्हणाव काय असा प्रश्न नागरिकांसमोर उपस्थित होत आहे,

नगराध्यक्षपदासाठी झालेल्या थेट निवडणुकीत स्वाती प्रकाश गुल्हाणे यांनी १०,८२० मते मिळवत विजय मिळवला. मात्र ही लढत अटीतटीची ठरली. अपेक्षित मोठ्या मताधिक्याऐवजी कमी फरकात मिळालेल्या विजयामुळे भाजपच्या गोटात समाधानाऐवजी अस्वस्थता पसरली आहे.

**प्रभागनिहाय निकालांनी सत्ताधाऱ्यांना धक्का-** या निवडणुकीत अनेक प्रभागांत चुरशीच्या लढती पाहायला मिळाल्या. प्रभाग क्रमांक १ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट)ने भाजपला धक्का दिला.

प्रभाग क्रमांक २ मध्ये काँग्रेसने दुहेरी विजय मिळवत भाजपच्या वर्चस्वाला आव्हान दिले.



प्रभाग क्रमांक ३ व ४ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट)ने आपली ताकद दाखवत भाजपच्या गणितात मोठा अडथळा निर्माण केला.

प्रभाग क्रमांक ५ मध्ये शिवसेना (उबाठा)ने एक जागा पटकावत सत्ताधाऱ्यांच्या दाव्यांना सुरुंग लावला. दुसरीकडे, प्रभाग क्रमांक ६, ७, ९, १० व ११ मध्ये भाजपने विजय मिळवला असला, तरी हा विजय अपेक्षेपेक्षा कमी प्रभावी ठरला आहे.

**पक्षीय बलाबल : सत्ता आहे, पण वर्चस्व नाही**

एकूण निकाल पाहता भाजपचे १४, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट)चे ७, काँग्रेसचे २, शिवसेना (उबाठा)चा १ आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट)चा १ नगरसेवक निवडून आला आहे. आकड्यांत भाजप आघाडीवर असला, तरी विरोधकांनी मजबूत उपस्थिती नोंदवून सत्ताधाऱ्यांना स्पष्ट संदेश दिला आहे.

**आमदारांसाठी धोक्याची घंटा-** आर्वीचे आमदार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निकटवर्तीय व माजी ओएसडी म्हणून ओळखले जातात. अशा स्थितीतही भाजपला जनतेकडून निर्विवाद कौल मिळू नये, ही बाब राजकीयदृष्ट्या गंभीर मानली जात आहे. स्थानिक नाराजी, विकासकामांवरील असंतोष आणि अंतर्गत गटबाजी याचा फटका भाजपला बसल्याची चर्चा उघडपणे सुरू झाली आहे.

**मतमोजणी शांततेत; राजकीय ताप मात्र प्रचंड**

दरम्यान, आर्वी येथे मतमोजणी प्रक्रिया शांततेत पार पडली. कोणताही अनुचित प्रकार घडला नाही. निकाल जाहीर होताच विजयी गटात जल्लोष झाला, तर पराभूत गटांत आत्मपरीक्षण सुरू झाले आहे.एकंदरीत, आर्वी नगर परिषदेचा निकाल भाजपसाठी सत्तेचा विजय असला, तरी राजकीय इशारा ठरला आहे. जनतेचा हा कौल सत्ताधाऱ्यांना सावध करणारा असून, येणाऱ्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर आर्वीचा निकाल महत्त्वाचा मानला जात आहे.

## माजी खासदारांच्या पत्नीचा दारुण पराभव

# देवळी नगर पालिकेवर भाजपचा ३५ वर्षांचा गड कोसळला

**देवळी । जनमाध्यम :** देवळी नगरपालिकेच्या निकालाने भाजपच्या राजकारणाचा फुगा फुटला असून, तब्बल ३५ वर्षे टिकलेली सत्ता एका झटक्यात जमीनदोस्त झाली आहे. निकाल जाहीर होताच विरोधी गोटात जल्लोष झाला, तर भाजपच्या गडात स्मशान शांतता पसरली. हा पराभव केवळ आकड्यांचा नसून अहंकार, घराणेशाही आणि वरिष्ठ नेत्यांच्या ढवळाढवळी विरोधात जनतेने दिलेला थेट आणि स्पष्ट निकाल असल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे.

देवळी नगरपालिकेवर गेली तीन दशके भाजपची निर्विवाद सत्ता होती. माजी खासदार रामदास तडस यांच्या प्रभावाखाली पालिकेचे राजकारण चालत होते. मात्र याच निवडणुकीत त्यांच्या एकांगी निर्णयांनी भाजपलाच अडचणीत आणले. पत्नीला उमेदवारी देण्याचा हट्ट, स्थानिक कार्यकर्त्यांना डावलण्याची भूमिका आणि मी म्हणेन तेच होणार हा पवित्रा यामुळे पक्षांतर्गत असंतोष उफाळून आला. हा रोष हळूहळू मतदारांच्या मनात उतरला आणि मतदानाच्या दिवशी त्याचा स्फोट झाला. रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता यांसारखे मूलभूत प्रश्न प्रचारात असले तरी चर्चेचा केंद्रबिंदू ठरला तो घराणेशाही. विकासाच्या मुद्द्यावर भाजप ठोस भूमिका मांडू शकला नाही. उलट निर्णयप्रक्रियेत



लोकप्रतिनिधींपेक्षा कुटुंबीयांना प्राधान्य दिले जात असल्याची भावना जनतेत पक्की झाली. परिणामी, मतदारांनी सत्ताधाऱ्यांना जोरदार दणका दिला.

या निकालाने देवळीपुरतेच नव्हे, तर संपूर्ण जिल्ह्यातील भाजप नेतृत्वाला इशारा दिला आहे. स्थानिक नेतृत्व डावलून वरून लादलेले निर्णय जनतेला मान्य नसल्याचे पुन्हा एकदा सिद्ध झाले. वरिष्ठांनी दूर राहा, कार्यकर्त्यांना पुढे येऊ द्या असा ठाम संदेश या निकालातून मिळाला आहे. या निवडणुकीत युवा मोर्चाचे शेतकरी नेते व माजी आमदार बच्चू कडू यांचे समर्थक किरण ठाकरे यांनी नगराध्यक्षपदावर दणदणीत विजय मिळवला. राजकारणात केवळ दहा वर्षांचा अनुभव असलेल्या ठाकरे यांनी ३५ वर्षांपासून देवळी पालिकेवर सत्ता गाजवणाऱ्या रामदास तडस यांना पराभूत करून राजकीय वर्तुळाला धक्का दिला. कुस्तीत अजिंक्य असलेले तडस राजकारणातही डावपेचात माहीर मानले जात होते. दोन वेळा आमदारकी आणि दोन वेळा खासदारकी पटकावणाऱ्या तडस यांना ठाकरे यांनी चारी मुंड्या चित केल्याने देवळी अक्षरशः स्तब्ध झाली. दुसरीकडे किरण ठाकरे यांची एकला चलो रे भूमिका निर्णायक ठरली. मर्यादित साधनसंपत्ती असूनही त्यांनी आत्मविश्वासाने लढत दिली. शेतकरी आंदोलनातून उभे राहिलेले ठाकरे यांनी शेतकरी, मजूर, दलित, मुस्लिम आणि कामगार घटकांना सोबत घेत सुप्त विरोधाला संघटित केले. मतदानाच्या आदल्या रात्री झालेल्या सभेतील गर्दीनेच निकालाची दिशा स्पष्ट केली होती. अखेर २१०० मतांनी ठाकरे विजयी झाले. अहंकाराच्या राजकारणाला देवळीने ठाम नकार दिला असून, हा निकाल भाजपसाठी आत्मपरीक्षणाचा गंभीर इशारा ठरला आहे.

**नगर परिषद, देवळी**
**-किरण ठाकरे,** नवनिर्वाचित अध्यक्ष,(काँग्रेस)
पक्षीय बलाबल
भाजपा - १६
काँग्रेसचे - ०४
एकूण - २०

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## प्रदूषणाचा भस्मासुर

न्यायालये, आंतरराष्ट्रीय पर्यावरण संस्था, हरित लवाद, संघटनांनी अनेकदा गंभीर धोक्याचे इशारे देऊनही त्यापासून काही शिकायची कोणाची तयारी नाही, हेच देशाची राजधानी दिल्लीतील घातक प्रदूषणाने येथील सर्वच जबाबदार यंत्रणांना स्पष्टपणे बजावले आहे. दिल्लीचा 'एक्यूआय' ४००च्या आसपास पोहोचला असून, तो अतिगंभीर श्रेणीत येतो. मुळात मार्च २०२४ ते फेब्रुवारी २०२५ या काळात दिल्लीतील वार्षिक सरासरी पीएम (पार्टिक्युलेट मॅटर २.५) एका घनमीटरमध्ये १०१ मायक्रोग्रॅम नोंदवला गेला. हा राष्ट्रीय मर्यादेच्या अडीचपट आणि जागतिक आरोग्य संघटनेच्या मार्गदर्शक तत्त्वांच्या सुमारे २० पट अधिक होता. यावरून प्रदूषणाचा घातक स्तर कोणत्या पातळीवर पोहोचला, हे लक्षात येते. ते येऊनही काय उपयोग? मुळातच हा प्रश्नच मान्य करायची कोणाची तयारी नाही. थातूरमातूर उपाययोजना आणि केवळ तोंडाला पाने पुसणाऱ्या घोषणांनी हा प्रश्न सुटायचा, तर दूरच त्यातून मार्ग निघणार तरी कसा? प्रदूषणाने दरवर्षीप्रमाणे आपले काळे रंग दाखवायला सुरुवात केली आहे. त्यामुळे दिल्लीतील रखडलेली विमानसेवा, वाहनांचे भीषण अपघात हे त्यापैकी एक. भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील चौथा टी-२० क्रिकेट सामना बुधवारी लखनौ येथील प्रचंड धुक्यामुळे रद्द करावा लागला.लखनौतील हवा गुणवत्ता निर्देशांक (एक्यूआय) ४००च्या वर गेल्यामुळे खेळाडूंच्या आणि प्रेक्षकांच्या आरोग्यालाही धोका होता. दुसरीकडे, सर्वोच्च न्यायालयाने बुधवारी दिल्ली सरकारला भारत टप्पा-चार (बीएस-चार) नियमांचे पालन न करणाऱ्या जुन्या वाहनांविरोधात कठोर कारवाई करण्याची परवानगी दिली. या आदेशामुळे न्यायालयाने १२ ऑगस्टला दिलेल्या आदेशामध्ये बदल केला आहे. यापूर्वी तत्कालीन सरन्यायाधीश न्या. भूषण गवई यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठाने डिझेलवर चालणाऱ्या १० वर्षांपेक्षा जुन्या आणि पेट्रोलवर चालणाऱ्या १५ वर्षांपेक्षा जुन्या वाहनांवर कठोर कारवाई न करण्याचे आदेश दिले होते. त्याविरोधात दिल्ली सरकारतर्फे याचिकाही केली होती. यानंतर खंडपीठाने सुधारित आदेश दिले. दिल्लीत प्रदूषण प्रचंड असून, त्यामुळे कडक निर्बंध घालणे योग्यच ठरते. त्याचवेळी दिल्ली आणि एनसीआर सीमांवर नेहमी वाहतूक कोंडी होते. ती कमी करण्यासाठी सीमेवरील नऊ टोल नाके तात्पुरते बंद करण्याचा किंवा त्यांचे स्थलांतर करण्यावर विचार करण्यास न्यायालयाने भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण आणि दिल्ली महापालिकेला सांगितले.प्रदूषणाशी संबंधित निर्बंधांमुळे बेरोजगार झालेल्या बांधकाम कामगारांची पडताळणी करून आर्थिक मदत हस्तांतरित करावी, अशा कामगारांना पर्यायी काम देण्याचा विचार करावा, असे आदेश न्यायालयाने दिले. राजधानीच्या सीमेलगतच्या हरियाणा, पंजाबमधील शेतकऱ्यांना पाचट जाळण्यापासून रोखण्यासाठी प्रोत्साहन देण्यावर विचार करण्यास न्यायालयाने सांगितले. दिल्लीतील हवा बिघडण्याचे ते एक कारण असून, याबाबत वर्षानुवर्षे दिली विरुद्ध हरियाणा-पंजाबातील सरकारे यांच्यात आरोप-प्रत्यारोप सुरू असतात; मात्र प्रदूषण हा राजकारणाचा विषय नसून, याबाबत केंद्र सरकारनेही सर्वसहमती घडवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. वाढत्या प्रदूषणामुळे कोळसा व लाकडी इंधनावरील तंदूरवर बंदी घालण्याचे निर्देश देण्याची वेळही आली. सर्व रेस्तराँ आणि खाण्याचे स्टॉल्स यांना इलेक्ट्रिक, गॅस आधारित किंवा इतर स्वच्छ इंधनांच्या उपक्रमांकडे वळण्यास सांगण्यात आले.गेल्या शनिवारीच 'ग्रेडेड रिस्पॉन्स ॲक्शन प्लॅन'चा चौथा टप्पा लागू करण्याची वेळ आली. मुळात सर्व गोष्टी घडून गेल्यानंतर यंत्रणांना जाग येते. प्रदूषण हा करोडो लोकांच्या सार्वजनिक आरोग्याशी निगडित विषय, तरीही त्याबाबत न्यायालयाने चपराक दिल्याखेरीज सरकार असो वा महापालिका, कोणीच ठोस हालचाल करत नाही, हे गंभीर आहे. दिल्लीतील विषारी हवा केवळ माणसांसाठीच नव्हे, प्राण्यांसाठी आणि वृक्षांसाठीही धोकादायक ठरते. दिल्ली विद्यापीठाच्या संशोधकांनी केलेल्या अभ्यासानुसार, झाडांमधील क्लोरोफिल किंवा हरितद्रव्य घटत असून, त्याचा परिणाम वृक्षांच्या प्राणवायू निर्माण करण्याच्या क्षमतेवर होत आहे. प्रदूषणामुळे पुढील पिढ्यांच्या भविष्यावर कसे विपरीत परिणाम होऊ शकतात, याचीच ही एक झलक म्हणावी लागेल.न्यायालयाने कान टोचल्यानंतर आता दिल्ली सरकार जागे झाले असून, बांधकामांवर निर्बंध, कामगारांना मदत यासारखे फुटकळ निर्णय घेतले गेले, तसेच सर्व सरकारी व खासगी संस्थांनी आपल्या ५० टक्के कर्मचाऱ्यांना 'वर्क फ्रॉम होम' करण्यास सांगावे, असे निर्देश दिले. प्रदूषणाबाबतीत दिल्लीनंतर चंदीगड, हरियाणा आणि त्रिपुरा यांचा क्रमांक लागतो. आसाम, बिहार, पश्चिम बंगाल आणि पंजाबसह अनेक राज्यांनीही राष्ट्रीय मानकांचे उल्लंघन केले आहे. जगातील सर्वाधिक प्रदूषित शहरांच्या यादीत दिल्लीचा समावेश झाला आहे. त्यामागे वाहनांचा धूर, बांधकामांतील धूळ, कारखान्यांतून होणारे उत्सर्जन ही कारणे आहेतच; पण सर्वसामान्य नागरिक, व्यावसायिक आणि उद्योजक प्रदूषणाचे प्राथमिक नियमही पाळताना दिसत नाहीत. संपूर्ण देशभरच शहरीकरण वाढले असून, त्या प्रमाणात सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत सुधारणा झालेली नाही. उत्तराखंडपासून ते अगदी ईशान्येकडील राज्यांपर्यंत विकासाच्या नावाखाली सर्वत्र झाडांची कत्तल होऊ लागली आहे.उत्तराखंडमधील जोशीमठ, केरळमधील वायनाड, रायगड जिल्ह्यातील इर्शाळगड या आपत्तींमुळे खरे तर निसर्गानेच पर्यावरणाबाबत एकप्रकारे पूर्वइशारे देऊन ठेवले आहेत, तरीदेखील त्यातून कोणताच धडा घेण्याची कोणाची तयारी दिसत नाही. शहरे आणि महानगरांतून वाहनांच्या विषारी धुरापासून प्रदूषणाचे प्रमाणही मोठे आहे. त्याकडे संबंधित यंत्रणा डोळेझाक करताना दिसतात. प्रदूषण नियंत्रण मंडळे आपले मूळ काम प्रभावीपणे करत नाहीत. शहरांभोवतीच्या टेकड्या छाटून तेथे वाट्टेल तशी बांधकामे सुरू आहेत, हे मुंबई, पुण्यासह अनेक ठिकाणी समोर येणारे चित्र गंभीर आहे. प्रभावशाली बांधकाम व्यावसायिक, उद्योगपतींनी नियमांची पायमल्ली करत या टेकड्यांचा, नदी किनाऱ्यांचा, तळी, तलावांचा घास घ्यायला कधीच सुरुवात केली आहे. हे संकट दिल्लीपुरते मर्यादित नाही. सारा देशच कमी-अधिक प्रमाणात त्याने व्यापला आहे. विकासाच्या नावाखाली निसर्ग ओरबाडून घेण्याच्या या प्रवृत्तीला वेळीच रोखण्याची गरज आहे, अन्यथा प्रदूषणाचा भस्मासुर मानवी जीवनाला गिळंकृत केल्याशिवाय राहणार नाही.



# राजकारणाला नवे वळण

**भारतीय राजकारणात तरुण नेत्यांना थेट सर्वोच्च पदावर बसवण्याची परंपरा फारशी दिसून आलेली नाही; मात्र या पारंपरिक पद्धतींना छेद देत भाजपने पुन्हा एकदा सगळ्यांना आश्चर्याचा धक्का दिला आहे. औपचारिकदृष्ट्या ही नियुक्ती कार्यकारी अध्यक्षपदाची असली, तरी येत्या जानेवारी अखेरपर्यंत नितीन यांची पूर्णवेळ राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून निवड होईल, असे संकेत दिले जात आहेत.**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांच्या मनात नेमके काय चालले आहे, याचा अंदाज तिसरा कोणी लावू शकत नाही, हे गेल्या दहा वर्षांमधील घडामोडी पाहताना सहजगत्या लक्षात येते. मोठे आणि धाडसी निर्णय घेऊन त्यांनी नेहमीच पक्ष कार्यकर्त्यांसह देशाला ठाम संदेश दिला आहे. विशेष म्हणजे, बहुतेक वेळा या निर्णयांचा यत्किंचितही मागमूस दिल्ली वर्तुळातील जाणत्या पत्रकारांना लागला नाही. ही मोदी-शहा यांच्या भाजपची कार्यपद्धत आहे. अलीकडेच बिहारचे मंत्री नितीन नबीन यांची पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारी अध्यक्षपदी नियुक्ती करून मोदी-शहा यांनी अनेक दिग्गजांना आश्चर्याचा धक्का दिला आहे. उत्तर प्रदेश भाजपची कमान पंकज चौधरी यांच्या हाती देण्यात आली, त्याच दिवशी सायंकाळी नितीन नबीन यांच्या कार्यकारी अध्यक्षपदाची घोषणा करण्यात आली. अवघ्या पंचेचाळीसाव्या वर्षी या महत्त्वाच्या पदावर पोहोचलेले नितीन नबीन हे या जबाबदारीवर विराजमान होणारे पक्षातील सर्वात तरुण नेते ठरले आहेत. विद्यमान राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांचे संभाव्य उत्तराधिकारी म्हणून त्यांच्याकडे पाहिले जात आहे. तसे घडल्यास भारतीय जनता पक्षाचे नेतृत्व करणारे ते बिहारमधून पुढे आलेले पहिले नेते ठरतील.

नबीन यांना संघटनेच्या राष्ट्रीय राजकारणाच्या केंद्रस्थानी आणून भाजप नेतृत्वाने दिलेला संदेश स्पष्ट आहे. जगातील सर्वांत मोठा राजकीय पक्ष असणाऱ्या भाजपमध्ये सर्वसामान्य कार्यकर्त्यांचा सन्मान होतो आणि मेहनत, प्रामाणिकपणा व पक्षनिष्ठा दाखवणाऱ्यांना सर्वोच्च जबाबदाऱ्या दिल्या जाऊ शकतात, हे यातून पक्षनेतृत्वाने दाखवून दिले आहे. एका तरुण नेत्याला इतक्या महत्त्वाच्या पदावर बसवून भाजपने पुढच्या पिढीच्या राजकारणावर लक्ष केंद्रित केले असल्याचे स्पष्ट केले आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघही सातत्याने भविष्यातील नेतृत्व घडवण्यावर भर देत आला आहे. पंतप्रधान मोदी यांनीही लाल किल्ल्यावरील भाषणादरम्यान तरुणांनी राजकारणात यायला हवे, असे आवाहन केले होते. आता नितीन यांच्या नियुक्तीमधून भाजपची दृष्टी २०२९ आणि त्यानंतरच्या भारताकडे असल्याचे दिसून येते.

नबीन यांना राजकारणाचा वारसा, परंपरा वडिलांकडूनच मिळाला आहे. त्यांचे वडील नबीन किशोर सिन्हा हे जनसंघापासून भाजपशी जोडले गेले होते आणि ते सात वेळा आमदार राहिले. वडिलांच्या निधनानंतर २००६ मध्ये पाटणा पश्चिम विधानसभा मतदारसंघातील पोटनिवडणुकीत भाजपने अवघ्या २६ वर्षांच्या नितीन नबीन यांना उमेदवारी दिली. या निवडणुकीत त्यांनी सुमारे ६० हजार मतांनी विजय मिळवत राजकारणात प्रवेश केला. त्यानंतरच्या जवळपास दोन दशकांत नितीन नबीन यांनी बिहारच्या राजकारणात आपले स्थान अधिक दृढ केले. त्यांनी आपली राजकीय कारकीर्द भाजपच्या विद्यार्थी संघटना अभाविपमधून सुरू केली. त्यानंतर ते भाजप युवा मोर्चाशी सक्रिय राहिले. मेहनत आणि क्षमतेच्या जोरावर त्यांनी स्वतःची ओळख निर्माण केली.

छत्तीसगडच्या निवडणुकांमध्ये त्यांना प्रभारी म्हणून जबाबदारी देण्यात आली होती, जिथे त्यांनी काँग्रेस सरकारला सत्तेतून खाली खेचण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. त्यानंतर बिहारच्या निवडणुकांमध्येही त्यांनी परिश्रमपूर्वक काम करत पक्षाला अभूतपूर्व यश मिळवून दिले. सध्या ते बिहार सरकारमध्ये मंत्री आहेत आणि पाटणा येथील बांकीपूर मतदारसंघातून पाच वेळा आमदार म्हणून निवडून आले आहेत. नबीन यांनी नितीन गडकरी यांच्या कार्यशैलीप्रमाणे काम करत हजारो किलोमीटर रस्त्यांचे बांधकाम केले असून ते पंतप्रधान मोदी यांच्या पायाभूत सुविधा विकासाच्या दृष्टिकोनाशी सुसंगत ठरते. ते फायलींमागे लपणारे नव्हे, तर प्रत्यक्ष कामातून परिणाम दाखवणारे मंत्री म्हणून ओळखले जातात. सत्ता आणि संघटना या दोन्हींचा अनुभव त्यांच्याकडे आहे. इतकी वर्षे राजकारणात असूनही त्यांची प्रतिमा पूर्णपणे स्वच्छ राहिली आहे. प्रसिद्धीपासून दूर राहत काम करण्यावर ते विश्वास ठेवतात. कोणतेही भडक वक्तव्य नाही, भ्रष्टाचाराचा कोणताही आरोप नाही. त्यामुळेच भाजपला सर्वोच्च संघटनात्मक पदासाठी अशाच व्यक्तिमत्त्वाची गरज होती, असे मानले जाते. पक्ष संघटना मजबूत करणे आणि आगामी राजकीय रणनीतीला धार देणे, यात त्यांची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे.

विद्यमान अध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी २०२० मध्ये पक्षाध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारली होती. त्यांचा कार्यकाळ पूर्ण झाल्यानंतरही २०२४ च्या लोकसभा निवडणुकांपर्यंत त्यांना मुदतवाढ देण्यात आली. या पार्श्वभूमीवर नितीन नबीन यांची राष्ट्रीय कार्यकारी अध्यक्षपदी झालेली नियुक्ती ही पक्षातील पिढीगत बदलाची नांदी मानली जात आहे. विशेष म्हणजे, नड्डा यांचाही जन्म बिहारमध्येच झाला असून त्यांचे प्रारंभिक शिक्षण पाटण्यात झाले होते.

नबीन यांच्या नियुक्तीकडे बिहारच्या राजकारणात भाजपच्या संघटनात्मक विस्ताराच्या दृष्टीनेही पाहिले जात आहे. त्यांना कार्यकारी अध्यक्ष बनवून भाजपने कायस्थ समाजाला स्पष्ट राजकीय संदेश दिला आहे. नितीन नबीन कायस्थ समाजातून येतात. जनसंघापासून भाजपपर्यंतच्या प्रवासात कायस्थ समाज हा पक्षाचा महत्त्वाचा आधार राहिला आहे. हा समाज शिक्षित, बौद्धिक आणि प्रशासकीय पातळीवर प्रभावी मानला जातो. देशातील बौद्धिक वर्ग आणि पारंपरिक मतदार यांचा विचार करून भाजपने नितीन नबीन यांच्याकडे ही जबाबदारी सोपवली आहे. जातीय समीकरणे साधताना नितीन नबीन 'सबका साथ' अशी सर्वसमावेशक प्रतिमा जपत आले आहेत. हिंदी पट्ट्यातील शहरी भागांमध्ये कायस्थ मतदार निर्णायक भूमिका बजावतात आणि त्यांच्यावर नितीन नबीन यांची पकड मजबूत मानली जाते. कायस्थ समाजाची संख्या कमी असली, तरी त्यांची बौद्धिक उपस्थिती, प्रशासनातील प्रभाव आणि शहरी नेतृत्वातील भूमिका नेहमीच महत्त्वाची राहिली आहे. नितीन नबीन यांनी ही भूमिका अधिक बळकट केली आहे. शांत स्वभाव, संतुलित भूमिका आणि वादविवादांपासून दूर राहून काम करण्याची पद्धत त्यांना कायस्थ समाजाचा स्वीकारार्ह आणि नैसर्गिक नेता बनवते.

या निवडीला आणखी एक पार्श्वभूमी आहे, ती म्हणजे पश्चिम बंगालची. या राज्यामध्येही कायस्थ मतदार महत्त्वाचे मानले जातात. त्यामुळे नितीन नबीन यांच्या माध्यमातून बंगाललाही राजकीय संदेश देण्याचा प्रयत्न केला जात आहे, जेणेकरून कायस्थ मतदारांचा विश्वास संपादन करून भाजपला सत्तेपर्यंत पोहोचता येईल. बिहारमध्ये २०२० मध्ये भाजपचे तीन कायस्थ आमदार होते. त्यापैकी दोन जणांचे तिकीट कापले गेले; मात्र नितीन नबीन यांच्यावर पक्षाने पूर्ण विश्वास ठेवला. त्यामुळे बंगाल निवडणुकांमध्ये ते भाजपसाठी महत्त्वाचा कणा ठरू शकतात.

राजकारणाच्या दृष्टीने ४५ वर्षांचे वय अजूनही तरुणच मानले जाते. भारतीय राजकारणात तरुण नेत्यांना थेट सर्वोच्च पदावर बसवण्याची परंपरा फारशी दिसून आलेली नाही. इतिहासाची पाने धुंडाळताना दिसणारे एक उदाहरण म्हणजे १९५९ मध्ये अनेक दिग्गज नेते असतानाही काँग्रेसने तत्कालीन पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांची कन्या इंदिरा गांधी यांची पक्षाध्यक्षपदी निवड केली होती. त्यावेळी इंदिराजींचे वय केवळ ४२ वर्षे होते. पक्षाचा राष्ट्रीय अध्यक्ष हे पद जितके सन्मानाचे आहे, तितकेच प्रचंड आव्हानात्मकही आहे. युवा मोर्चा चालवणे आणि मुख्य संघटना हाताळणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. त्यामुळे अनेक ज्येष्ठ आणि दिग्गज नेत्यांनी भरलेल्या भाजप संघटनेला सांभाळणे हे नितीन नबीन यांच्यासमोर मोठे आव्हान ठरणार आहे. भाजप ही केडरआधारित संघटना असल्याने त्यांना फार अडचणी येणार नाहीत, असा एक मतप्रवाह आहे.

१९८० मध्ये स्थापन झालेल्या भाजपचे अटलबिहारी वाजपेयी हे पहिले अध्यक्ष होते. त्यानंतर लालकृष्ण अडवाणी, मुरली मनोहर जोशी, कुशाभाऊ ठाकरे, बंगारू लक्ष्मण, जनकृष्णमूर्ती, व्यंकय्या नायडू, राजनाथ सिंह, नितीन गडकरी आणि अमित शहा अशी दिग्गज व्यक्तिमत्त्वे या पदावर विराजमान झाली. त्या यादीत नितीन नबीन यांचे नाव जोडले जाईल की नाही, हे येणारा काळ ठरवेल. पुढील वर्षी जानेवारीअखेर त्यांची पूर्णवेळ राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून निवड होण्याची शक्यता राजकीय वर्तुळात व्यक्त केली जात आहे. जे. पी. नड्डा यांच्या बाबतीतही आधी त्यांना कार्यकारी अध्यक्ष बनवण्यात आले होते आणि नंतर राष्ट्रीय अध्यक्षपद देण्यात आले होते. नितीन नबीन पक्ष कार्यकर्त्यांमध्ये नवी ऊर्जा निर्माण करतील, पक्षाच्या धोरणांना प्रभावीपणे जनतेपर्यंत पोहोचवतील आणि भाजपचा विस्तार करतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

**डॉ. योगेश प्र. जाधव**

## राडा प्रकरणाने मेस्सीच्या दौऱ्याला गालबोट

अवघ्या तीन दिवसांच्या गोट (ग्रेटेस्ट ऑफ ऑल टाइम) इंडिया टूरसाठी भारतात आलेल्या फुटबॉल विश्वातील अर्जेंटिनाचा दिग्गज खेळाडू लिओनेल मेस्सीचा भारत दौरा पार पडल्यानंतर आता त्याचे नकारात्मक पडसाद उमटू लागले आहेत. खरे तर मेस्सीच्या दौऱ्याची सुरुवातच निराशाजनक झाली. कोलकात्याच्या सॉल्ट लेक स्टेडियममध्ये दाखल झाल्यानंतर अवघ्या काही मिनिटांतच मेस्सी स्टेडियममधून निघून गेल्याने तेथे उपस्थित असलेल्या हजारो चाहत्यांमध्ये प्रचंड नाराजी पसरली. मेस्सीला प्रत्यक्ष पाहण्यासाठी तिकिटांसाठी हजारो रुपये खर्च करून आलेले चाहते मेस्सी मैदानात फार वेळ न थांबल्याने संतप्त झाले. यानंतर सॉल्ट लेक स्टेडियममध्ये परिस्थिती हाताबाहेर जाऊन संतप्त चाहत्यांनी खुर्च्या आणि बाटल्या फेकत निषेध व्यक्त केला. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांनी लाठीमार केला. आता पोलिसांनी आयोजकाला अटकही केली आहे. परंतु या संपूर्ण प्रकरणाने मेस्सीच्या दौऱ्याला गालबोट लागले. दुसरे म्हणजे मेस्सीच्या दौऱ्यासाठी ३०० कोटींचा खर्च केला गेला. तेवढाच खर्च भारतीय फुटबॉल खेळाचा दर्जा सुधारण्यासाठी करता आला असता. विशेषतः कोलकात्याचाच दीडशे वर्षे जुना व प्रख्यात मोहन बगान फुटबॉल संघ शेवटचे आचके देत असताना तो खर्च कारणी लागला असता असा सूर प्रसारमाध्यमातून उमटला. मेस्सीच्या भव्य पुतळ्यावरूनही समाजमाध्यमात 'जी व्यक्ती भारताची नाही, ज्या व्यक्तीला भारताविषयी माहिती नाही आणि जिचा भारताशी काहीही संबंध नाही' अशा व्यक्तीचा भारतात एवढा मोठा पुतळा कशासाठी उभारला? अशा तिखट प्रतिक्रिया उमटल्या.

**- प्रदीप मोरे**

## मुलांवर आभासी पात्र रंगवू नका

२१व्या शतकात एकीकडे विज्ञानवाद जोपासला जात असताना दुसरीकडे मात्र काही जुनाट प्रथांना, काल्पनिक पात्रांना आजही गोंजारले जात आहे याचे आश्चर्य वाटते. महासत्ता असलेल्या आणि महासत्ता बनू पाहणारे देशही यातून सुटलेले नाहीत. ख्रिसमसच्या दिवशी रात्री १२ वाजता येणारा आणि मुलांना खेळणी देऊन जाणारा सांताक्लॉज बाबा हे त्यातलेच एक काल्पनिक पात्र. सर्व गोष्टी विज्ञानाच्या तराजूत मोजणारी विज्ञानवादी, पुरोगामी मंडळी या बाबाचे वास्तव शोधण्याचा प्रयत्न करताना कधी दिसत नाहीत. ख्रिस्तीबहुल देशांमध्ये या सांताक्लॉज बाबाचे स्तोम माजणे एकवेळ मान्यही आहे मात्र भारतासारखा हिंदुबहुल देश ज्याला प्राचीन आणि महान अशी वास्तववादी हिंदू संस्कृती लाभली आहे, अशा देशात या काल्पनिक पात्राचा शिरकाव मनाला खटकणारा आहे. सध्याच्या स्पर्धात्मक युगात आपल्या पाल्याचा निभाव लागावा म्हणून पालक आपल्या मुलांना कॉन्व्हेन्ट शाळांमध्ये शिकवू लागली आहेत. याच कॉन्व्हेंट शाळांमध्ये मुलांना सांताक्लॉज बाबाच्या लाल टोप्या घालण्याची सक्ती केली जाते. ख्रिसमसच्या रात्री मुले झोपल्यावर मुलांच्या उशाजवळ खेळणी ठेवण्यास सांगितले जाते आणि ही खेळणी सांताक्लॉज बाबाने रात्री येऊन ठेवली असल्याचे मुलांना सांगण्यास सांगितले जाते. मुलांच्या कोवळ्या मनावर असे खोटे आभासी पात्र रंगवणे कितपत योग्य ?

**ज्योती रावराणे**

## हिंदूंची प्राचीन मंदिरे पाडून बांधली सदनिका

नुकतेच कर्णावती, गुजरात येथे हिंदूचे प्राचीन मंदिरे पाडून तेथे मुसलमान व्यावसायिकाकडून स्थानिक हिंदू नागरिकांचा विरोधाला न जुमानता, त्यांच्या लोकांकरिता सदनिका बांधल्या हे वृत्त वाचनात आले. या आधी देखील वर्ष २०१६ मध्ये कर्णावती महानगरपालिकेने स्थानिक हिंदूंच्या विरोधाला न जुमानता प्राचीन श्री जोडणी माता मंदिराच्या छतावर सदनिका बांधण्याकरीता अनुमती दिल्याचे कळते.यावरून खरोखरच भारत निधर्मी राष्ट्र आहे की मुसलमानांचे लांगूलचालन करणारे राष्ट्र आहे, असा प्रश्न सर्व सामान्यांना पडतो.आता पर्यंत एकही उदाहरण ऐकिवात नाही की हिंदूंनी वैध/अवैध मस्जिद,दर्गा पाडून त्या ठिकाणी सदनिका, किंवा मंदिरे बांधली आहेत. हिंदूना अमिष दाखवून, प्रसंगी धाक दाखवून त्यांचे धर्मांतर करणे, असे प्रसंग सातत्याने घडतांना दिसून येतात.या पार्श्वभूमीवर हिंदूनी जागृत होऊन राष्ट्र आणि धर्म यांसाठी कृतीप्रवण होणे, मंदिरातील पुजारी, कथावाचक यांनी हिंदूंना धर्मशिक्षण देउन आपल्या सनातन धर्माला पुन्हा त्यांचे स्थान मिळवून देणे, ही काळाची गरज आहे.

**शशीकांत पाध्ये,वर्धा**

## हिंदूंचा आक्रोश आणि राजकारण्यांचे 'गाझा' प्रेम

गेल्या दीड वर्षांपासून शेजारील देश बांगलादेशातील हिंदू समाज एका भीषण छळाचा आणि अस्तित्वाच्या लढाईचा सामना करत आहे. हिंदू मंदिरांवर होणारे हल्ले, घरांची जाळपोळ आणि आता थेट हिंदूंच्या हत्या हे सत्र थांबण्याचे नाव घेत नाहीये. 'जुलै विद्रोह' चळवळीचे नेते शरीफ उस्मान हादी यांच्या मृत्यूनंतर भालुका प्रांतात जे घडले, ते माणुसकीला काळिमा फासणारे आहे. दीपू चंद्र दास या हिंदू युवकावर ईशनिंदेचा खोटा ठपका ठेवून त्याची निर्घृण हत्या करण्यात आली आणि त्याचा मृतदेह झाडाला बांधून पेटवून दिला गेला. ही केवळ एक घटना नसून हिंदू समाजाला संपवण्याचा हा पद्धतशीर प्रयत्न आहे.



दुर्दैवाने, बांगलादेशातील या आगीची झळ पश्चिम बंगालपर्यंत पोहोचताना दिसत आहे. तेथेही हिंदू समाज सुरक्षित नसल्याच्या तक्रारी सातत्याने येत आहेत. मात्र, मतांच्या राजकारणामुळे तेथील सत्ताधारी तृणमूल काँग्रेस सरकार या गंभीर विषयाकडे हेतुपुरस्सर डोळेझाक करत आहे. त्याहून धक्कादायक बाब म्हणजे भारतातील मुख्य विरोधी पक्ष असलेल्या काँग्रेसची या विषयावरील भूमिका.

काँग्रेसचे वरिष्ठ नेतृत्व राहुल गांधी, सोनिया गांधी आणि प्रियंका गांधी जगाच्या कानाकोपऱ्यातील मानवाधिकारांवर बोलतात, पण बांगलादेशातील रक्ताळलेल्या हिंदू बद्दल चकार शब्द काढत नाहीत. गाझा मधील संघर्षाचा या नेत्यांना इतका पुळका आहे की, प्रियंका गांधी चक्क संसदेत 'आय लव्ह गाझा' लिहिलेला झोला मिरवतात. मग हाच पुळका आणि हीच संवेदनशीलता आपल्या शेजारी मरणाऱ्या हिंदू बांधवांबद्दल का व्यक्त होत नाही? 'सर्वधर्मसमभाव' ही नीती केवळ एका विशिष्ट वर्गासाठीच मर्यादित आहे का, असा प्रश्न आज पडतो.

अलीकडे सोनिया गांधी यांनी एका इंग्रजी वृत्तपत्रात लेख लिहून भारताच्या परराष्ट्र धोरणावर टीका केली आणि इराणची वकिली केली. इराणला भारताचा 'जुना मित्र' म्हणताना त्यांना कदाचित विसर पडला असेल की, १९६५ आणि १९७१ च्या युद्धात याच इराणने पाकिस्तानची पाठराखण केली होती. याउलट इस्रायल हा देश दहशतवादाविरोधातील लढाईत भारताचा नैसर्गिक मित्र म्हणून खंबीरपणे उभा राहिला आहे. आज भारताचे परराष्ट्र धोरण हे कोण्या एका कुटुंबाच्या 'हायकमांड' संस्कृतीतून बाहेर पडून 'राष्ट्र प्रथम' या तत्त्वावर चालत आहे. परराष्ट्र मंत्री आणि संबंधित यंत्रणांना निर्णय घेण्याचे पूर्ण स्वातंत्र्य हे मोदी सरकारचे यश आहे.

मराठीत एक म्हण आहे, 'झाकली मूठ सव्वा लाखाची'. आपली उणीव किंवा अभ्यासाचा अभाव जगासमोर येऊ न देणे यातच शहाणपण असते. मात्र, परराष्ट्र धोरणा सारख्या संवेदनशील विषयावर अपरिपक्व भाष्य करून सोनिया गांधींनी स्वतःवरच टीकेची ओढवून घेतली आहे. काँग्रेसने जर खरंच निधर्मी तत्त्वाचे पालन केले असते, तर बांगलादेशातील हिंदूंच्या संरक्षणासाठी त्यांनी केंद्रावर दबाव आणला असता किंवा किमान निषेधाचा सूर तरी आळवला असता. पण केवळ अल्पसंख्याक व्होट बँकेसाठी हिंदूंच्या आक्रोशाकडे दुर्लक्ष करणे हे अत्यंत दुर्दैवी आहे. विरोधकांनी हे समजून घ्यावे की, परराष्ट्र धोरण हे राजकारणाचे साधन नसून ते देशाच्या अस्मितेचे प्रतीक असते.

**अविनाश देशपांडे**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# भाजपच्या प्रियदर्शिनी उईके यांचा दणदणीत विजय

## १२,७१९ मतांची आघाडी







**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ - यवतमाळ नगर परिषदेच्या नगराध्यक्ष व नगरसेवक पदासाठी झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीचा अंतिम निकाल निवडणूक विभागाने जाहीर केला असून, नगराध्यक्ष पदासाठी भारतीय जनता पक्षाच्या उमेदवार प्रियदर्शिनी अशोक उईके यांनी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या प्रियंका मोघे यांचा 12,719 मतांनी पराभव करत दणदणीत विजय मिळवला आहे. पहिल्या फेरीपासूनच उईके यांनी आघाडी घेतली असून ती अखेरपर्यंत कायम ठेवत त्यांनी सर्व प्रतिस्पर्धी उमेदवारांना मागे टाकले. अशी माहिती निवडणूक अधिकारी गोपाल देशपांडे यांनी दिली.

निवडणूक विभागाच्या माहितीनुसार, काँग्रेसच्या प्रियंका मोघे यांनी काही प्रभागांमध्ये विशेषतः प्रभाग क्रमांक 14 ते 18 आघाडी मिळवण्याचा प्रयत्न केला; मात्र निर्णायक टप्प्यावर विजयाची आकडेवारी त्यांच्या बाजूने वळू शकली नाही.

**पक्षीय बलाबल (अंतिम)**

भाजप – 28,
काँग्रेस – 15,
शिवसेना – 07,
वंचित – 03,
प्रहार – 02,
बसपा – 01,
MIM – 01,
अपक्ष – 01

### प्रभागनिहाय निकाल (संक्षेप)

प्रभाग 1: श्रीकृष्ण कांबळे (भाजप), वनिता बडे (काँग्रेस), प्रभाग 2: सविता चव्हाण (काँग्रेस), आनंद गायकवाड (वंचित), प्रभाग 3: मीना मसराम, अश्विन बोपचे (दोन्ही भाजप), प्रभाग 4: साधना काळे (भाजप), पिंटू बांगर (शिवसेना), प्रभाग 5: आकाश परतेकी, शोभा साबळे (दोन्ही शिवसेना), प्रभाग 6: वैशाली सवाई, विशाल पावडे (दोन्ही काँग्रेस), प्रभाग 7: करुणा तेलंग (काँग्रेस), श्रद्धा भडके (भाजप), प्रभाग 8: लता ठोंबरे, किरण प्रजापती (दोन्ही भाजप), प्रभाग 9: चैताली बेलोकार, पूजा गायकी (दोन्ही शिवसेना), प्रभाग 10: मीरा वीर, नीरज वाघमारे (दोन्ही वंचित), प्रभाग 11: स्वाती खंडारे, देविदास अराठे (दोन्ही भाजप), प्रभाग 12: विजय राय, मनीषा भावे (दोन्ही भाजप), प्रभाग 13: सुभाष राय, शोभा हर्षे (दोन्ही भाजप), प्रभाग 14: साधना शंभरकर (काँग्रेस), विपुल खोब्रागडे (बसपा), प्रभाग 15: मो. शाहीन मतीन परवीन, मो. शाकीर मो. नजीब (दोन्ही काँग्रेस), प्रभाग 16: जावेद अन्सारी (काँग्रेस), शे. अंजुम परवीन (MIM), प्रभाग 17: शाह तबस्सूम (काँग्रेस), भारत ब्राम्हणकर (अपक्ष), प्रभाग 18: अनुप नैताम, अमृता तिवारी (दोन्ही काँग्रेस), प्रभाग 19: मुन्ना दुबे, सोनाली तिडके (दोन्ही भाजप), प्रभाग 20: माया शेरे, दत्ता कुलकर्णी (दोन्ही भाजप), प्रभाग 21: चंदू चौधरी (भाजप), सपना उपगनलावार (शिवसेना), प्रभाग 22: प्रियंका भवरे, नितीन गिरी (दोन्ही भाजप), प्रभाग 23: प्रमोद बगाडे (काँग्रेस), संगीता बोबडे (भाजप), प्रभाग 24: शैला मिर्झापुरे, भास्कर केळापुरे (दोन्ही भाजप), प्रभाग 25: वैशाली उईके, सपना लंगोटे (दोन्ही काँग्रेस), प्रभाग 26: दिलीप काळे, कीर्ती राऊत (दोन्ही भाजप), प्रभाग 27: रिता धावतोडे, पंकज देशमुख (दोन्ही भाजप), प्रभाग 28: अर्चना चिंडाले (भाजप), लोकेश इंगोले (शिवसेना), प्रभाग 29: सोनाली मडावी, बिपीन चौधरी (दोन्ही प्रहार) निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या या अंतिम निकालांनुसार यवतमाळ नगर परिषदेवर भाजपचे स्पष्ट वर्चस्व प्रस्थापित झाले असून, आगामी कार्यकाळात नगरविकासाच्या दृष्टीने धोरणात्मक निर्णयांना गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

# उमरखेडात जनशक्तीचा विजय

## नगराध्यक्षपदी तेजश्री जैन यांचा दणदणीत विजय, भाजपा नेते नितीन भुतडा यांच्या पत्नी नीधी भुतडा पराभूत



**जनमाध्यम प्रतिनिधी**

उमरखेड - उमरखेड नगरपरिषदेच्या निवडणुकीची मतमोजणी आज दुपारी दोन वाजता चा सुमारास पार पडली यामध्ये काँग्रेस,उबाठा व विदर्भ मराठवाडा विकास आघाडी प्रणित जनशक्ती पॅनेलच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार तेजश्री संतोष जैन 11 103 मते यांनी भाजपा नेते नितीन भुतडा यांच्या पत्नी निधी भुतडा 10, 119 मते यांच्यावर 984 मतांनी मतांनी दणदणीत विजय मिळविला . या निवडणुकीसाठी तेरा प्रभागातून 26 उमेदवार रिंगणात होते यामध्ये जनशक्ती पॅनलचे 17 तर भाजपाचे 9 उमेदवार विजयी झाले.

नगरसेवक पदासाठी जनशक्तीचे 17 तर 9 जागी भाजपाचे कमळ फुलले !

तब्बल 9 वर्षाच्या प्रतिक्षेनंतर झालेल्या नगर परिषदेच्या निवडणूकीची प्रतिक्षा आज संपन्न झालेल्या मतमोजणीनंतर संपुष्टात आली .दि 2 डिसेंबर रोजी मतदान झाल्यानंतर न्यायालयाच्या आदेशानुसार आज दि . 2 1 डिसेंबर रोजी मतमोजणी पार पडली .यामध्ये प्रभाग क्रमांक 1 मध्ये भाजपाचे सुरेंद्र कोडगीरवार व जनशक्ती पॅनलचे संदिप ठाकरे यांना समसमान मते पडल्याने ईश्वर चिठ्ठीवर भाजपाचे सुरेंद्र कोडगिरवार हे निवडून आल्याची जाहीर करण्यात आले . दुसऱ्या जागेसाठी ज्योत्स्ना प्रतिक रुडे यांचा विजय झाला . प्रभाग क्र 2 मध्ये जनशक्ती पॅनलचे अ . गणीशाहा अन्वर अलि शाहा व फरजाना सैयद रहिम हे दोन्ही उमेदवार विजयी झाले .प्रभाग क्रमांक तीन मध्ये जनशक्ती पक्षाचे नाजेरा परविन शे अकील व मो . साजीदउल्ला जागीरदार यांनी विजय मिळवला . प्रभाग क्र . 4 मध्ये जनशक्ती पॅनलचे रूपाली सुधीर कवाने, व गणेश शामराव खंदारे यांचा विजय झाला . प्रभाग क्र 5 मध्ये जनशक्ती पॅनलचे वीरेंद्र यशवंत खंदारे तर भाजपच्या वंदना सचिन घाडगे यांचा विजय झाला . प्रभाग क्र 6 मध्ये जनशक्ती पॅनलचे कविता राहुल काळबांडे , व भाजपचे विजय हर्डफकर हे विजयी झाले .प्रभाग क्रमांक 7 मध्ये जनशक्ती पॅनलचे प्रकाश शिकारे व स्वाती गजेंद्र ठाकरे हे विजयी झाले . प्रभाग क्र 8 मध्ये भाजपाचे खुशबू पवन मेंढे व अमोल तिवरंगकर हे विजयी झाले . प्रभाग क्र 9 मध्ये जनशक्ती पॅनलचे राधा कैलास इंगोले व भाजपाचे गोपाल कलाने हे विजयी झाले . प्रभाग क्र . 10 मध्ये भाजपाचे करुणा पुंडलीक कुबडे व भास्कर साधू हे दोन्ही उमेदवार निवडून आले. प्रभाग 11 मध्ये जनशक्ती पॅनलचे गजानन रासकर व वैष्णवी सागर लाहेवार हे विजयी झाले . प्रभाग 12 मध्ये जनशक्ती पॅनलच्या शबाना फरीन वासीफ पठाण , व शेख रसुल शेख वाहेद हे दोन्ही उमेदवार विजयी झाले . प्रभाग क्र 13 मध्ये जनशक्ती पॅनलचे कुरेशी जुबेर शेख समद व मरियम स. इब्राहिम हे विजयी झाले . नगरसेवक पदासाठी जनशक्ती पॅनलचे 17 तर भाजपाचे 9 उमेदवार निवडून आले.

जनशक्ती पॅनेलच्या या विजयामुळे सन 2014 पासून सातत्याने पराभवांचा ससेमिरा सोसणाऱ्या काँग्रेसला नवी पालवी फुटली असून काँग्रेसने उबाठा व विदर्भ मराठवाडा विकास आघाडी प्रणित पॅनेल तयार करून भाजपावर यशस्वीरित्या कुरघोडी करीत नगरपरिषदेवर सत्ता प्रस्थापित केली व पॅनेलच्या विजयासाठी प्रदेश सरचिटनीस साहेबराव कांबळे , तातु देशमुख , राम देवसरकर , दत्तराव शिंदे , नंदकिशोर अग्रवाल , बाळासाहेब नाईक ,इनायत उल्ला जनाब , उबाठाचे ॲड . बळीराम मुटकुळे , अजय नरवाडे , नितीन शिंदे , गोपाल अग्रवाल यांच्यासह जनशक्ती पॅनलच्या कार्यकर्त्यांनी निवडणूक काळात अथक परिश्रम घेतले.

# पांढरकवडा नगर परिषद २०२५ : चुरशीच्या लढतीत भाजपा उमेदवार आतिश उर्फ सोनू बोरेले यांचा २०३ मतांनी ऐतिहासिक विजय

**जनमाध्यम प्रतिनिधी**

पांढरकवडा - नगर परिषद २०२५ च्या नगराध्यक्ष पदासाठी झालेल्या अत्यंत चुरशीच्या व लक्षवेधी निवडणुकीत भारतीय जनता पक्षाचे उमेदवार आतिश उर्फ सोनू लक्ष्मणराव बोरेले यांनी अखेर २०३ मतांच्या फरकाने विजय मिळवत शहराच्या राजकारणात नवा इतिहास रचला. एकूण सात उमेदवार रिंगणात असलेल्या या निवडणुकीत शेवटच्या फेरीपर्यंत मतमोजणीमध्ये प्रचंड चढ-उतार पाहायला मिळाले.

अखेर भाजपाचे उमेदवार अतिश उर्फ सोनू बोरेले यांनी बाजी मारत नगराध्यक्षपदावर आपले नाव कोरले. या विजयामागे केवळ प्रचार नव्हे,तर मागील सहा-सात महिन्यांपासून सुरू असलेली सातत्यपूर्ण तयारी आणि जनतेशी थेट संवाद कारणीभूत ठरल्याचे शहरात बोलले जात आहे.



श्रावण महिन्यातील कावड यात्रेचे आयोजन,स्वखर्चाने ट्रॅक्टर लावून शहरातील गल्लीबोळांमधील कचरा व घाण उचलण्याचे प्रत्यक्ष काम,तसेच नवरात्रोत्सवात दांडिया कार्यक्रमाचे आयोजन करून भक्तिमय वातावरण निर्माण करण्यास त्यांनी पुढाकार घेतला.या सर्व उपक्रमांची पोचपावती म्हणून मतदारांनी भरघोस पाठिंबा देत त्यांच्या झोळीत मते टाकली. पांढरकवडा नगरपालिकेत यापूर्वी बोरेले परिवारातील नारायणराव बोरेले आणि संतोष बोरेले यांनीही नगराध्यक्षपद भूषवले आहे.नवनिर्वाचित नगराध्यक्ष सोनू बोरेले हे थेट जनतेतून निवडून आलेले नगराध्यक्ष ठरले आहेत.या निवडणुकीत शहरातील ११ प्रभागांतून एकूण २२ नगरसेवक निवडून द्यायचे होते.त्यामध्ये शिवसेना (शिंदे गट) – १६ नगरसेवक,भाजपा – ६ नगरसेवक असे चित्र समोर आले.काँग्रेसला मात्र एकही नगरसेवक निवडून आणता आला नाही. तरीही नगराध्यक्षपदावर भाजपाच्या उमेदवाराचा विजय झाल्याने मतदारांनी मोठ्या प्रमाणावर क्रॉस व्होटिंग केल्याचे स्पष्टपणे दिसून आले.अनेक मतदारांनी नगरसेवकांसाठी वेगवेगळ्या पक्षांना मत दिले,मात्र नगराध्यक्षपदासाठी सोनू बोरेले यांनाच पसंती दिली.

नगराध्यक्ष पदासाठी उमेदवार व त्यांना मिळालेली मते : किशोर कनाके (उबाठा) – २९०, नौशाद तवर (एमआयएम) – १४०, ॲड. विनोद तिवारी (काँग्रेस) – १,४८६, डॉ.अभिनय नहाते (शिवसेना – शिंदे गट) – ७,६२६, शंकर बडे (अपक्ष) – १,०६६, सोनू बोरेले (भाजपा) – ७,८२९, मोहन म्यानेवार (अपक्ष) – ५२, नोटा – ९१

सदस्य पदी निवडून आलेल्या उमेदवाराचे नाव : प्रभाग क्र.१ अ.गेडाम कल्पना रमेश शिवसेना, प्रभाग क्र.१ ब.जिड्डेवार प्रफुल मोरेश्वर शिवसेना, प्रभाग क्र.२ अ.कडू भाग्यश्री रवींद्र शिवसेना, प्रभाग क्र २ ब.चिंचाळकर निलेश उत्तमराव शिवसेना, प्रभाग क्र.३ अ.वातीले मंगेश रमेश भाजपा, प्रभाग क्र.३ ब.बोकीलवार प्रियंका स्वप्निल भाजपा, प्रभाग क्र.४ अ.शेंडे जयश्री अतिश शिवसेना, प्रभाग क्र.४ ब.खान शैनीला सबरीन समीर शिवसेना, प्रभाग क्र.५ अ.कर्णेवार योगेश माधव शिवसेना, प्रभाग क्र.५ ब.बाजोरीया शीतल संदीप भाजपा, प्रभाग क्र.६ अ.कुटकलवार रुपेश राजा भाजपा, प्रभाग क्र.६ ब.नक्षणे दिपाली दिपक शिवसेना, प्रभाग क्र.७ अ.कटकमवार सुरेखा रमेश शिवसेना, प्रभाग क्र.७ ब.मोहंमद युसुफ मोहंमद शब्बीर शिवसेना, प्रभाग क्र.८ अ.चितार्लेवार रेखा रामभाऊ भाजपा, प्रभाग क्र८ ब.चव्हाण अतिश तानाजी शिवसेना, प्रभाग क्र.९ अ.धुर्वे गणेश गोवर्धन शिवसेना, प्रभाग क्र.९ ब.गटलेवार सविता किशोर शिवसेना, प्रभाग क्र.१० अ.बोरेले अनिल भगवान भाजपा, प्रभाग क्र.१० ब.जाधव लक्ष्मी सतीश शिवसेना, प्रभाग क्र.११ अ.कुडमथे करिश्मा पवन शिवसेना, प्रभाग क्र.११ ब.काझी सरफरजुद्दीन एनुदिन शिवसेना.

# नेर नगर परिषद निवडणुकीमध्ये दिग्गज उमेदवारांना हादरे..!

## कोणत्याही पक्षाला बहुमत नाही अध्यक्षपदी सुनीता पवन जयस्वाल यांची दुसऱ्यांदा वर्णी, अनेक नवीन चेहऱ्यांना संधी

**जनमाध्यम प्रतिनिधी**

नेरपरसोपंत - नेर नगर परिषद निवडणुकीचा निकाल नुकताच हाती आला असून त्यात कोणत्याही पक्षाला बहुमत मिळाले नसून त्यात मतदारांनी अनेक नवीन चेहऱ्यांना संधी मात्र दिली असून अनेक दिग्गज मात्र या निवडणुकीत पराभूत झालेत. तर अध्यक्षपदी सुनीता पवनलाला जयस्वाल यांची दुसऱ्यांदा वर्णी लागली आहे त्यांनी पंचायत समितीचे माजी सभापती व विद्यमान नगरसेवक नितीन माकोडे यांच्या पत्नी जयश्री नितीन माकोडे यांचा तब्बल 3187 मतांनी पराभव केला.

गेल्या अडीच वर्षापासून प्रलंबित असलेल्या नगरपालिका निवडणुकीचा निकाल आज घोषित करण्यात आला असून अनेक प्रभागात निकाल अनपेक्षित लागले आहेत. कुण्याही राजकीय पक्षाला बहुमत मिळाले नसून शिवसेना शिंदे गट 5 अपक्ष 5 भारतीय राष्ट्रीय काँग्रेस 4 बीजेपी 2 प्रहार जनशक्ती पक्ष 1 उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना 2 ए आय एम आय एम 2 असे संख्याबळ असून भारतीय जनता पार्टीला 2 जागेवर विजय प्राप्त झाला असून मिरच्या इतिहासात पहिल्यांदाच त्यांना विजय प्राप्त झाला आहे. विजयी उमेदवार प्रामुख्याने प्रभाग क्रमांक एक अ मध्ये शिवसेना शिंदे पक्षाच्या सुनंदा प्रेमदास चव्हाण 982 मतदान प्राप्त झाले असून




प्रभाग क्रमांक एक ब मध्ये अपक्ष उमेदवार सचिन कैलासराव कराळे 938, प्रभाग क्रमांक दोन मध्ये संदीप विश्वंभर गायकवाड 802 मते घेऊन विजयी झालेत, तर त्याच प्रभागांमध्ये सौ त्रिवेनी रुपेश दुधे अपक्ष उमेदवार एकूण 548 मते घेऊन विजयी झालेत. तर प्रभाग क्रमांक तीन मध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या शेख आयाऋणीस सलीम 798, तर भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचेच शेख शोएब अहमद खान 755, प्रभाग क्रमांक चार मध्ये प्रहार जनशक्ती पक्षाचे गौरव दिलीपराव नाईकर 944, तर भाजपच्या शिवानी निशांत गोगलिया 854 मतदान घेऊन विजय झाल्यात, प्रभाग क्रमांक पाच मध्ये सौ काजल वैभव बगमारे 807, कर शिवसेना शिंदे गटाचे पवन शामलाल जयस्वाल यांना 649 मते घेऊन विजयी झालेत, प्रभाग क्रमांक सहा मध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे खान सिकंदर खान जमीर खान यांना 917, तर प्रभाग क्रमांक सहा ब मध्ये शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या शेख शमाबी निजाम 977 मध्ये घेऊन विजयी झाल्यात, प्रभाग क्रमांक सात मध्ये अपक्ष उमेदवार कमर जहा मोहम्मद राहील 440,तर प्रभाग क्रमांक सात ब मध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे मोहम्मद काशीद फराज मोहम्मद फारूक 664, तर प्रभाग क्रमांक आठ अ व ब मध्ये ए आय एम आय एम या पक्षाच्या दोन उमेदवार प्रामुख्याने अनुक्रमे आफरीन वाजिद खान 879, तनवीर खान शेरे अफगान खान 868 मध्ये घेऊन विजयी झालेत, प्रभाग क्रमांक 9 मध्ये अपक्ष उमेदवार प्रवीण विजयलाला जयस्वाल 657, तर प्रभाग क्रमांक 9 ब मध्ये भारतीय जनता पार्टीच्या सोनाली संतोष गुल्हाने 592 मतदान घेऊन विजयी झाल्यात, प्रभाग क्रमांक दहा अ मध्ये अपक्ष उमेदवार श्रुती सौरभ भोयर 1017, प्रभाग क्रमांक दहा ब मध्ये शिवसेना शिंदे गटाच्या सौ रीना पंकज गुल्हाने 1454, तर प्रभाग क्रमांक 10 क मध्ये शिंदे गटाचे शालिक उत्तमराव गुल्हाने 1137 मते घेऊन विजयी झालेत. सर्व पक्षांच्या उमेदवारांनी विजय मिरवणूक काढली असून नेर शहरात आनंदाचे वातावरण पसरले आहे.

# ढाणकी नगरपंचायत निवडणूक निकाल: भाजपचे वर्चस्व, मात्र नगराध्यक्षपदी शिवसेनेची (ठाकरे गट) बाजी

**जनमाध्यम प्रतिनिधी**

ढाणकी - नगरपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकीचा निकाल आज जाहीर झाला. या निवडणुकीत प्रभागनिहाय लढतीत भारतीय जनता पक्षाने सर्वाधिक ७ जागा जिंकून आपले वर्चस्व निर्माण केले असले, तरी नगराध्यक्षपदाच्या थेट निवडणुकीत मात्र शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या अर्चना सूर्यकांता वासमवार यांनी मोठ्या मताधिक्याने विजय मिळवत सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे.

नगराध्यक्ष पदाचा निकाल : नगराध्यक्षपदासाठी झालेल्या अत्यंत चुरशीच्या लढतीत शिवसेना (ठाकरे गट) उमेदवार अर्चना सूर्यकांता वासमवार यांना ३२०० मते मिळाली. त्यांनी भाजपच्या उमेदवार सुनंदा रमेश गायकवाड (२६४९ मते) यांचा पराभव केला. प्रभागनिहाय सविस्तर निकाल : प्रभाग



१: निमलवाड परमेश्वर गंभीर (भाजप - २४५ मते) विजयी. पराभूत: मिटकरे प्रदीप काशिनाथ (काँग्रेस - १३२). प्रभाग २: रातोळे नागनाथ संभाजी (भाजप - २०१ मते) विजयी. पराभूत: सोनुने संतोष आनंदा (शिवसेना शिंदे गट - १३५). प्रभाग ३: कांबळे सारिका विनोद (भाजप - २९७ मते) विजयी. पराभूत: गायकवाड बेबी उत्तम (शिवसेना उबाठा - १५३). प्रभाग ४: चंद्रे मल्हार महेश (भाजप - २७९ मते) विजयी. पराभूत: चंद्रे वसंतराव नारायण (काँग्रेस - १९१). प्रभाग ५: योगेवर उमेश गंगाधर (भाजप - २७३ मते) विजयी. पराभूत: नरवाडे राहुल विश्वासराव (काँग्रेस - १५०). प्रभाग ६: रहेमान यास्मिन अख्तर मुनवर (एमआयएम - २१६ मते) विजयी. पराभूत: बशनुर बी खलील (अपक्ष - २०१). प्रभाग ७: ढोबळे रविशंकर गुणाजी (शिवसेना शिंदे गट - २६५ मते) विजयी. पराभूत: हर्षवर्धन सुभाष गायकवाड (अपक्ष - १४४). प्रभाग ८: शेख नफीसाबी इमरान (काँग्रेस - ३२१ मते) विजयी. पराभूत: मोतेवर शांताबाई व्यंकटी (शिवसेना शिंदे गट - २९०). प्रभाग ९: चौरे प्रफुल सुभाष (शिवसेना शिंदे गट - २७३ मते) विजयी. पराभूत: गजानन अशोकराव चंद्रे (काँग्रेस - २१२). प्रभाग १०: शेख रिजवाना परवीन समीर (एमआयएम - १३९ मते) विजयी. पराभूत: शेख तबसूम बानू इनुस (अपक्ष - १०९). प्रभाग ११: शेख फर्जना बी शादुल (एमआयएम - २२५ मते) विजयी. पराभूत: पठाण ताजबी शहानुर खा (भाजप - १५२). प्रभाग १२: गंगरपाडा रेखा अनिल (भाजप - २५२ मते) विजयी. पराभूत: गोपेवाड गीता विनोद (काँग्रेस - १५९). प्रभाग १३: मनतेवाड दुर्गा साईनाथ (भाजप - २२५ मते) विजयी. पराभूत: कूसरे अनिल दत्तात्रेय (शिवसेना ठाकरे गट - १८३). प्रभाग १४: गोटलेवाड रोहिणी लक्ष्मण (अपक्ष - १६४ मते) विजयी. पराभूत: ताटी कुंडलवार दिपाली परमेश्वर (काँग्रेस - १०४). प्रभाग १५: शेख शाहिदाबी मिरांजी (अपक्ष - २३९ मते) विजयी. पराभूत: शेख अमिनाबी सुलतान (काँग्रेस - १५९). प्रभाग १६: बीबी हजरा शेख एजाज (काँग्रेस - ३०६ मते) विजयी. पराभूत: मुनेश्वर अश्विनी काशिनाथ (भाजप - २५१). प्रभाग १७: श्री दत्तदिगंबर वानखेडे (अपक्ष - २०१ मते) विजयी. पराभूत: डॉक्टर नरेश गंदेवार (भाजप - १८९).

# पुसदमध्ये राष्ट्रवादीने नगराध्यक्षसह आपला गड राखला !

## निलय नाईकांच्या तिकीट वाटपावरून भाजपला फटका?

पुसद - पुसद नगरपरिषद सार्वत्रिक २०२५ निवडणुकी मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित पवार गट) यांनी नगराध्यक्ष सौ मोहिनी इंद्रानील नाईक ह्या विजय होऊन आपला गड बालेकिल्ला काबीज केला आहे.

आज दिनांक २१ डिसेंबर रोजी नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुकी मध्ये २ डिसेंबर रोजी झालेल्या मतदानाची मतमोजणी होऊन यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित पवार गट)यांचे नगराध्यक्षसह १४ नगरसेवक विजयी झाले आहे तसेच महाविकास आघाडीच्या ९ नगरसेवक व भारतीय जनता पार्टीचे पाच नगरसेवक आणि शिवसेना (शिंदे गट)व शिवसेना (उबाठा गट) यांचे मात्र खाते सुद्धा उघडले नाही. त्यामुळे पुसद नगरपरिषद निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित पवार गट)यांनी आपले वर्चस्व कायम ठेवून बहुमताने सत्ता काबीज केली आहे. संपूर्ण देशात सर्वात मोठा पक्ष म्हणून उद्यास आलेला भारतीय जनता पक्षात यावेळी मागील दहा ते पंधरा वर्षापासून पक्षात असलेले निष्ठावंतांना डावलून वेळेवर आयाराम यांना तिकीट दिल्यामुळे पक्षात मोठे बंड झाले आणि यामुळे पक्षाचे 'तीन तेरा' वाजल्याचे चित्र निर्माण झाले आहे.२०१६-१७ मध्ये पक्षात आलेल्या ॲड. निलय नाईक यांनी १५ ते २० वर्षांपासून पक्ष वाढवणाऱ्या निष्ठावंतांवर अन्याय केल्याचा आरोप होत आहे. स्वतःच्या सोयीच्या राजकारणासाठी निलय नाईक यांनी भाजपचे 'हिंदुत्व' चक्क बंगल्याच्या वेशीवर नेऊन टांगले असल्याची सर्वत्र चर्चा शहरात सुरू आहे. मागील झालेल्या निवडणुकीत २०१६ च्या तुलनेत भाजपाचे नगरसेवक हे १० निवडून आले होते परंतु आज अर्ध्यावर येऊन पाच नगरसेवक हे ही मोठ्या काट्याच्या लढतीमध्ये निवडून आले आहे. त्यामुळे भाजपच्या पुसद येथील नेतृत्वावर प्रश्नचिन्ह निर्माण झाला आहे. निवडणुकीच्या तोंडावर भाजपमधील ७५ टक्के निष्ठावान पदाधिकारी आणि कार्यकर्ते उमेदवारी न मिळाल्याने नाराज




होऊन काही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात(अ.प.) गेले तर काही तूतारी(शरद पवार )गटामध्ये प्रवेश करून निवडणूक लढविण्यामुळे हा भाजपला मोठा फटका बसला आहे. राष्ट्रवादीच्या उमेदवार मोहिनी नाईक यांना मदत करण्यासाठीच भाजपने जाणीवपूर्वक डमी उमेदवार दिल्याची चर्चा निवडणुकीच्या तोंडावर राजकीय वर्तुळात होती. याचाच फटका नगराध्यक्ष पदाचे उमेदवार निखिल चिद्दरवार यांना बसला आहे, निलय नाईक यांच्या या पक्षपात व संधीसाधू राजकारणामुळे भाजपचे हाल झाले असून, संघ परिवारही या घडामोडींवर नाराज असल्याचे बोलले जात आहे. भाजपच्या या अंतर्गत कलहामुळे भाजपचे उमेदवार निखिल चिद्दरवार आणि राष्ट्रवादीच्या मोहिनी नाईक यांच्यामध्ये नगराध्यक्षाची थेट लढत होऊन भाजपचे नगराध्यक्ष विजयी होईल अशी सर्वांना आशा होती मात्र असे न होता. महाविकास आघाडीचे डॉ.मोहम्मद नदीम आणि राष्ट्रवादीच्या मोहिनी नाईक यांच्यात काट्याची लढत होऊन अगदी शेवटच्या क्षणी डॉ.मोहम्मद नदीम यांचा ६४५ मतांनी पराभव झाला. मागील निवडणुकीच्या तुलनेत ३नगर सेवक भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे निवडून आले होते, यावेळेस महाविकास आघाडीचे मात्र नऊ नगरसेवक निवडून आले त्यामुळे त्यांची राजकीय ताकद वाढलेली दिसून येत आहे. आणि भाजपचे पाच नगरसेवक कमी झाले यामुळे पुसद शहरातून भाजप पक्ष हा हद्दपार होण्याचे अनेक राजकीय तज्ञ लोकानी मत व्यक्त केले आहे. मागील वेळेस पाहता महायुतीमध्ये लढलेल्या शिवसेना शिंदे गटाचे चार नगरसेवक निवडून आले होते.

### अपक्ष उमेदवाराचा ऐतिहासिक विजय.. जनतेच्या विश्वासाने दिग्गजांची धूळधाण

# जनतेच्या कौलाने राजकीय गणिते कोलमडली

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ - यवतमाळ नगरपरिषद निवडणुकीत प्रभाग क्रमांक १७ मधून अपक्ष उमेदवार भरत ब्राह्मणकर यांनी मिळवलेला विजय हा केवळ निवडणूक निकाल नसून, तो प्रस्थापित राजकारणाला दिलेला थेट इशाराच ठरला आहे. वर्षानुवर्षे राजकीय वर्चस्व गाजवणाऱ्या अनुभवी व बलाढ्य उमेदवाराला पराभवाची चव चाखवत, ब्राह्मणकर यांनी जनतेच्या विश्वासाच्या जोरावर ऐतिहासिक बाजी मारली.

पक्षीय ताकद, पैसा, मोठी यंत्रणा आणि राजकीय वजनदार नावे रिंगणात असतानाही मतदारांनी अपक्ष उमेदवाराला निवडून देत काम करणारा कार्यकर्ता महत्त्वाचा, पक्ष नव्हे असा ठोस संदेश दिला आहे. या निकालामुळे संपूर्ण यवतमाळच्या राजकीय वर्तुळात खळबळ उडाली असून, अनेक



समीकरणे बदलण्याची चिन्हे स्पष्ट दिसत आहेत. भारत ब्राह्मणकर यांनी यापूर्वी सुमारे अनेक वर्षे भाजपमध्ये सक्रिय कार्यकर्ता म्हणून काम केले आहे. माजी आमदार मदन येरावर यांना ते आजही आपले राजकीय गुरु मानतात. मात्र, प्रभागात दीर्घकाळ प्रामाणिकपणे काम करूनही पक्षाकडून डावलले गेल्याने त्यांनी अपक्ष म्हणून रणांगणात उडी घेतली. पक्षाच्या अधिकृत उमेदवारा विरोधात थेट लढत देत, कामाची पावती मतपेटीतून मिळवण्यात ते यशस्वी ठरले. निवडणूक काळात तणावपूर्ण वातावरण, कुटुंबासह धमक्यां, आरोप,त्यामुळे पोलिस संरक्षणाची आवश्यकता भासली अशा अनेक अडचणी असूनही ब्राह्मणकर डगमगले नाहीत. हिंदू, मुस्लिम आणि बौद्ध समाजाची मिश्र लोकसंख्या असलेल्या भोसा परिसरात त्यांनी सामाजिक सलोखा जपत, प्रत्येक घटकापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला. हाच त्यांचा सर्वात मोठा विजयाचा पाया ठरला. पाणीपुरवठा, वीज, स्वच्छता, कचरा व्यवस्थापन यांसारख्या मूलभूत प्रश्नांवर सातत्याने आवाज उठवणारा, रस्त्यावर उतरून काम करणारा कार्यकर्ता अशी त्यांची ओळख मतदारांमध्ये पक्की झाली होती. त्यामुळेच या प्रभागाकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले होते. विजयानंतर बोलताना भारत ब्राह्मणकर म्हणाले,हा विजय माझा नसून, प्रभागातील ज्येष्ठ नागरिक, कार्यकर्ते आणि सामान्य जनतेचा आहे. ज्यांच्यापर्यंत कुणी पोहोचत नाही, त्यांच्यापर्यंत पोहोचणे हेच माझे राजकारण राहील.

# गोदावरी अर्बनला 'ग्रीन वर्ल्ड को-प्राईड पुरस्कार' प्रदान

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ - जागतिक सहकार वर्ष २०२५ निमित्त ग्रीन वर्ल्ड व कॉसमॉस बँक यांच्या संयुक्त विद्यमाने पुणे येथे आयोजित सहकार संमेलनात गोदावरी अर्बन नागरी सहकारी पतसंस्थेला सहकार क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल 'ग्रीन वर्ल्ड को-प्राईड पुरस्कार' प्रदान करण्यात आला. हा प्रतिष्ठित पुरस्कार महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री नामदार बाळासाहेब पाटील, राज्य सहकारी बँकेचे मुख्य प्रशासक विद्याधर अनास्कर तसेच कॉसमॉस बँकेचे अध्यक्ष प्रल्हाद कोकरे यांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आला.

यावेळी गोदावरी अर्बनचे सचिव ॲड. रविंद्र रगटे, उपसरव्यवस्थापक रवि इंगळे, विजय शिरमेवार, वरिष्ठ मार्केटिंग अधिकारी महेश केंद्रे तसेच पुणे शाखेचे व्यवस्थापक अंकुश बिबेकर यांनी हा पुरस्कार स्वीकारला. यावेळी सहकार मंत्री नामदार बाळासाहेब पाटील यांनी गोदावरी अर्बनच्या कार्यपद्धतीचे



विशेष कौतुक करत, संस्थेने सहकार क्षेत्रात आदर्श निर्माण केल्याचे गौरवोद्गार काढले. सहकार क्षेत्रात पारदर्शकता, आधुनिक व्यवस्थापन प्रणाली, सभासदाभिमुख सेवा तसेच सातत्यपूर्ण प्रगती या माध्यमातून गोदावरी अर्बनने केलेल्या कार्याची दखल घेत हा सन्मान प्रदान करण्यात आला. या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक नामदार हेमंत पाटील तसेच अध्यक्ष राजश्री पाटील यांनी गोदावरी अर्बनचे व्यवस्थापकीय संचालक धनंजय तांबेकर, समस्त संचालक मंडळ, अधिकारी, कर्मचारी वृंद तसेच सर्व सभासद व ठेवीदार यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले. हे यश संघभावना, प्रामाणिक कार्यपद्धती आणि सभासदांनी दाखविलेल्या विश्वासाचे फलित असल्याचे त्यांनी नमूद केले.

# घाटंजीत भाजपासाठी गड आला, पण सिहं गेला...

## घाटंजी नगर परिषदेत अध्यक्ष काँग्रेसचा तर सत्तेची चाबी भाजपाकडे

**जनमाध्यम प्रतिनिधी**

घाटंजी - महाराष्ट्रातील झालेल्या नगर परिषद निवडणुकीमध्ये घाटंजीत काँग्रेसचे श्री परेश कारिया 511 मतांनी विजयी झालेत. तर भाजपच्या 20 नगरसेवकापैकी 12, काँग्रेस 06, वंचित बहुजन आघाडी 01व अपक्ष 01 असे उमेदवार निवडून आलेत.त्यामुळे घाटंजीत भाजपसाठी गड आला पण सिहं गेला अशी स्थिती निर्माण झाली.

प्रभाग क्रमांक एक पासूनच काँग्रेसचे परेश कारिया यांनी मतमोजणीत आघाडी घेतली तर ती प्रभाग क्रमांक 10 पर्यंत कायम ठेवत एकूण 4957 मते घेत विजय संपादन करत भाजपचे उमेदवार महेश पवार (4446) मते यांचा 511 मतांनी पराभव केला. एकूण 20 नगरसेवकांपैकी भाजपचे 12 नगरसेवक निवडून आलेत, तर काँग्रेस



चे 06,वंचित बहुजन पक्ष 01, व अपक्ष 01, अशाप्रकारे विजयी झालेत. प्रभाग निहाय उमेदवारांना मिळालेली मते पुढीलप्रमाणे : प्रभाग क्र. 1 अ (भाजपा) नम्रता मेश्राम ( मंगाम ) 384 मते, 1 ब (अपक्ष) विक्रमसिंग ठाकूर 421 मते, प्रभाग क्र. 02 अ ( काँग्रेस ) संगीता भुरे 771 मते, प्रभाग क्र. 2 ब ( काँग्रेस) सोनल परेश करिया 678 मते, प्रभाग क्र. 3 अ ( भाजपा) बंटी मराठे 629 मते, प्रभाग क्र. 3 ब (भाजपा) सोनल अंकुश ठाकरे 733 मते, प्रभाग क्र. 4 अ( भाजपा) भारती कुंटलवार, प्रभाग क्र. 4 ब ( काँग्रेस) परेश करिया 604 मते, प्रभाग क्र. 5 अ ( भाजपा) शुभम उदार 425 मते, प्रभाग क्र. 5 ब ( काँग्रेस ) खालिदा तबस्सूम रमीद सय्यद, 437 मते,प्रभाग क्र. 06 अ ( भाजपा ) किरण प्रधान 488 मते, प्रभाग क्र. 06 ब ( भाजपा) हनुमान भोजवार 476 मते, प्रभाग क्र. 07 अ ( भाजपा) स्वेता दिकुंडवार 457 मते, प्रभाग क्र. 07 ब ( भाजपा) निखिल देठे 565 मते, प्रभाग क्र. 08 अ ( भाजपा) आशा गिरी 503 मते, प्रभाग क्र. 08 ब ( भाजपा) गोपाल काळे, 441 मते, प्रभाग क्र. 09 अ ( काँग्रेस) करण तोडसाम 561 मते, प्रभाग क्र. 09 ब ( काँग्रेस) पंकजा कहाळे 734 मते, प्रभाग क्र. 10 अ ( भाजपा) विश्वास राऊत 483 मते, प्रभाग क्र. 10 ब ( वंचित बहुजन आघाडी) पायल कांबळे 496 मते घेत विजयी झालेत.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठीत सवय

## ई-केवायसीनंतरच मिळणार

# ३१ डिसेंबरपर्यंत करा ई-केवायसी

**अमरावती/का.प्र.**

राज्यात सुरू असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये, राज्य सरकारच्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहाण योजनेअंतर्गत महिलांना मोठी मदत मिळण्याची अपेक्षा आहे. पुढील महिन्यात पात्र महिलांच्या खात्यात दोन महिन्यांचे अनुदान जमा होण्याची अपेक्षा आहे. जिल्हा तसेच संपूर्ण राज्य सध्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये व्यस्त आहे आणि एकाच वेळी दोन महिन्यांचे अनुदान मिळणे हा महिलांसाठी मोठा फायदा ठरेल.



अमरावती जिल्ह्यात सध्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना आहे. या योजनेत ७.३ लाख लाभार्थी आहेत. दरम्यान, सरकारने या योजनेसाठी ई-केवायसी अनिवार्य केले आहे. पात्र महिलांनी ३१ डिसेंबरपर्यंत त्यांचे ई-केवायसी पूर्ण करावे. ज्या महिलांचे ई-केवायसी पूर्ण झाले आहे त्यांनाच १०८ महिला लाभार्थी योजनेसाठी पात्र ठरतील.म्हणून, ज्या महिलांनी अद्याप त्यांचे ई-केवायसी पूर्ण केलेले नाही. त्यांनी ३१ डिसेंबरपूर्वी ही प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक आहे.सध्याच्या निवडणुकीच्या वातावरणात, दोन महिन्यांचा निधी एकाच वेळी वितरित केला जाण्याची दाट शक्यता आहे.

सरकारने यासाठी आवश्यक निधीची व्यवस्था केली आहे, जरी वितरण अद्याप अधिकृतपणे जाहीर झालेले नाही. तथापि, येत्या काही दिवसांत दोन हप्ते वितरित केले जातील अशी दाट शक्यता आहे.

राज्य सरकारने सुरू केलेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहिणी योजनेने सर्व पात्र महिलांसाठी ई-केवायसी अनिवार्य केले आहे. गेल्या काही दिवसांपासून ही प्रक्रिया सुरू आहे आणि सरकारने अंतिम मुदतही वाढवली आहे. आता, ३१ डिसेंबर ही ई-केवायसीसाठी अंतिम तारीख निश्चित करण्यात आली आहे. अशा परिस्थितीत, ज्या महिलांचे ई-केवायसी अद्याप झालेले नाही.

## राष्ट्रीय अल्पसंख्यांक दिन साजरा

**लेहेगाव/वार्ताहर**

विवेकानंद कन्या विद्यालय नेरपिंगळाई येथे राष्ट्रीय अल्पसंख्यांक दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी 'वाचाल तर वाचाल ' जीवनाचे पाथेय दडलेल्या 'वाचन कोपऱ्याचे उद्‌घाटन' नेरपिंगळाई येथील श्री विवेकानंद कन्या विद्यालयात' राष्ट्रीय अल्पसंख्याक दिनाचे औचित्य साधून ज्ञान 'विचार' आणि मूल्यसंवर्धनाचा जागर करणारा देखणा कार्यक्रम अत्यंत उत्साहात झाला.मानवी जीवनाला दिशा देणाऱ्या वाचनाचे महत्व सांगणाऱ्या वाचन कोपऱ्याचे उद्‌घाटन मंजुषा देशमुख यांचे हस्ते करण्यात आले.कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेचे पूजन हारार्पण आणि दीपप्रज्वलन केले. न्याय समता 'स्वातंत्र्य'बंधूता ही मूल्ये प्रगल्भ वाचनानेच साकार होवू शकतात.डॉ बाबासाहेब आंबेडकरांचा मूलमंत्र विद्यार्थ्यापर्यंत पोहचविलात. अल्पसंख्यांक हक्क दिनानिमित्य राष्ट्रीय स्तरावर साजरा केल्या जाणाऱ्या दिवसाचे महत्व आपल्या अभ्यासपूर्ण भाषणातून शिक्षिका प्रीती सावरकर यांनी हा प्रश्न अस्वस्थ करणारा आहे. शालेय विद्यार्थ्यांनी जागरुक वाचक व्हावे. तेव्हाच आपल्याला हक्क आणि अधिकार कळतील. असे विचार आपल्या भाषणातून सांगितलेत.या औचित्याने वक्तृत्व स्पर्धा' विद्यार्थ्यांच्या अभ्यासपूर्ण विचार मंडणीने गाजली.

## गोकुलम गोरक्षण संस्था व पशुसंवर्धन विभाग शिबीर

### २८ पेक्षा जास्त अधिक जनावरांवर उपचार

**अमरावती/का.प्र.**

गोकुलम गोरक्षण संस्था व पशुसंवर्धन विभाग अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य निशुल्क पशू शल्यचिकित्सा शिबिराचे आयोजन गोकुलम गोरक्षण संस्था , नांदुरा बु. अमरावती येथे संपन्न झाले.या शिबिरात गाय, बैल, गोरे, म्हैस, बकरी,कुत्रा, मांजर, बदक, कबूतर व इतर प्राणी व पशुपक्षी वर निशुल्क तपासणी, उपचार व शस्त्रक्रिया करण्यात आली. शिबिरामध्ये २८ पेक्षा जास्त संख्येने ऑपरेशन करण्यात आले त्यात शिंगाचा कॅन्सर, हर्निया, शेपटीचा कॅन्सर, रिंगणीचे ऑपरेशन, ट्यूमर, मूत्र शस्त्रक्रिया, मोस शस्त्रक्रिया व इतर सर्व प्रकारच्या आजाराची सुद्धा तपासणी या शिबिरामध्ये करण्यात आली.शिबिरात पशुसंवर्धन विभाग अमरावती व सेवानिवृत्त पशुवैद्यकीय अधिकारी व तज्ञ डॉक्टर यांनी आपली सेवा प्रदान केली. शिबिराचे उद्‌घाटन डॉ. हेमंत मुरके, डॉ. करुणा मुरके,विनय बोथरा व सर्व डॉक्टरांच्या साक्षीने झाले.शिबिरात सर्व पशूंची तपासणी शस्त्रक्रिया व उपचार खाली सेवानिवृत्त डॉक्टरांनी केले डॉ.बहादुरे, डॉ. पाटील, डॉ. किनगे, डॉ. उंबरकर, डॉ. गिरी, डॉ. जोशी , डॉ. गोरे, डॉ. झोडपे, डॉ. इखार त्याचप्रमाणे पशुसंवर्धन विभागाचे अधिकारी डॉ. वैभव सानप, डॉ. तुषार जयस्वाल , डॉ. हेमंत जाधव, डॉ. पावडे, डॉ. कायंदे, डॉ. खेरडे, डॉ. नितीन राऊत, डॉ. राहूलकर , डॉ. ठोसर, डॉ. देशमुख, डॉ. प्रतीक तरडे, डॉ. जयंत डोंगरे व परिचय चव्हाण यांनी केले. हे शिबिर यशस्वी करण्यासाठी गोकुलम गोरक्षण संस्थेचे किशोर देशमुख,ममता अजमिरे, कुमारी नेहा जैन, अभिषेक मुरके, रवी मुरके, विरेंद्र कोरे, प्रतीक पवार, सुजल देवाळकर, सक्षम इंगळे, ऋषिकेश ठाकरे, दर्शन देवाळकर , धांडे, आदित्य गवई ,अभिजीत वानखडे, यांनी प्रयत्न केले.

# आरेगाव येथील हनुमान मंदिर सभामंडपाचा शुभारंभ

**अचलपूर/का.प्र.**

मेळघाट मतदारसंघांतील अचलपूर तालुक्यातील हरम येथे चंद्रभागा नदीवरील पूर संरक्षण भिंतीच्या बांधकामाचे तसेच माता माय मंदिरासमोरील सभामंडपाच्या बांधकामाचे भूमिपूजन आमदार केवलराम काळे यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी आरेगाव येथील श्री हनुमान मंदिराच्या सभामंडप बांधकामाचाही शुभारंभ करण्यात आला. या सर्व विकासकामांसाठी सुमारे १ कोटी ७६ लाखांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.हरम गावात दरवर्षी चंद्रभागा नदीच्या पुरामुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत होते.



आ केवलराम काळे यांच्या पुढाकाराने पूर संरक्षण भिंत उभारण्यात आल्याने भविष्यातील पूरधोका टळणार असून ग्रामस्थांना दिलासा मिळणार आहे. तसेच माता माय मंदिर परिसरात उभारण्यात येणाऱ्या सभामंडपामुळे भाविकांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध होणार आहेत. व आरेगाव येथील श्री हनुमान मंदिरात उभारण्यात येणाऱ्या सभामंडपामुळे धार्मिक कार्यक्रम, उत्सव व सामाजिक उपक्रम सुलभ होणार आहेत. ग्रामीण भागातील धार्मिक व सांस्कृतिक स्थळांच्या विकासासाठी ही कामे उपयुक्त ठरणार आहेत.याप्रसंगी तालुकाध्यक्ष समीर हावरे, जिल्हा उपाध्यक्ष विशाल काकड, जिल्हा युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष तुषार खेरडे, माजी जिल्हा परिषद सदस्य सुखदेवराव पवार यांच्यासह अमोल जाधव, सागर राठोर, प्रसन्न काठोळे, अजय दुबे, संदीप पाचपोर, शैलेश म्हाला, अविनाश यावले, आकाश मानकर, रोशन मानकर, रमेश सोनोने, राजेशभाऊ अंबाडकर, मनोहरराव टेहरे, नरेंद्र पाटील, हरीभाऊ टेहरे, संजयभाऊ पवित्रकार, उमाकांत कोटे आदी उपस्थित होते. ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली होती.यावेळी आमदार केवलराम काळे यांनी मेळघाट मतदारसंघातील दुर्गम व ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासासाठी शासनाच्या माध्यमातून निधी उपलब्ध करून देण्यात येत असून पूर संरक्षण, धार्मिक स्थळांचा विकास व मूलभूत सुविधा यांना प्राधान्य दिले जात असल्याचे सांगितले.

## अ. भा. आंतर विद्यापीठ कुस्ती (पुरुष) स्पर्धेकरिता विद्यापीठाचा संघ घोषित

**अमरावती** - चंदिगड युनिर्व्हसिटी, मोहाली (पंजाब) येथे ५ ते ९ जानेवारी, २०२६ दरम्यान होणा-या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ कुस्ती फ्रि स्टाईल व ग्रीको रोमन स्टाईल (पुरुष) स्पर्धेकरिता संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा संघ घोषित करण्यात आला आहे.चमूंमध्ये श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय, आसेगांव पूर्णाचा अर्जून यादव व आदम खान, संत भगवानबाबा कला महाविद्यालय, ओंकार मोरे, बी.एन.कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग,ओंकार पवार, युवाशक्ती शा.शि. महाविद्यालय, श्री विठ्ठल रुख्मिणी कला व वाणिज्य महाविद्यालय, याचा समावेश आहे.

## संक्षिप्त

### श्री क्षेत्र फुबगांव येथे संत सुरेश बाबा प्रगट दिन

**नांदगाव खंडेश्वर** - तालुक्यातील श्री क्षेत्र फुबगांव येथे परमहंस श्री संत सद्गुरु सुरेश बाबा यांचा ६६ वा प्रगट दिन व यात्रा महोत्सव २२ ते २८ डिसेंबर दरम्यान उत्साहात साजरा करण्यात येत आहे.त्यानिमित्य विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून ह.भ.प. बाल भागवतकार अनिकेत महाराज कडू यांचे दररोज श्रीमद् भागवत कथा प्रवचन दररोज दुपारी १२ ते ५ या वेळात करण्यात आले आहे. याशिवाय या धार्मिक सप्ताहात दररोज सकाळी ५ वाजता काकड आरती त्यानंतर ग्रामसफाई व ९ वाजता सुरेश बाबा यांचे लीलामृत ग्रंथाचे वाचन दुपारी १२ते ५ श्रीमद् भागवत कथा सायंकाळी गुरुदेव सेवा मंडळाची प्रार्थना ७ वाजता हरिपाठ व भारुड रात्री ९ वाजता भजन व किर्तननाचे कार्यक्रम आयोजन करण्यात आले आहे २९ डिसेंबर रोजी सकाळी ९ वाजता श्रीच्या पालखीची गावातून भव्य मिरवणूक त्यानंतर सकाळी ११ ते २ या वेळात बाल भागवतकार अनिकेत महाराज कडू यांचे काल्याचे किर्तन व दुपारी २ ते ५ या वेळात महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे तरी या धार्मिक पर्वाचा नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन श्री संत सुरेश बाबा संस्थान व गावकरी मंडळी फुबगांव यांच्यावतीने करण्यात आले.



### मधमाशी पालन प्रशिक्षणाचे आयोजन

**अमरावती** - नवीन शैक्षणिक धोरणनुसार विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकता व कौशल्य विकास वाढीस लागण्याच्या दृष्टीने पी. आर. पोटे पाटील कृषी महाविद्यालय येथे २२ ते २७ डिसेंबर या कालावधीमध्ये मधमाशी पालन प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात येणार आहे. पी. आर. पोटे पाटील कृषी महाविद्यालय अमरावती तर्फे सदर प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आलेले असून सदर प्रशिक्षणासाठी १०० पेक्षा अधिक विद्यार्थी व शेतकऱ्यांनी नोंदणी केलेली आहे.केंद्रीय मधमाशी प्रशिक्षण व संशोधन संस्थेचे तज्ञ प्रशिक्षक प्रा. हेमंतकुमार डुंबरे प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन करणार असून सदर प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्र देखील दिले जाणार आहे. सदर प्रशिक्षणामुळे विद्यार्थ्यांना मधमाशी पालनाचे तांत्रिक ज्ञान प्रात्यक्षिकासह मिळणार असून या क्षेत्रात उद्योजक बनू पाहणाऱ्या युवकांना हे प्रशिक्षण सुवर्णसंधी असल्याचे मत कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ठाकरे व उपप्राचार्य चौधरी यांनी व्यक्त करून विद्यार्थ्यांनी सदर प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा असे आवाहन केले.

### वीर विश्वनाथ वनवे स्मृतिदिन साजरा

**अंजनगाव बारी** - न्यू एज्युकेशन सोसायटीद्वारा संचालित गांधी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय येथे शहीद वीर विश्वनाथ वनवे यांचा स्मृतिदिन 'शौर्य दिन' म्हणून साजरा करण्यात आला. स्मृतिदिनानिमित्त व्यासपीठावर संस्थेचे अध्यक्ष डॉ. हेमंतजी देव अध्यक्षस्थानी होते. प्रमुख अतिथी म्हणून कांचन ग्रेसपुंजे (माजी सभापती, मनपा अमरावती) उपस्थित होत्या. तसेच भारतीय सेनेचे सुभेदार चांद शेख, सैफर अनिकेत संजय कात्रे , सुभेदार दामोधर साहू, सुभेदार रेड्डी यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

## मॉर्निंग चषक -२०२५ टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचे उद्‌घाटन



**अमरावती/का.प्र.**

शिक्षण महर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या १२७ व्या जयंती उत्सवानिमित्त श्री शिवाजी शिक्षण संस्था कर्मचारी व मॉर्निंग क्रिकेट क्लब अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने स्व. श्री वा.मो.उपाख्य दादासाहेब काळमेघ व स्व. श्री प्रशांत उर्फ गोटूभाऊ चांदुरकर, स्व. चैतन्य संतोष रामेकर, स्व.रामभाऊ विठोबाजी ठाकरे, स्व.बेबीताई देविदास भोंड, स्व. मधुकरराव सगणे यांच्या स्मृती प्रित्यर्थ अमरावती शहरातील रुरल इन्स्टिट्यूट क्रीडांगण पंचवटी चौक येथे २१ ते २८ डिसेंबर २०२५ दरम्यान लीग पद्धतीने तशेच ३५ वर्षावरील खेळाडू यांच्या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेचे उद्‌घाटन मा.श्री हर्षवर्धन देशमुख अध्यक्ष श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती तथा उपस्थित मान्यवर यांच्या हस्ते दीप प्रज्वलन तथा डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या प्रतिमेला हाराअर्पण करून या कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली.

या स्पर्धेत प्रथम पारितोषिक १ लक्ष, तथा द्वितीय पारितोषिक ५१ हजार, व इतर प्रोत्साहन पर बक्षिसे समाविष्ट आहेत. तसेच ३५ वर्षावरील घेण्यात आलेल्या स्पर्धेसाठी ४१ हजार प्रथम पारितोषिक तर २१ हजार द्वितीय पारितोषिक ठेवण्यात आले आहे.यावेळी मंचावर हर्षवर्धन देशमुर्ख , दिलीप बाबू इंगोले, गजानन पुंडकर,डॉ.सचिन चिंचे, स्मितताई देशमुख,गुल्हाने, भटकर काका, जूनघरे काका, ठाकरे काका, नरेश रामेकर,अभय ढोबळे,गजानन गोसावी, ठाकरे सर, घोंगडे सर, गावंडे, संदीप भाऊ सगणे,संदीप देशमुख आदी मंचावर उपस्थित होते.आपला भूतकाळ हा चांगला होता त्यावेळी मैदानी खेळायला महत्व होते.त्यामुळे खेळाडूनी क्रिकेट सोबत शारीरिक श्रमाच्या इतर खेळाकडे लक्ष द्यावे असे प्रतिपादन श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांनी आपल्या अध्यक्ष भाषणात विशद केले.

दरवर्षी अशाच महाराष्ट्र पातळीवर सामने घेऊन नवीन खेळाडू तयार करावे. तसेच मॉर्निंग क्लबने या स्पर्धेत सातत्य ठेवत अखंड अशा स्पर्धांचे आयोजन करावे, असे प्रतिपादन श्री. दिलीप बाबू इंगोले श्री.शिवाजी शिक्षण संस्था अमरावतीचे कोषाध्यक्ष यांनी व्यक्त केले. गेल्या पंधरा वर्षापासून मॉर्निंग क्रिकेट क्लबच्या सदस्यांनी मैदानाची निगा राखून उत्कृष्ट मैदान तयार केले आहे,असे प्रतिपादन ठाकरे यांनी आपल्या प्रास्ताविकात केले. मॉर्निंग क्रिकेट क्लबचे सर्व सदस्य यावेळी प्रामुख्याने उपस्थित होते.

मॉर्निंग चषक २०२५ टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धा कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन मिलिंद पुंड यांनी केले.

# नांदगाव बाजार समितीमधील गोडाऊनला लागली आग

### अंदाजे ४ ते ५ लाख रुपयाचे नुकसान

**नांदगाव खंडेश्वर/वार्ताहर**

स्थानिक कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात असलेल्या गोदाम मधील साहित्याला आग लागून अंदाजे चार ते पाच लाख रुपयाचे नुकसान झाल्याचे समजते. यामध्ये गोदाम मध्ये असलेले व्यापारांचे बारदाना बंडल बांधकामासाठी असलेले सिमेंटचे पोते व इतर साहित्य आगीमध्ये जळून राख झाले ही घटना शनिवारी दुपारी चार वाजताच्या सुमारास घडली.



आगीचे नेमके कारण कळू शकले नाही बाजार समितीमध्ये काम करणाऱ्या एका महिलेला गोडाऊन मधून धुर निघत असल्याचे लक्षात आल्यानंतर त्या महिलेने आरडा ओरड केली तेव्हा गोडाऊन चे शटर उघडले त्यावेळी गोडाऊन मध्ये व्यापाराचे असलेले बारदाना बंडले जळत असल्याचे लक्षात आले पाहता पाहता आगिने रौद्ररूप धारण केले व गोडाऊन मधील असलेले सर्व साहित्य जळून राख झाले. आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी अग्निशामक दलाला प्रचारण करण्यात आले होते आगीचे नेमके कारण कळू शकले नाही. शॉर्टसर्किटमुळे आग लागली असावी असा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

# शिवाजी शिक्षण संस्थेतर्फे अल्पकालीन प्राध्यापक विकास कार्यक्रम

**अमरावती/का.प्र.**

श्री शिवाजी शिक्षण संस्था संचालित श्री शिवाजी शिक्षण महाविद्यालय, अमरावती यांच्या वतीने 'Holistic Development of Teachers' (शिक्षकांचा सर्वांगीण विकास) या विषयावर अल्पकालीन प्राध्यापक विकास कार्यक्रम (Short Term Faculty Development Programme–FDP) चे भव्य आयोजन करण्यात आले आहे. हा सात दिवसीय कार्यक्रम २३ ते २९ डिसेंबर २०२५ या कालावधीत ऑनलाईन पद्धतीने पार पडणार आहे. हा शैक्षणिक उपक्रम संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती येथील पदव्युत्तर शिक्षणशास्त्र विभाग (PGTD of Education) व पदव्युत्तर शारीरिक शिक्षण विभाग यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात येत असून, डॉ. पंजाबराव उर्फ भाऊसाहेब देशमुख यांच्या १२७ व्या जयंतीनिमित्त हा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. उद्‌घाटन व मान्यवरांची उपस्थितीत कार्यक्रमाच्या उद्‌घाटन समारंभास अ‍ॅड. गजाननराव पुंडकर, उपाध्यक्ष, श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती हे अध्यक्षस्थान भूषविणार असून डॉ. मिलिंद बाराहाते, कुलगुरू, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ हे उद्‌घाटक म्हणून उपस्थित राहणार आहेत. या एफ.डी.पी. मध्ये संशोधनाची भूमिका, भारतीय ज्ञान परंपरा, भावनिक बुद्धिमत्ता, योग व



आरोग्य, सोशल मीडियाचा विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्यावर परिणाम, शिक्षक सक्षमीकरण, IPR, संशोधन दृश्यता, सकारात्मक भावना व कल्याण अशा विषयांवर देशातील नामवंत शिक्षणतज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत. आयोजन समिती श्री शिवाजी शिक्षण महाविद्यालय, अमरावती कार्यक्रमाचे संयोजक डॉ. विनय एम. राऊत, प्राचार्य, श्री शिवाजी कॉलेज ऑफ एज्युकेशन, अमरावती आयोजन सचिव प्रा. डॉ. अंजली पी. ठाकरे, डॉ. संगीता आर. बिहाडे सह-आयोजन सचिव प्रा. डॉ. तनुजा राऊत, विभागप्रमुख, शारीरिक शिक्षण (PGTD), SGBAU डॉ. प्रवीण कोलते, प्रभारी विभागप्रमुख, शिक्षणशास्त्र (PGTD), SGB AU कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा. डॉ. वनिता एन. काळे, डॉ. किशोर जे. क्षत्रिय, डॉ. अमित ई. गावंडे (IQAC ), डॉ. माधुरी देशमुख, डॉ. वैशाली कडू, डॉ. धनश्याम वाघमारे, डॉ. शीतल विधाते, डॉ. शिल्पा येळणे, सुकेशीनी घोडेस्वार, मनीषा लाकडे आदी सदस्य परिश्रम घेत आहेत. शिक्षकांसाठी दिशादर्शक उपक्रमबदलत्या शैक्षणिक धोरणांच्या पार्श्वभूमीवर शिक्षकांचा बौद्धिक, भावनिक, शारीरिक व संशोधनात्मक विकास साधण्या साठी हा एफ.डी.पी. अत्यंत उपयुक्त ठरणार असून, प्राध्यापक, संशोधक व विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# सोलर संयंत्र विक्रेता सभा

**अमरावती/वाणिज्य वार्ता**

विक्रम सोलर लिमिटेड कंपनीची डिलर मीट (सोलर संयंत्र विक्रेता सभा) हॉटेल प्राईम पार्क, प्रभात नगर अमरावती येथे यशस्वीरित्या पार पडली. ही सभा विक्रम सोलर लिमिटेड कंपनीचे अधीकृत विक्रेता सन पावर द्वारे आयोजित केली गेली.







विक्रम सोलर लिमिटेड ही भारतातील अग्रगण्य सौर पॅनल निर्माता आहे.आणि यांचा प्रधानमंत्री सूर्यघर याजनेत मोलाचा वाटा आहे.

तसेच औद्योगिक व व्यापारिक सौर सयंत्राकरिताही कंपनीने मोठ्या प्रमाणात सौर पॅनल पुरवठा केलेला आहे. या कार्यक्रमाची सुरवात धिरेंद्र कंनाव, मनोहर भागवत- वरिष्ठ सौर उद्योजक, AIREA सौर संघटनेचे अधिकारी आशिष पेठे व विवेक यादव यांच्या हस्ते दीप्रज्वलनाने करण्यात आली. कार्यक्रमाचे संचालन सन पावरचे संचालक नितीन मानके आणि तुषार ढेरे यांनी केले. सभेसाठी उपस्थित कंपनीचे स्टेट मॅनेजर शिलानंद सवई तसेच विदर्भ मराठवाडा प्रभाग प्रमुख योगेश पालीवाल यांनी कंपनीच्या उत्पादन आणि सौर ऊर्जेच्या अद्यावत तंत्रज्ञानाविषयी माहिती दिली. त्यांच्या मते कंपनी 9.5GW उत्पादन क्षमते सोबत भारतातील सौर ऊर्जेची गरज भागवण्या साठी लागणाऱ्या सौर पॅनल उत्पादनासाठी तत्पर आहे. या सभेला अमरावती, अकोला, यवतमाळ आणि वाशिम जिल्ह्यातील १३० हून अधिक सौर सयंत्र विक्रेतागण उपस्थित होते.

### अमरावती जिल्ह्यातील नगरपरिषद, नगरपंचायतींत

# भाजप ६, काँग्रेस २, शिंदेसेना, उबाठा, प्रहार व अपक्ष प्रत्येकी एक विजयी



**अमरावती/का.प्र.**

तब्बल चार वर्षांपासूनचे प्रशासकराज अखेर आज हटले आहे. जिल्ह्यात आठ ते नऊ वर्षांनी झालेल्या १० नगरपरिषद व दोन नगरपंचायतींसाठी निकाल स्पष्ट झाला आहे. भाजपला ६, काँग्रेस २, शिंदेसेना, उबाठा, प्रहार व अपक्ष प्रत्येकी एक अशा बाराही ठिकाणचे निकाल लागले आहेत.

वरूड नगरपरिषदमध्ये भाजपचे ईश्वर सलामे, मोर्शी येथे शिंदेसेनेच्या प्रतीक्षा गुल्हाने, धारणी येथे भाजपचे सुनील चौथम, चिखलदरा येथे काँग्रेसचे शेख अब्दूल शेख हैदर, अचलपूर नगरपरिषद निवडणुकीत भाजपच्या रूपाली माथने, अंजनगाव सुर्जी येथे भाजपचे अविनाश गायगोले, दर्यापूर येथे काँग्रेसच्या मंदाकिनी भारसाकडे, शेंदूरजना घाट येथे भाजपचे हरिभाऊ वरखडे, धामणगाव रेल्वे येथे भाजपच्या अर्चना रोटे, चांदूर रेल्वे नगरपरिषदेत अपक्ष उमेदवार प्रियंका विश्वकर्मा, नांदगाव खंडेश्वर नगरपंचायतीत उबाठा गटाच्या प्राप्ती मारोटकर आणि चांदूर बाजार नगरपरिषदेत प्रहारच्या मनीषा नांगलिया विजयी झाले.

यावेळी तुरळक अपवाद वगळता स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीसाठी महायुती व महाविकास आघाडीचे सर्व घटकपक्ष स्वतंत्र लढले. शिवाय प्रहार, युवा स्वाभिमान, वंचित बहुजन आघाडीसह अन्य काही पक्ष व स्थानिक आघाड्या, बंडखोर व काही अपक्ष उमेदवारांमध्ये काट्याची लढत झाली. धामणगाव वगळता बहुतेक ठिकाणी अंतिम क्षणात तिहेरी लढती झाल्या.

जिल्ह्यात दोन टप्प्यात म्हणजेच २ व २० डिसेंबरला झाल्या. यामध्ये १५५ प्रभागात २७८ सदस्य निवडल्या जातील. सदस्यपदासाठी ६१२ स्त्री व ६३८ पुरुष असे १२५० तर १२ नगराध्यक्ष पदांकरिता ४७ स्त्री व २४ पुरुष असे उमेदवार उभे होते.

# चिखलदऱ्यात भाजपचा नगराध्यक्षपदाचा उमेदवार पराभूत

## राष्ट्रवादी अजित पवार गटाचे राजेंद्रसिंह सोमवंशी विजयी

**अमरावती/का.प्र.**

चिखलदरा या गिरीस्थान नगरपालिकेत राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या नेत्याला भाजप मध्ये घेऊन नगराध्यक्षपदाची उमेदवारी देण्याची खेळी भाजपवरच उलटली आहे. या निवडणुकीत भाजपचे नगराध्यक्षपदाचे उमेदवार राजेंद्रसिंह सोमवंशी यांचा पराभव झाला असून काँग्रेसचे उमेदवार शेख अब्दूल शेख हैदर हे निवडून आले आहेत. भाजपला या ठिकाणी फार मोठा धक्का बसला आहे. काँग्रेसचे १२ सदस्य निवडून आले आहेत, तर भाजपला ८ जागांवर समाधान मानावे लागले आहे.



ही निवडणूक राजेंद्रसिंह सोमवंशी यांच्यासाठी प्रतिष्ठेची ठरली होती, पण त्यांना पराभव पत्करावा लागला. त्यांच्यासोबत भाजपमध्ये आलेले बहुतांश माजी नगरसेवक देखील पराभूत झाले आहेत. चिखलदरा नगरपालिकेत बऱ्याच वर्षांच्या प्रतीक्षेनंतर काँग्रेसची सत्ता स्थापन झाली आहे. चिखलदरा नगरपालिकेच्या निवडणुकीसाठी मोठी राजकीय उलथापालथ झाली होती. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (अजित पवार) चिखलदरा येथील नेते आणि तीनवेळा नगराध्यक्ष राहिलेले राजेंद्रसिह सोमवंशी यांनी १५ माजी नगरसेवकांसह भाजपमध्ये प्रवेश केला. राजेंद्रसिंह सोमवंशी यांना भाजपतर्फे नगराध्यक्षपदाची उमेदवारी देण्यात आली. यासाठी युवा स्वाभिमान पक्षाचे अध्यक्ष आमदार रवी राणा यांनी पुढाकार घेतला होता. या निवडणुकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मामेभाऊ आल्हाद कलोती हे नगरसेवकपदाचे उमेदवार होते. त्यामुळे या निवडणुकीकडे अनेकांचे लक्ष लागले होते.

प्रभाग १० (ब) मधून रिंगणात आलेल्या आल्हाद कलोती यांची अविरोध निवड व्हावी, यासाठी रवी राणा यांनी प्रयत्न केले. आल्हाद कलोती यांच्या प्रभागातून रिंगणात असलेल्या काँग्रेसच्या उमेदवारासह नऊ उमेदवारांनी निवडणुकीच्या रिंगणातून माघार घेतली होती, त्यामुळे आल्हाद कलोती हे अविरोध निवडून आले. रवी राणा यांनी या घटनाक्रमाची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना मोबाईलवरून दिली, त्यावेळी मुख्यमंत्र्यांनी रवी राणांचे कौतुकही केले होते. रवी राणांसाठी ही निवडणूक महत्वाची होती. पण, महायुतीतील पळवापळवीची खेळी भाजपवरच उलटली आहे.

राजेंद्रसिंह सोमवंशी हे राष्ट्रवादी अजित पवार गटाचे आमदार संजय खोडके यांच्या निकटचे मानले जात होते. त्यांना भाजपमध्ये आणून खोडकेंना धक्का देण्याचे समाधान रवी राणा यांना मिळाले, पण हा आनंद औटघटकेचा ठरला आहे. आल्हाद कलोती यांच्या प्रभागातून काँग्रेसच्या उमेदवारानेही माघार घेतल्याने काँग्रेसच्या नेत्यांना धक्का बसला होता. आल्हाद कलोती यांना अविरोध निवडून आणण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी हस्तक्षेप करणे चुकीचे असल्याची टीका माजी मंत्री आणि काँग्रेसच्या नेत्या यशोमती ठाकूर यांनी केली होती.

# जि.प.व पं.स. निवडणुकीला आरक्षणाचा खोडा

## प्रशासकीय राजवट बसणार?



**तिवसा/वार्ताहर**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ३१ जानेवारी २०२६पर्यंत घेण्याचे आदेश उच्च न्यायालयाचे असले तरी जिल्हापरिषद व पंचायत समिती निवडणुका या ५० टक्क्याच्या आरक्षणात रखडल्या जात असल्यामुळे लांबणीवर जाईल की काय, ही संशयात्मक भूमिका दिसत असतानाच जिल्ह्यातील ग्रामपंचायतच्या जवळजवळ पाचशेच्या वर, तर तिवसा तालुक्यातील २९ ग्रामपंचायतीच्या निवडणुका या लांबणीवर पडणार असल्याचे संकेत मिळत आहे.

१५ फेब्रुवारी रोजी कार्यकाळ संपत असलेल्या ग्रामपंचायतमधील सरपंच पदाच्या निवडणुकीच्या तयारीला लागलेल्या गावपातळीवरील राजकीय पुढाऱ्यांचे स्वप्न तूर्तास लांबणीवर पडणार आहे.

तिवसा तालुक्यातील ४५ ग्रामपंचायतीपैकी २९ ग्रामपंचायतींचा कार्यकाळ हा १५ फेब्रुवारीपर्यंत संपुष्टात येत आहे.

यामुळे ग्रामपंचायत निवडणुका लक्षात घेता व जनतेमधून सरपंच पदाच्या निवडणुका लक्षात घेता ६ महिन्यापूर्वीच सरपंच पदाची आरक्षण सोडत काढण्यात आली आहे; मात्र कार्यकाळ संपुष्टात येत असलेल्या ग्रामपंचायतीचे प्रभाग रचना, वॉर्डनिहाय आरक्षण सोडत मतदार यादी आदी कार्यक्रम लावण्यात आला नाही. हा कार्यक्रम जाहीर होणे अपेक्षित होते.

जिल्हापरिषद व पंचायतसमिती निवडणुका ५० संदर्भात टक्केपेक्षा अधिकच्या आरक्षणाचा घोळ निस्तारण्यासाठी अद्याप कार्यवाही नाही. महानगर पालिका निवडणुका होईपर्यंत यावर शिक्कामोर्तब होणे गरजेचे आहे. ३१ जानेवारीपर्यंत या सर्व निवडणुका संपविण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. एकीकडे जिल्हापरिषद पंचायतसमितीचे निवडणुका घेणे बाकी असताना तिकडे अधिक लोकसंख्येच्या ग्रामपंचायतीचा कार्यकाळदेखील संपुष्टात येत आहे. यामुळे ग्रामपंचायत निवडणूक प्रक्रिया राबविण्याबाबत प्रशासकीय यंत्रणेवर ओझे येत असल्यामुळे ग्रामपंचायतचे निवडणुका या पुढे लांबणीवर पडण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

ग्रामपंचायत निवडणुका लांबणीवर पडल्यास काही महिन्यांसाठी ग्रामपंचायतवर प्रशासकीय राजवटसुद्धा लागू शकते.



**मोर्शी**- नगरपरिषद निवडणुकीच्या मतमोजणी दरम्यान, प्रहार जनशक्ती पक्षाचे उमेदवारनईम भाई यांचा भरपूर मताधिक्याने विजयी झाला असून, नगरपरिषद सदस्य पदाकरिता प्रहार जनशक्ती पक्षाचा उमेदवार विजयी झाल्याने कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# चांदूरबाजार नगर परिषदेवर प्रहारचा झेंडा

## ▪नगराध्यक्षपदी प्रहारच्या मनिषा सांगलीच्या विजयी
## ▪ प्रहारचे १३ उमेदवार विजयी

**चांदूरबाजार/वार्ताहर**

चांदूरबाजार नगर परिषदेचा बहुप्रतिक्षेनंत आज(२१डिसेंबर) निकाल जाहीर झाला.या निकालात बच्चू कडू यांच्या प्रहार जनशक्ती पक्षाने आपले वर्चस्व स्थापित केले आहे.नगराध्यक्ष पदासाठी प्रहार व भाजप यांच्यात झालेल्या अतितटीच्या लढतीत प्रहारने विजय प्राप्त केला आहे.नगराध्यक्ष पदासाठी प्रहारच्या मनिषा मनिष नांगलीया विजयी झाल्या.तसेच २० नगरसेवकांमध्ये प्रहारचे १३ नगर सेवक निवडून आले आहेत. परिणामी प्रहारने स्थानिक नगर परिषदेवर आपला झेंडा फडकविला आहे.विषेश म्हणजे प्रहारने भाजपचा नगराध्यक्ष पदाचा उमेदवार, ऐनवेळी प्रहार मध्ये घेऊन या उमेदवारला नगराध्यक्ष पदाची उमेदवारी दिली होती. या लढतीत भाजपच्या उमेदवाराला प्रहार कडून,७३५ मतांनी पराभव पत्करावा लागला. तसेच या निवडणूक शहराच्या एकूण ३८० मतदारांनी,नोटांचा वापर करून निवडणूक लढविणा-या सर्वच उमेदवारांना नाकारले.

नगराध्यक्ष पदासाठी स्थानिक न.प.ला, एकूण ५ उमेदवार मैदानात होते.यात प्रहार आणि भाजप मध्ये चांगलीच लढत झाली.या लढतीत प्रहारच्या उमेदवार मनिषा नांगलीया यांना,५,००१ इतकी मते प्राप्त झाली.तर भाजपच्या कांता उबन अहीर यांना,४,२६६ मते मिळाली.तसेच कॉग्रेसच्या फरहान तबस्सूम मोहम्मद साजीद यांना २,७०७ मते प्राप्त झालीत.उठाबाच्या सरोज अरूण चौधरी यांना १९९, तर राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या फातीमा बानो अ. सलीम यांना ३४५ मते प्राप्त



झाली आहेत.नगराध्यक्ष पदासाठी ९४ मतदारांनी नोटा वापर केला.

**प्रहारचे विजयी उमेदवार**

प्रभाग १ अ कल्याणी हेमंत कोंडे (६०१), प्रभाग १ ब सचिन रमेश खुळे (६३५), प्रभाग २ ब नरेंद्र आबाराव वानखडे (५४३), प्रभाग ५ अ.रहेमान शेख इब्राहीम(६५१), प्रभाग ५ ब तबस्सूम नीसा म. सोहेल (८६०), प्रभाग ७ अ कनिजा फातेमा जमिल (६७५),प्रभाग ७ ब मुजफ्फर हुसेन शे. रहेमततुल्ला (८३१), प्रभाग ८ अ नजमा बी मंजूर अहमद(५६३), प्रभाग ८ ब आबिद हुसेन अ.रफीक (५४२), प्रभाग ९ अ आशा मारोतराव वानखडे (३१५), प्रभाग ९ ब मनिष निरंजन नांगलीया (२९८), प्रभाग १० अ घनश्याम चंदूलाल उसरबसे (५१०), प्रभाग १० ब अर्चना नितीन कोरडे (७१५).

**भाजपच्या विजयी उमेदवार**

प्रभाग २ अ प्रियंका अंकुश यावतकर(६७४), प्रभाग ४ अ पूजा रवी डिठोर (४५७) यांचा समावेश आहे.तर राष्ट्रवादी शरद पवार गट प्रभाग ३अ रुकसाना एजाज आली (२६२), प्रभाग ३ ब राष्ट्रवादी अ.प.गट तरन्नुम मुंतजीर खान(६७४),अपक्ष विजयी उमेदवारांमध्ये प्रभाग ४ ब मो.तनवीर अहमद मो.इसराईल(३४९), प्रभाग ६ ब वैभव प्रल्हाद घुटे (४२३) यांनी विजय प्राप्त केला आहे.कॉग्रेसच्या एकमेव विजयी झालेल्या उमेदवारांत प्रभाग ६ अ मधून,शाहीन परविन अब्दुल रशीद(४३५) या विजयी झाल्या आहेत.यांच्या विजयासोबत १० वर्षानंतर कॉग्रेसने सदस्य रूपाने स्थानिक नगर परिषदेत आपले खाते उघडले आहे.

यावेळी प्रहारने भाजपकडून नगर परिषद हिसकावून घेतली आहे.

भाजपला फक्त नगरसेवकांच्या दोन जागेवरच समाधान मानावे लागले आहे.

भाजप कडून उमेदवारी देताना,फार मोठी चुक झाली.परिणामी भाजपला पराभव पत्करावा लागला.अशी चर्चा स्थानिक राजकीय क्षेत्रात आहे.मात्र विधानसभेच्या पराभवाचा बदला,नगर परिषद निवडणूकीत घेतल्याचा आनंद प्रहार कार्यकर्त्यांना मध्ये ओसंडून वाहत होता.

परिणामी प्रहार कार्यकर्त्यांनी जयस्तंभ चौकात विजयाचा जल्लोष साजरा केला.


### पती-पत्नीने गाजविले विजयाचे मैदान



स्थानिक नगर परिषदेसाठी प्रहार कडून नगराध्यक्ष पदासाठी पत्नील तर नगरसेवक पदासाठी नवरोजींना उमेदवारी देण्यात आली होती.यात दोघांनी ही विजयी होत पती पत्नीने नगर परिषदे निवडणूकीच्या विजयाचे मैदान वाजविले आहे. शहरात हा सध्या चर्चेचा विषय झाला आहे.विजयी झालेल्या जोडप्यात नगराध्यक्ष पदासाठी मनिषा नांगलीया तर सदस्य पदासाठी विजयी झालेले मनिष नांगलीया यांचा समावेश आहे.

### *अमरावती महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर*

# प्रभाग क्र. ५ मध्ये रुग्णसेवक मयूर डांगे यांची दावेदारी चर्चेत



**अमरावती/का.प्र.**

महानगरपालिका निवडणुकाच्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्र. ५ नवीन कॉटन मार्केट- महेंद्र कॉलनी, मध्ये राजकीय हालचालींना वेग आला असून सामाजिक कार्यकर्ते आणि 'रुग्णसेवक' म्हणून ओळखले जाणारे श्री मयूर डांगे यांची दावेदारी अनुसूचित जाती प्रवर्ग अ गटातून चर्चेत आहे.

मयूर डांगे यांनी आरोग्य क्षेत्रात केलेल्या कामामुळे आणि विशेषतः सामान्य नागरिकांना रुग्णालयातील मदतीसाठी दिलेल्या योगदानामुळे त्यांची या प्रभागात एक वेगळी ओळख निर्माण झाली आहे.मयूर डांगे रुग्णसेवक म्हणून काम करत असताना त्यांनी प्रभागातील अनेक कुटुंबांशी थेट संपर्क प्रस्थापित केला आहे. आरोग्य शिबिरे आणि रक्तादान मोहिमांद्वारे त्यांनी तरुणांमध्ये आपली पकड मजबूत केली आहे.प्रभागातील नागरी समस्यांसोबतच आरोग्य व्यवस्था सुधारणे हा त्यांच्या अजेंड्याचा मुख्य भाग असल्याचे दिसून येते.

एक तरुण आणि सक्रिय उमेदवार म्हणून त्यांच्याकडे पाहिले जात आहे, जे प्रस्थापित राजकारण्यांसमोर आव्हान ठरू शकते. आपल्या कामाचा लेखाजोखा आणि नागरिकांच्या तक्रारी मांडण्यासाठी ते सोशल मीडियाचा प्रभावी वापर करत आहेत.

या प्रभागात संमिश्र वस्ती असून, येथे पायाभूत सुविधा, स्वच्छता आणि पिण्याच्या पाण्याचे प्रश्न महत्त्वाचे आहेत. मयूर डांगे यांची उमेदवारी निश्चित झाल्यास या प्रभागातील निवडणूक तिरंगी किंवा चौरंगी होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

अद्याप पक्षांची उमेदवारी जाहीर झालेली नसल्यामुळे, ही दावेदारी सध्या स्थानिक चर्चा आणि कार्यकर्त्यांच्या मागणीवर आधारित आहे.

# प्रभाग १८ मधून उद्योजक अविनाश कानतुटे यांची दावेदारी

**अमरावती/का.प्र.**

शहरातील प्रसिध्द उद्यमी, रेणुका इंडस्ट्रीजचे संचालक आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सक्रिय कार्यकर्ते अविनाश कानतुटे यांनी भारतीय जनता पक्षातून राजापेठ संत कंवरराम प्रभाग १८ साठी उमेदवारी मागितली आहे. त्यांच्या अर्जावर पक्षात चर्चा सुरू असून, त्यांच्या दाव्यावर विश्वास ठेवला जातो.

अविनाश कानतुटे हे केवळ उद्योगतज्ज्ञ नाहीत, तर त्यांनी सामाजिक क्षेत्रातही महत्त्वाचे योगदान दिले आहे. ते विद्यार्थी जीवनापासून सक्रिय राहिले असून, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, उद्योग भारती, संस्कार भारतीसह अनेक सामाजिक संस्थांमध्ये त्यांनी कार्य केले आहे. एमआयडीसी असोसिएशनमध्ये १० वर्षे विविध कार्यकारिणी पदांवर काम केले, तसेच अमरावती विद्यापीठाच्या व्यवस्थापन समितीतही सहभाग नोंदवला आहे. कानतुटे म्हणतात की, नगरसेवक झालो तर ते प्रभागातील स्वच्छता, बगीचे, सुलभ शौचालय, रस्ते, वीज आणि पाणी सुविधा यावर विशेष लक्ष देतील. यासोबत वाचनालय, ध्यान केंद्रे, खेळाचे मैदान आणि युवकांसाठी इतर योजना उपयुक्त स्थानांची उभारणी करण्याची



आहे. उद्योग क्षेत्रातील कामगिरांसाठी त्यांना जिल्हा उद्योग पुरस्कारही मिळाला आहे. भाजीबाजार संघ शाखा तसेच उद्योग भारती आणि संस्कार भारतीमध्ये त्यांनी दीर्घकाळ योगदान दिले. व्यवसाय, स्वयंरोजगार आणि समाजसेवा याबाबत त्यांनी अनेक व्याख्याने घेतली आहेत. त्यांनी सांगितले की, जीवनातील यशाचे सूत्र म्हणजे परिश्रम, समर्पण आणि विश्वासार्हता. अविनाश कानतुटे जनसंपर्कावर कायम भर देतात. ते नागरिकांशी संवाद साधून त्यांच्या समस्या समजून घेण्यास नेहमी तत्पर राहतात. अमरावती महापालिका निवडणुकीत विजयी झाल्यास प्रभागातील सर्व प्रस्तावित योजना राबवण्याचे ते ठाम निर्धार दर्शवतात.

# धामणगाव रेल्वेत भाजपचा ऐतिहासिक विजय

## नगराध्यक्षपदी डॉ. अर्चना अडसड रोठे यांचा विजय

**धामणगाव रेल्वे/वार्ताहर**

धामणगाव रेल्वे नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ ची मतमोजणी प्रक्रिया २१ रोजी पूर्ण झाली असून या निवडणुकीत भारतीय जनता पार्टीने ऐतिहासिक यश संपादन केले आहे. नगरपरिषदेच्या एकूण २० ही नगरसेवक पदांवर भाजपचे उमेदवार विजयी झाले असून नगराध्यक्ष पदासाठी डॉ. अर्चना अडसड रोठे (अक्का) यांनीही भरघोस मतांनी दणदणीत विजय मिळवला आहे. निकाल जाहीर होताच धामणगाव रेल्वे शहरात आतिषबाजी, ढोल-ताशांचे गजर, कार्यकर्त्यांचा जल्लोष पाहायला मिळाला. भाजप कार्यकर्त्यांनी जल्लोषात आनंद व्यक्त करत विजयाचा उत्सव साजरा केला.यावेळी आ. प्रताप अडसड यांनी आपल्या भगिनी डॉ. अर्चना



अडसड रोठे (अक्का) तसेच सर्व विजयी नगरसेवकांचे अभिनंदन केले. जनतेने भाजपच्या सर्व उमेदवारांवर विश्वास दाखवून त्यांना निवडून दिल्याबद्दल त्यांनी नागरिक व कार्यकर्त्यांचे आभार मानले. आगामी काळात नगरपरिषदेच्या माध्यमातून धामणगांव शहराचा सर्वांगीण विकास निश्चितपणे साध्य केला जाईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. विजयानंतर नगराध्यक्ष डॉ. अर्चना अडसड रोठे (अक्का) व सर्व विजयी उमेदवारांचे कार्यकर्ते व शहरातील नागरिकांनी फुलांच्या वर्षावाने स्वागत करत शुभेच्छांचा वर्षाव केला.या ऐतिहासिक विजयानिमित्त धामणगांव रेल्वे शहरात आनंद व उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, सर्वत्र समाधान व्यक्त होत आहे.

भारतीय जनता पार्टीच्या प्रत्येक कार्यकर्त्याने प्रामाणिक मेहनत घेतली असून शहरातील नागरिकांनी आमच्यावर विश्वास दाखवला. या विश्वासाबद्दल सर्व पॅनलच्या वतीने मी नागरिकांचे मनःपूर्वक आभार मानते असे सांगितले.

# बार्शीटाकळी नगराध्यक्ष पद वंचितकडे

## भाजपा दुसऱ्या, कॉँग्रेस तिसऱ्या क्रमांकावर; अपक्ष ठरतील 'किंगमेकर'

**■ प्रतिनिधी | बार्शिटाकळी ■**

**जिल्ह्यातील बहुचर्चित बार्शीटाकळी नगर पंचायत निवडणुकीत वंचित बहुजन आघाडीने नगराध्यक्ष पदावर निर्विवाद वर्चस्व प्रस्थापित केले आहे. मागील काळात सत्तेवर असलेल्या कॉँग्रेसला या निवडणुकीत तिसऱ्या क्रमांकावर समाधान मानावे लागले असून, भाजप दुसऱ्या स्थानावर राहिली आहे. मात्र, नगरसेवक संख्येत अपक्ष उमेदवारांची संख्या सर्वाधिक असल्याने पुढील सत्तासमीकरणांकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.**



अख्तर खातून अलिमोद्दीन
नवनिर्वाचित नगराध्यक्ष

दिनांक २ डिसेंबर रोजी पार पडलेल्या नगर पंचायत सार्वत्रिक निवडणुकीची मतमोजणी रविवारी (दि. २१ डिसेंबर) सकाळी १० वाजता सुरू होऊन दुपारी २ वाजेपर्यंत शांततेत पूर्ण झाली. एकूण १७ सदस्यांच्या सभागृहात मतदारांनी संमिश्र कौल दिल्याचे स्पष्ट झाले आहे.

**नगराध्यक्ष पदावर वंचितचा दणदणीत विजय :** नगराध्यक्ष पदासाठी वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवार अख्तर खातून अलिमोद्दीन यांनी तब्बल ९,१९३ मते मिळवत विक्रमी विजय संपादन केला. त्यांनी भाजपच्या कोकिळाबाई श्रीराम येळवणकर (२,९५० मते) यांचा ६,२४३ मतांनी पराभव केला. काँग्रेसच्या उमेदवाराला २,५३० मते मिळाली असून त्यांना तिसऱ्या स्थानावर समाधान मानावे लागले.

**सत्तेची गणिते महत्त्वाची :** १७ सदस्यांच्या सभागृहात बहुमतासाठी ९ नगरसेवकांची गरज आहे. कोणत्याही पक्षाकडे केवळ ३ जागा असल्याने, ५ अपक्ष नगरसेवक 'किंगमेकर'च्या भूमिकेत आले आहेत. नगराध्यक्ष पद वंचितकडे असले तरी प्रत्यक्ष कारभारासाठी त्यांना अपक्ष तसेच इतर पक्षांचा पाठिंबा आवश्यक ठरणार आहे.

**प्रशासनाची चोख व्यवस्था :** मतमोजणी प्रक्रियेदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस, महसूल विभाग, गृहरक्षक दल तसेच नगर पंचायत प्रशासनाने चोख बंदोबस्त ठेवला होता. निवडणूक निर्णय अधिकारी राजेश वझीरे व सहायक निवडणूक अधिकारी राहुल कंकाळ (मुख्याधिकारी) यांच्या मार्गदर्शनाखाली प्रक्रिया सुरळीत पार पडली. ठाणेदार प्रवीण धुमाळ यांनी कडेकोट बंदोबस्त ठेवला होता.

**विकासाच्या अपेक्षा वाढल्या :** मतदारांनी व्यक्त केलेल्या कौलातून शहरातील रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता यांसारख्या मूलभूत प्रश्नांवरील नाराजी स्पष्ट झाली आहे. आता नव्याने निवडून आलेल्या नगर पंचायत मंडळापुढे शहराच्या सर्वांगीण विकासाच्या अपेक्षा पूर्ण करण्याचे मोठे आव्हान उभे ठाकले आहे. दरम्यान, आगामी काळात गटनेता निवड, विषय समित्या आणि सत्तास्थापनेच्या हालचालींना वेग येणार असल्याने बार्शीटाकळीत राजकीय वातावरण तापण्याची चिन्हे दिसत आहेत.

**नगरसेवक पक्षीय बलाबल**

भाजप – ३
वंचित – ३
काँग्रेस – ३
राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) – २
AIMIM – १
अपक्ष – ५

**अपक्षांचा वरचष्मा**

या निवडणुकीत बहुतांश ठिकाणी मतदारांनी जुन्या चेहऱ्यांना नाकारत नव्या उमेदवारांना संधी दिल्याचे दिसून आले. प्रमुख पक्षांच्या उमेदवारांना धक्का देत खालील अपक्ष उमेदवार विजयी ठरले.

**वार्ड ३ : शुभम इंगळे**
**वार्ड ५ : बबलू काजी**
**वार्ड ७ : नावेद खान**
**वार्ड ८ : शहाना अंजुम**
**वार्ड ११ : आम्रपाली इंगोले**

# नगराध्यक्षपदी भाजपाचे हर्षल साबळे ७१८ मतांनी विजयी

**■ प्रतिनिधी | मूर्तिजापूर ■**



नगर परिषदेच्या नगराध्यक्ष पदासाठी झालेल्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाचे उमेदवार हर्षल रामेश्वर साबळे यांनी ८,८२१ मते मिळवत दणदणीत विजय मिळवला. त्यांनी वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार शेख इम्रान शेख खलील यांचा ७१८ मतांनी पराभव केला. शेख इम्रान यांना ८,१०३ मते मिळाली, तर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाचे उमेदवार विनायकराव गुन्हाने यांना ६,६३७ मतांवर समाधान मानावे लागले.

निकाल जाहीर होताच शहरात भाजपाच्या कार्यकर्त्यांनी फटाके फोडून, गुलाल उधळत जल्लोष केला. विजयाचे श्रेय मतदारांनी विकासाच्या मुद्द्यांना दिलेल्या पाठिंब्याला असल्याची प्रतिक्रिया नवनिर्वाचित नगराध्यक्ष हर्षल साबळे यांनी दिली. 'शहराच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वांना सोबत घेऊन काम करू,' अशी ग्वाही त्यांनी दिली.

दरम्यान, नगरसेवक पदासाठी झालेल्या निवडणुकीत विविध पक्षांना संमिश्र यश मिळाले. भाजपाने बहुसंख्य प्रभागांत आपले वर्चस्व कायम राखले, तर वंचित बहुजन आघाडीने काही प्रभागांत चांगली कामगिरी नोंदवली. काही ठिकाणी अपक्ष उमेदवारांनीही धक्कादायक विजय मिळवले.

**निवडून आलेले नगरसेवक पुढीलप्रमाणे :**

**प्रभाग क्र. १ :** अ – शुभांगी संदीप सरनाईक (अपक्ष) ब – संदीप दौलतराव सरनाईक (अपक्ष)

**प्रभाग क्र. २ :** अ – सुनंदा नंदू सोंळके (वंचित) ब – तसवर खान तसलीम खान (वंचित)

**प्रभाग क्र. ३ :** अ – राहुल विनोद गुल्हाने (भाजपा)
ब – शालिनी राम हजारे (भाजपा)

**प्रभाग क्र. ४ :** अ – कुरेशी शमीम बानो अब्दुल रफीक (वंचित) ब – अ. बाकी अ. अजीज (वंचित)

**प्रभाग क्र. ५ :** अ – निजामुद्दीन इस्लामाद्दीन (वंचित) ब – पटेल फहेमीदाबी कलीमोद्दीन (वंचित)

**प्रभाग क्र. ६ :** अ – लखन धर्मदास मिलांदे (भाजपा) ब – घाणिवाला बिलकीस बानो इब्राहीम (राष्ट्रवादी काँग्रेस – शरद पवार गट)

**प्रभाग क्र. ७ :** अ – पंकज चंद्रशेखर कांबे (भाजपा) ब – सोनल मुकेश काळपांडे (भाजपा)

**प्रभाग क्र. ८ :** अ – भूपेंद्र मारोती आप्पा पिंपळे (भाजपा) ब – ममता कैलास महाजन (अपक्ष)

**प्रभाग क्र. ९ :** अ – पूजा राजेश अरोरा (शिवसेना – शिंदे गट) ब – निलेश रमेश शर्मा (शिवसेना – शिंदे गट)

**प्रभाग क्र. १० :** अ – प्रज्ञा निलेश वानखडे (भाजपा) ब – रोहित मधुकर अव्वलवार (भाजपा)

**प्रभाग क्र. ११ :** अ – पूनम रविंद्र मारकड (राष्ट्रवादी काँग्रेस – शरद पवार गट) ब – सचिन सुरेशराव पावडे (देशमुख गट – भाजपा)

**प्रभाग क्र. १२ :** अ – सरिता राहुल पाटील (अपक्ष) ब – गजानन मुकुटराव नाकट (भाजपा) क – सुप्रिया राम खंडारे (भाजपा)

या निकालामुळे मूर्तिजापूर नगर परिषदेत भाजपाचे वर्चस्व अधिक बळकट झाले असून, आगामी काळात शहरातील पायाभूत सुविधा, स्वच्छता, पाणीपुरवठा व नागरी विकासाच्या प्रश्नांना प्राधान्य दिले जाईल, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

## तेल्हारा नगरपरिषद निवडणूकीत भाजपचा गड कायम




**■ प्रतिनिधी | तेल्हारा ■**

तेल्हारा नगरपरिषद निवडणूक–२०२५ मध्ये भारतीय जनता पक्षाने आपली सत्ता कायम राखत दणदणीत विजय मिळविला. नगराध्यक्षपदासाठी भाजपच्या वैशाली जितेंद्र पालीवाल यांनी ४,६९४ मते मिळवत विजय संपादन केला. सोमवारी (२१ डिसेंबर) केशव मंगल, तेल्हारा येथे झालेली मतमोजणी प्रक्रिया अत्यंत शांततेत व पारदर्शक पद्धतीने पार पडली.

सकाळी दहा वाजता सुरू झालेल्या मतमोजणीत प्रभाग क्रमांक १ ते ४ तसेच टपाली मतांची मोजणी करण्यात आली. निवडणूक निर्णय अधिकारी तहसीलदार समाधान सोनवणे आणि सहायक निवडणूक निर्णय अधिकारी सतीश गावंडे यांनी निकाल जाहीर केला. निकालानुसार शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाच्या शिवानी सचिन थाटे यांना ३,४५२ मते मिळून दुसरा क्रमांक, तर वंचित बहुजन आघाडीच्या विद्या सिद्धार्थ श्यामस्कर यांना १,७२४ मते मिळून तिसरा क्रमांक मिळाला. शिवसेना (शिंदे गट)च्या दीपा महेश सिसोदिया यांना १,५५१, तर राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट)च्या पवार राजकन्या मधुकर यांना १,२९७ मते मिळाली. नोटाला १०४ मते मिळाली.

मागील पंचवार्षिकप्रमाणे यंदाही तेल्हारा मतदारांनी भाजपवर विश्वास व्यक्त केल्याने पक्षाला आपला गड राखता आला आहे. संपूर्ण मतमोजणी प्रक्रियेदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडला नाही. अधिकारी, कर्मचारी व पोलिसांचे सहकार्य लाभल्याचे निवडणूक प्रशासनाने स्पष्ट केले.

दरम्यान, मतमोजणी केंद्राला अतिरिक्त जिल्हाधिकारी सुधीर खांदे व डीवायएसपी राहुल पाटील यांनी भेट देऊन आढावा घेतला.

**नगरपरिषदेत पक्षीय बलाबल**

**भाजप** – १३
**वंचित** – ३
**शेतकरी** – २
**नगरसेवक समिती** – १
**अपक्ष** – १

# अकोट नगराध्यक्षपदी भाजपच्या माया धुळे यांचा दणदणीत विजय

**■ प्रतिनिधी | अकोट ■**



अकोट नगरपालिकेच्या नगराध्यक्षपदासाठी झालेल्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाच्या उमेदवार माया विवेकराव धुळे यांनी स्पष्ट बहुमतासह दणदणीत विजय मिळवला. मतमोजणीअंती माया धुळे यांना १५,९२८ वैध मते मिळाली असून त्यांनी प्रतिस्पर्ध्यांवर निर्णायक आघाडी घेत नगराध्यक्षपदावर आपले नाव कोरले.

या निवडणुकीत ध्घ्घ् कडून जोरदार लढत देण्यात आली. ध्घ्घ् समर्थित उमेदवार सैय्यद फिरोजाबी शरीफ यांना १०,६५७ मते मिळाली. तर अलका संजय बोडखे यांना ८,८५९, काँग्रेसच्या स्वाती मंगेश चिखले यांना ६,३१४, तर गाजीया बानो मोहम्मद बदरुज्जमा यांना ७,६०९ मते मिळाली. नोटाला ४६६ मते पडली असून इतर उमेदवारांना मर्यादित मते मिळाली.

**विकासाच्या मुद्द्यावर विजय :** निवडणूक चुरशीची ठरली असली, तरी विकासाच्या मुद्द्यावर भाजपच्या माया धुळे यांनी बाजी मारल्याचे चित्र स्पष्ट झाले. विजयानंतर बोलताना माया धुळे म्हणाल्या, 'गेल्या नऊ वर्षांत भारतीय जनता पक्षाने अकोट शहराचा कायापालट केला आहे. केंद्र व राज्यात भाजपचे सरकार असल्यामुळे अकोटचा सर्वांगीण विकास अधिक गतीने साधता येईल. शहरवासीयांनी दाखवलेला विश्वास विकासकामांतून निश्चितच सार्थ ठरवू.'

**जनतेचा भाजपवर पुन्हा विश्वास :** अकोट शहराच्या जनतेने पुन्हा एकदा नगराध्यक्षपदाची धुरा भाजपकडे सोपवून विकासाच्या राजकारणावर आपला विश्वास व्यक्त केला आहे. विशेष म्हणजे नगराध्यक्षपद पुन्हा एकदा भाजप उमेदवार व बारी समाजाकडे दिल्याने शहरात सातत्याबाबतही चर्चा सुरू आहे. या विजयामुळे अकोट शहरात भाजप कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण असून, ठिकठिकाणी जल्लोष करण्यात आला.

**नगरसेवक निवडणूक : प्रभागनिहाय संमिश्र कौल :** नगरसेवक निवडणुकीत मात्र मतदारांनी विविध पक्षांना संधी देत संमिश्र कौल दिला.

**प्रभाग १:** १अ – रेश्मा परवीन (AIMIM) – २३०५ मते १ब – युसूफ खान (AIMIM) – २२८५ मते **प्रभाग २ :** २अ – हनान शहा – ९३३ मते २ब – दिलशाह बी. – ११४९ मते **प्रभाग ३ :** ३अ – आफ्रिन अंजुम (AIMIM) – १८७९ मते ३ब – अब्दुल अकबर (प्रहार) – १०३७ मते **प्रभाग ५ :** ५अ – मो. आरिफ (राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट) – १३९२ मते ५ब – सलमा बेगम (काँग्रेस) – १४४२ मते **प्रभाग ६ :** ६अ – स्नेहल दाभेराव( भाजप) – १३०१ मते ६ब – नयना इंगोले (शिवसेना शिंदे गट) - ९४१ मते **प्रभाग ७ :** ७अ – अभिजीत कराळे – १३८६ मते, ७ब – गंगाबाई चंदन – ११३६ मते, ७क – शारदा मिसळे – १२४१ मते **प्रभाग ८ :** ८अ – रेणुका खवले – २३४२ मते ८ब – शेख ख्वाजा – १९९४ मते **प्रभाग ९ :** ९अ – लता कांबळे – ११०१ मते ९ब – खानम मुमताज – १०५० मते **प्रभाग १० :** १०अ – दिलीप बोचे – १३६८ मते १०ब – विजया बोचे – ११५१ मते (शिवसेना उबाठा) **प्रभाग ११ :** ११अ – रजनी अहिर (काँग्रेस) – १३४८ मते ११ब – अमोल पालेकर (भाजप) – १०६१ मते **प्रभाग १२ :** १२अ – शुभांगी टेमझरे – ९१८ मते १२ब – निलेश नवघरे – ९३९ मते **प्रभाग १३ :** १३अ – शेख नगमा – १६८४ मते १३ब – आस्मा अंजुम – १६७४ मते (काँग्रेस) **प्रभाग १४ :** १४अ – निकिता जुनगरे (राष्ट्रवादी शरद पवार गट) – ८९० मते १४ब – प्रथमेश बोरोडे (भाजप) – ९६३ मते **प्रभाग १५ :** १५अ – शितल पटके (भाजप) – १३२२ मते १५ब – अचल बेलसरे (काँग्रेस) – १००१ मते **प्रभाग १६ :** १६अ – सीताबाई मर्दानी – १००५ मते १६ब – रवीकुमार ठाकूर – ८८६ मते (भाजप) **प्रभाग १७ :** १७अ – सुनिता महल्ले – १०७० मते १७ब – सुशील पुंडकर – १२८१ मते (प्रहार).

# बाळापूर नगरपरिषदेवर काँग्रेसचा झेंडा : 'नगर विकास आघाडी' १२ जागांसह प्रथम

## नगराध्यक्ष पदी डॉ.आफरीन परवीन मोहम्मद जमीर



**■ प्रतिनिधी | बाळापूर ■**

नुकत्याच पार पडलेल्या बाळापूर नगरपरिषद निवडणुकीत अत्यंत चुरशीचे व नाट्यमय निकाल समोर आले असून, नगरपरिषदेत सत्तासमीकरणे बदलण्याची शक्यता निर्माण झाली आहे. थेट नगराध्यक्षपदावर भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने विजय मिळवला असला, तरी सर्वाधिक नगरसेवक निवडून आणण्याचा मान 'नगर विकास आघाडी'ने पटकावला आहे.

'नगर विकास आघाडी'ने एकूण १२ जागांवर विजय मिळवत निवडणुकीत प्रथम क्रमांक पटकावला असून, नगरपरिषदेत निर्णायक 'किंगमेकर'ची भूमिका निश्चित केली आहे. अपेक्षेप्रमाणे प्रमुख राजकीय पक्षांना मागे टाकत आघाडीने प्रभावी कामगिरी नोंदवली आहे. त्यामुळे येत्या काळात नगरपरिषदेतील सत्तास्थापनेसाठी 'नगर विकास आघाडी'ची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे.

दरम्यान, काँग्रेस पक्षाने थेट नगराध्यक्षपद जिंकून आपली राजकीय ताकद दाखवून दिली आहे. नगरसेवक पदांवर काँग्रेसने एकूण ७ जागांवर विजय मिळवला. प्रभाग क्रमांक २, ५ व १२ मध्ये काँग्रेसने दोन्ही जागांवर विजय मिळवला, तर प्रभाग क्रमांक ३ मध्ये एका जागेवर यश संपादन केले. शिवसेनेच्या दोन्ही गटांची कामगिरी जवळपास समान राहिली. मात्र, भाजपला या निवडणुकीत मोठा फटका बसला असून, पक्षाला केवळ एकाच जागेवर समाधान मानावे लागले. प्रभाग क्रमांक १०-अ मध्ये भाजपचा उमेदवार विजयी झाला. तर प्रभाग क्रमांक ८-अ मधून एका अपक्ष उमेदवाराने विजय मिळवत नगरपरिषदेत प्रवेश केला आहे.

......................

**नगराध्यक्ष पदासाठी उमेदवार निहाय मिळालेली मते :-**

१) डॉ.आफरीन परवीन मोहम्मद जमीर (काँग्रेस) १२७४४ मते ( विजयी) २) खतीब रजिया बेगम सय्यद नातीकोद्दीन (नगर विकास पॅनल) १०८१७ मते ३) अकिला बी मोहम्मद अनिस ( एम.आय.एम.) ३९२१ मते ४) धनश्री चैतन्य अंबाडे (भाजपा) २१३० मते ५) जखिया बी बिस्मिल्ला खान (अपक्ष) ९५ मते ६) नोटा ११८ .

No. 3
FAMILY COURT AMRAVATI
IN THE COURT OF Shri. H. B. Shelke
Principal Judge Family Court Amravati, Amravati, Amravati.

SUMMONS TO APPEAR IN PERSON
(0.5, R. 3.)

Petition No.A/280/2025
Priyanka Mangesh Shrikhandkar Vs Mangesh Nilkanthrao Shrikhandkar
NEXT DATE: 03-02-2026

To,
Mangesh Nilkanthrao Shrikhandkar
R/o. Surya Wing Apartment, Bypass Highway, Khadki, Akola, Tq. and Dist. Akola., AKOLA, MAHARASHTRA

Whereas Priyanka Mangesh Shrikhandkar has instituted a suit against you for you are hereby summoned to appear in this Court in person on the 03-02-2026 at 11:00 o'clock in the forenoon, to answer the claim; and you are directed to produce on that day all the documents upon which you intend to rely in support of your defence.

Take notice that, in default of your appearance of the day before mentioned, the suit will be heard and determined in your absence. Given under my hand and the seal of the Court, this 16-12-2025

शिक्का

BEGISTRAR
Family Court. Amravati.
Principal Judge Family Court Amravati

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक २५**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail. com, abhiram.deshpande70@gmail.com

# हिवरखेड नगरपरिषद निवडणुकीत भाजपचा गुलाल

**■ प्रतिनिधी | हिवरखेड ■**

शहरात प्रथमच झालेल्या हिवरखेड नगरपरिषद निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने (भाजप) दमदार शक्तिप्रदर्शन करत ऐतिहासिक विजय नोंदविला आहे. नगराध्यक्षपदासह २० पैकी ११ नगरसेवक पदांवर विजय मिळवत भाजपने स्पष्ट बहुमत प्राप्त केले असून नगरपरिषदेवर एकहाती सत्ता स्थापन केली आहे.

या पहिल्याच नगरपरिषद निवडणुकीत भाजपच्या सौ. सुलभा रमेश दुतोंडे यांनी नगराध्यक्षपदावर दणदणीत विजय मिळवला. भाजपने सर्वाधिक ११ सदस्य निवडून आणत हिवरखेड नगरपरिषदेवर आपले पहिले नाव सुवर्णाक्षरांनी कोरले आहे. या निकालामुळे शहराच्या राजकारणात भाजपची भक्कम पकड निर्माण झाल्याचे स्पष्ट झाले आहे. भाजपच्या या ऐतिहासिक यशासमोर इतर पक्षांना फारशी चमक दाखवता आली नाही. शिवसेनेने ५ जागांवर विजय मिळवत विरोधी पक्षांमध्ये आघाडी घेतली, तर काँग्रेसला केवळ २ जागांवर समाधान मानावे लागले. एआयएमआयएम आणि वंचित बहुजन आघाडी यांनी प्रत्येकी एका जागेवर विजय मिळवत नगरपरिषदेच्या राजकारणात आपले खाते उघडले.

या निकालानंतर शहरात भाजप कार्यकर्त्यांनी जल्लोष साजरा केला असून नागरिकांकडूनही नवनिर्वाचित नगरपरिषदेकडून विकासाभिमुख कारभाराच्या अपेक्षा व्यक्त केल्या जात आहेत.



**नगराध्यक्ष पदाचा निकाल :** हिवरखेड नगराध्यक्ष पदासाठी एकूण ७ उमेदवार रिंगणात होते. त्यामध्ये भाजप, काँग्रेस, शिवसेना (शिंदे गट), राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट), वंचित बहुजन आघाडी तसेच दोन अपक्ष उमेदवारांचा समावेश होता.

भाजप : ४,९९० मते
शिवसेना : ३,७४९ मते
काँग्रेस : ३,५९२ मते
राष्ट्रवादी काँग्रेस : १,५३६ मते
वंचित बहुजन आघाडी : ६६० मते
अपक्ष (१) : २४९ मते
अपक्ष (२) : ४९ मते
NOTA : ५७ मते

**पक्षनिहाय विजयी उमेदवार :** नगराध्यक्ष :- सौ. सुलभा रमेश दुतोंडे (भाजप), १-अ सौ. वंदना राजेश वानखडे (भाजप), १-ब दानिश खाँ रसुल खाँ भाजप, २-अ सौ. सविता सुनिल इंगळे (वंचित बहुजन आघाडी), २-ब आजम खान सुबेदार खान (AIMIM), ३-अ सौ. प्रतिभा विरेंद्र येऊल (भाजप), ३-ब रामेश्वर पुंडलीक हागे (शिवसेना), ४-अ सौ. शितल प्रमोद पोके (शिवसेना), ४-ब ऋषीकेश श्रीकृष्णा पंचबुध्दे (शिवसेना), ५-अ सौ. प्रमिला रविंद्र मानकर (भाजप), ५-ब रवी (राणा) मधुकर घुंगड (शिवसेना), ६-अ दिपक बाबन रायबोले (भाजप), ६-ब सौ. अनिता रविंद्र वाकोडे (भाजप), ७-अ सौ. वैशाली गणेश वानखडे (भाजप), ७-ब अजीज खाँ जमीर खाँ (भाजप), ८-अ सौ. दिपाली संदिप इंगळे (भाजप), ८-ब वैभव रमेश गावंडे (भाजप), ९-अ प्रथमेश श्रीराम नाठे (भाजप), ९-ब जयश्री महादेव गावंडे (शिवसेना), १०-अ नादिया अंजुम नसीम खान (भा रा कॉंग्रेस), १०-ब रुबीनाज अब्दुल सलमान (भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस).

हिवरखेड नगर परिषदेच्या पहिल्या नगराध्यक्षपदी निवडून येण्याचा बहुमान मिळवून दिल्याबद्दल सर्व मतदारांचे जाहीर आभार व्यक्त करते. आणि सर्व नागरिकांच्या भावनांचा आणि मागण्यांचा आदर करून सर्वांच्या सहकार्याने हिवरखेड विकासाच्या दिशेने अग्रेसर राहील याची ग्वाही देते...

**सौ. सुलभा दुतोंडे,**
नवनिर्वाचित नगराध्यक्ष हिवरखेड

----------------

हिवरखेड नगरपरिषद मध्ये मतदारांनी शिवसेना प्रहार युतीला विरोधी पक्षात बसण्याचा दिलेला कौल आम्ही मान्य करतो. आम्हाला दुसऱ्या क्रमांकाची मते मिळाली आणि पाच नगरसेवक निवडून आले त्यामुळे जनतेने टाकलेला विश्वास सार्थकी ठरवून सक्षम विरोधी पक्षाची भूमिका आम्ही बजावणार आहोत.

**रवी राणा घुंगड**
नगरसेवक (शिवसेना शिंदेगट व प्रहार युती)

**नगरपरिषद हिवरखेड पक्षीय बलाबल :** नगराध्यक्ष - सौ सुलभाताई रमेश दुतोंडे भाजप, भाजप-११, शिवसेना-०५, भा.रा.कॉंग्रेस-०२, वंचित बहुजन आघाडी-०१, AIMIM-०१

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# मातोश्री वृद्धाश्रमात साकारणार गजानन महाराजांचे भव्य मंदिर

## डॉ.सुभाष गवई यांच्या हस्ते भूमीपूजन, शेकडो नागरिकांची उपस्थिती

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती-मालखेड रोडवरील माळेगाव स्थित मातोश्री वृद्धाश्रमात प्रसिद्ध चित्रकार विजय राऊत यांच्या संकल्पनेतून अद्भूत असे संत गजानन महाराजांचे भव्य मंदिर साकारले जाणार आहे. या मंदिराचे भूमीपूजन संत बेंडोजी महाराज यांच्या उपस्थितीत विदर्भ महारोगी सेवा मंडळाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.सूभाष गवई यांच्या हस्ते कर्मयोगी संत गाडगे महाराज जयंतीच्या पर्वावर पार पडले. यावेळी कर्मयोगी संत गाडगे महाराज कल्याण संस्थेचे पदाधिकारी तसेच शेकडो नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

मातोश्री वृद्धाश्रमाचे प्रणेते राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त शिक्षक सुखदेवराव राऊत यांच्या अध्यक्षतेखाली हा भूमीपूजन सोहळा थाटामाटात पार पडला. यावेळी कार्यक्रमाला प्राचार्य डॉ. सुभाष गवई, मनसे नेते राजू उंबरकर, प्रा.डॉ.दिनेश सूर्यवंशी, अमोल चवणे, वृद्धाश्रमाचे अध्यक्ष विजय राऊत यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. यावेळी प्रमुख अतिथींचा सत्कार विजय राऊत यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी बोलताना डॉ. सुभाष गवई यांनी समाजातील कुटूंबव्यवस्था आणि वृद्धांच्या सामाजिक परिस्थिती बाबत चिंता व्यक्त केली. यावेळी ते म्हणाले की, वृद्धाश्रमांची या समाजाला गरज नसावी अशी आदर्श स्थिती आम्हाला अपेक्षित असून वास्तविकतेत मात्र वृद्धाश्रमांमध्ये वृद्धांची संख्या वाढते आहे. राऊत कुटूंबाने हे व्रत अंगीकारून आजवर या वृद्धांची सेवा केली असून माळेगाव परिसरात वसलेल्या या रुद्धाश्रमाला त्या वानप्रस्थापनाचे स्वरूप प्राप्त करुन दिलेले आहे. छोट्या छोट्या टेकड्यांमध्ये असलेल्या हा रुद्धाश्रम खोलाट नदीने वेढलेला असून सुंदर वनराईने नटलेला आहे. त्यांचे हे कार्य कौतुकास्पद आहे. आज समाजात अनेक चांगले कार्य करणारे लोक असून संत गजानन महाराजांच्या आशिर्वादाने हे काम मोठे होत असून मला ते भूमीपूजन करण्याचा योग म्हणजे ईश्वरी संदेश असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.





यावेळी बोलताना राजू उंबरकर यांनी सुखदेवराव राऊत यांच्या आजवरच्या कामाबद्दल गौरवोद्गार काढून विजय राऊत यांनी वडिलांचा वारसा समर्थपणे ते चालवित असल्याचे ते म्हणाले. यासोबतच संत गजानन महाराजांच्या मंदिराच्या निर्मितीत जिथे कमतरता भासेल तिथे मी सर्वतोपरी सहकार्य करेल असेही त्यांनी सांगितले. यावेळी डॉ.दिनेश सूर्यवंशी यांनी कर्मयोगी संत गाडगे बाबांच्या जयंतीनिमित्ताने प्रबोधनकार ठाकरे संस्थेद्वारा चालविण्यात येणाऱ्या वृद्धाश्रमात संत गजानन महाराजांच्या मंदिराची पायाभरणी होत आहे की एक सामाजिक आणि दैवी बाब असल्याची भावना प्रकट केली. समाजात आज चांगले काम करणाऱ्यांच्या पाठिशी आपोआप समाजाची सर्व प्रकारची ताकद उभी होत असते. आज राऊत कुटूंबाच्या पाठिशी आमच्यासारखे अनेक लोक असून त्यांच्या कार्यात आम्ही सदैव सहभागी आहोत असे सांगितले. यावेळी त्यांनी सुर्यवंशी कुटूंबाकडून ५१ हजारांची देणगी मंदिराच्या कार्यासाठी देण्याचे वचन देखील उपस्थितांसमोर दिले.

सुखदेवराव राऊत यांनी अध्यक्षस्थानाहून बोलताना मातोश्री वृद्धाश्रमाचा आजवर खडतर प्रवास उपस्थितांसमोर मांडला. तसेच कार्यक्रमाचे प्रास्ताविकातून विजय राऊत यांनी वडिलांचा वारसा पुढे चालविण्यासाठी आमच्या पुढच्या पिढीने हे वृद्धाश्रम चालविण्याचे व्रत स्वीकारले असून आता पुढील पूर्णवेळ हा वृद्धाश्रमासाठी आपणे देणार असल्याचे सांगितले. तसेच वडिलांच्या संकल्पनेतून संत गजानन महाराजांचे भव्य दिव्य असे मंदिर इथे साकारल्या जाणार असून त्याची ख्याती दूरवर पोहोचेल असा मला विश्वास असल्याचे सांगितले. यावेळी त्यांनी राऊत कुटूंबातर्फे ५ लाखांची देणगी मंदिराच्या कार्यासाठी जाहिर केली. या कार्यक्रमाला शेकडो ज्येष्ठ नागरिक, महिला आणि नागरिकांची उपस्थिती होती. महाप्रसादासह कार्यक्रमाची सांगता झाली.

# महापालिकेच्या मालमत्ता कर शिबिराला अभूतपूर्व प्रतिसाद

## -एका दिवसात २.०७ कोटी रुपयांची विक्रमी वसुली

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती महानगरपालिकेतर्फे रविवारी, २१ डिसेंबर २०२५ रोजी आयोजित करण्यात आलेल्या विशेष मालमत्ता कर शिबिराला शहरवासीयांचा उत्स्फूर्त व मोठ्या प्रमाणात प्रतिसाद लाभला. या एकदिवसीय शिबिराच्या माध्यमातून उत्तर झोन क्र.१ मधील मालमत्ता कर वसुल रु.२६.०५ लाख, मध्य झोन क्र.२ मधील मालमत्ता कर वसुल रू.४१.६६ लाख, पुर्व झोन क्र.३ मधील मालमत्ता कर वसुल रू.९८.३३ लाख, दक्षिण झोन क्र.४ मधील मालमत्ता कर वसुल रु.१८.६२ लाख, पश्चिम झोन क्र.५ मधील मालमत्ता कर वसुल रु.२१.९१ लाख असे तब्बल २ कोटी ७ लाख रुपये इतक्या मालमत्ता कराची वसुली करण्यात आल्याने महानगरपालिकेच्या महसुलात लक्षणीय वाढ झाली आहे.



महानगरपालिकेच्या कर विभागाने शहरातील करदात्यांना सुविधा मिळाव्यात, थकबाकी कमी व्हावी तसेच नियमित कर भरण्यास प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने हे शिबिर आयोजित केले होते. रविवारचा सुट्टीचा दिवस असूनही सकाळपासूनच विविध शिबिर केंद्रांवर नागरिकांची गर्दी पाहायला मिळाली. अनेक नागरिकांनी कुटुंबासह उपस्थित राहून मालमत्ता कराची थकबाकी व चालू वर्षाचा कर भरला. या शिबिरात नागरिकांसाठी ऑनलाईन पेमेंट, कार्डद्वारे भरणा, रोख रक्कम स्वीकारणे अशा विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. तसेच करासंदर्भातील शंका, नाव नोंदणी, मालमत्तेच्या दुरुस्त्या, माफक सवलती याबाबत माहिती देण्यासाठी स्वतंत्र मदत काउंटरही उभारण्यात आले होते. त्यामुळे कर भरण्याची प्रक्रिया जलद, पारदर्शक व सुलभ झाली. अधिकाऱ्यांनी शिबिराच्या यशस्वी आयोजनाबद्दल समाधान व्यक्त करत नागरिकांचे सहकार्य महत्त्वाचे ठरल्याचे नमूद केले. 'नागरिकांनी वेळेत कर भरल्यामुळे महानगरपालिकेला शहर विकासासाठी आवश्यक निधी उपलब्ध होणार आहे,' असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

# मेस्को क्षेत्रीय कार्यालय येथे माजी सैनिकांसाठी लिपिक पदांची भरती

**अमरावती/प्रतिनिधीः-** मेस्को क्षेत्रीय कार्यालय, सैनिकी मुलांचे वसतिगृह नवसारी, अमरावती येथे भारतीय संरक्षण दलातून निवृत्त झालेल्या माजी सैनिकांसाठी 'लिपिक नि टंकलेखक' या पदाच्या एकूण दोन जागांसाठी भरती जाहीर करण्यात आली आहे. या पदासाठी सशस्त्र सेना दलातील निवृत्त जेसीओ, ओआर, वीर पत्नी अर्ज करू शकतात. उमेदवाराचे वय ५७ वर्षांपेक्षा जास्त नसावे आणि तो महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा. शैक्षणिक पात्रतेमध्ये मराठी भाषेचे ज्ञान, एम.एस. ऑफिस, अकाऊंटिंग आणि मराठी व इंग्रजी टायपिंगचे मूलभूत ज्ञान असणे आवश्यक असून त्याबाबतचे प्रमाणपत्र जोडणे अनिवार्य आहे.लष्करी सेवेत कार्यालयीन अधीक्षक किंवा मुख्य लिपिक पदाचा अनुभव असलेल्यांना निवडीत प्राधान्य दिले जाईल. तसेच उमेदवाराची वैद्यकीय श्रेणी शक्यतो 'शार्प-१' असावी.

निवड झालेल्या उमेदवारास दरमहा तीस हजार रुपये मानधन दिले जाईल. इच्छुकांनी आपले अर्ज ५ जानेवारी २०२६ पर्यंत ro-amravati@ mescoltd. co.in या ई-मेलवर किंवा 'क्षेत्रीय कार्यालय अमरावती, सैनिकी मुलांचे वसतिगृह, नवसारी, अमरावती-४४४६०४' या पत्त्यावर पोस्टाने पाठवावेत. अधिक माहितीसाठी संपर्क क्रमाक- ०२७१-२९५२०४०, मोबाईल नंबर- ९३७३१६४९६२ तसेच ७४९५०९७९५८ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# दर्यापूर तालुक्यातील शेतकऱ्यांनी १५ जानेवारी पर्यंत 'ई-पिक' पाहणी पूर्ण करावी

## तहसिलदार यांचे आवाहन

**खल्लार/प्रतिनिधीः-** खरीप व रब्बी हंगाम २५-२६ मधिल पिकांची नोंद सातबारा उताऱ्यावर करण्यासाठी 'ई-पिक' पाहणी प्रकल्पांतर्गत पिक नोंदणीची मुदत १५ जानेवारी २६ पर्यंत आहे. दर्यापूर तालुक्यातील ज्या शेतकऱ्यांनी अद्याप आपल्या पिकांची नोंदणी केलेली नाही. त्यांनी ती विहित मुदतीत पूर्ण करावी, असे आवाहन दर्यापूरचे तहसिलदार यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

शेतकऱ्यांनी आपल्या मोबाईलमधिल 'ई-पिक पाहणी ॲपचा वापर करून स्वतःच्या पिकाची माहिती भरावयाची आहे.ई-पिक पाहणीचे महत्त्व, सातबारा अद्ययावत होणे, ई-पिक पाहणीमुळे तुमच्या सातबारा उताऱ्यावर पिकाची अचूक नोंद होते, ज्यामुळे तो कायदेशिर पुरावा मानला जातो. शासकीय योजनांचा लाभ, पिकविमा , पिक कर्ज आणि नैसर्गिक आपत्तीमध्ये मिळणारी मदत मिळवण्यासाठी ई-पीक पाहणीची नोंद अनिवार्य आहे.अचूक पिक पेरा अहवाल तालुक्याचा आणि राज्याचा अचूक पिक पेरा निश्चित करण्यासाठी या माहितीचा उपयोग होतो, ज्याचा फायदा भविष्यात शेतीविषयक धोरणे ठरवताना होतो. शेतकऱ्याने स्वतः माहिती भरल्यामुळे यात पारदर्शकता राहते आणि प्रशासकीय फेऱ्या मारण्याची गरज उरत नाही.




रब्बी हंगामासाठी पिक पाहणीची अंतिम तारीख १५ जानेवारी २६ आहे. यानंतर ई-पिक पाहणीचे पोर्टल बंद होईल. तांत्रिक अडचणी टाळण्यासाठी शेवटच्या दिवसाची वाट न पाहता तात्काळ नोंदणी करावी.ज्या शेतकऱ्यांना ॲप वापरण्यास अडचण येत असेल त्यांनी आपल्या गावातील कोतवाल, तलाठी, किवा कृषी सहाय्यक यांच्याशी संपर्क साधावा. असे आवाहन तहसिलदार डॉ. रविंद्र कानडजे यांनी दर्यापूर तालुक्यातील शेतकऱ्यांना केले आहे.

# गाडगे बाबा यात्रेतील हल्ला प्रकरणात तिघांना अटक

## -गाडगेनगर पोलिसांची त्वरित कारवाई

**अमरावती/प्रतिनिधीः-** गाडगे बाबा यात्रेदरम्यान घडलेल्या हल्ल्याच्या घटनेत गाडगेनगर पोलीस ठाण्याने तातडीची कारवाई करत तीन आरोपींना अटक केली आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे दीप सुनील पिंजरकर (वय १८, रा. सावळापूर, ता. अचलपूर), तनिश विनोद चांदूरकर (वय १८, रा. वाकी, ता. भातकुली) आणि आशिष प्रमोद वंजारी (वय २१, रा. बैलमारखेडा, ता. भातकुली) अशी आहेत.

गाडगेनगर स्थित गाडगेबाबा मंदिरासमोरील यात्रेदरम्यान एका तरुणावर चाकूने हल्ला करण्यात आला होता. या प्रकरणी गाडगेनगर ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यात्रेदरम्यान झालेल्या हल्ल्याची गंभीर दखल घेत पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवत संशयितांचा माग काढला आणि त्यांना ताब्यात घेतले. अटक केलेल्या आरोपींची वैद्यकीय तपासणीसाठी गाडगेनगर पोलिसांनी जिल्हा सामान्य रुग्णालयात आणले होते. पुढील तपासात वैद्यकीय अहवाल व इतर पुराव्यांच्या आधारे कायदेशीर प्रक्रिया राबविण्यात येणार असल्याचे पोलिसांनी सांगितले. यात्रेदरम्यान कायदा-सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पोलिसांकडून कडक पावले उचलली जात असून, अशा प्रकारच्या घटनांना आळा घालण्यासाठी कठोर कारवाई सुरू राहील, असा इशाराही पोलिसांनी दिला आहे.

# मतदार जनजागृतीसाठी 'हॅपी स्ट्रीट्स' उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग

## -स्वीप अंतर्गत आयोजित कार्यक्रम यशस्वीरीत्या संपन्न

**अमरावती/प्रतिनिधीः-** लोकशाही बळकट करण्यासाठी व मतदारांमध्ये मतदानाबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने अमरावती महानगरपालिका व स्वीप कार्यक्रमाअंतर्गत आयोजित करण्यात आलेला मतदार जनजागृती अभियान व 'हॅपी स्ट्रीट्स अमरावती' उपक्रम रविवारी उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीरीत्या पार पडला. 'मी मतदान करणार आहे – माझा वोट, माझा भविष्य' आणि 'लोकशाही माझा अभिमान – १००% मतदान' या प्रभावी संदेशांनी कार्यक्रमाचे संपूर्ण वातावरण भारावून गेले.

वेलकम पॉईंट, मोर्शी रोड येथे सकाळी ६ वाजल्यापासून सुरू झालेल्या या उपक्रमात नागरिकांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग पाहायला मिळाला. महिला, युवक, ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग व्यक्ती तसेच विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी यांनी उत्स्फूर्तपणे उपस्थित राहून लोकशाही प्रक्रियेत आपला सहभाग नोंदवला. कार्यक्रमात सहभागी नागरिकांनी मतदानाचे महत्त्व समजून घेत आगामी निवडणुकीत निश्चितपणे मतदान करण्याचा संकल्प व्यक्त केला.



या उपक्रमांतर्गत झुंबा, क्रीडा प्रकार, विविध खेळ, सामूहिक व्यायाम व मनोरंजनात्मक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या माध्यमातून मतदार जनजागृतीचा संदेश सहज व प्रभावी पद्धतीने पोहोचवण्यात आला. आनंद, आरोग्य व लोकशाही यांचा सुरेख संगम या कार्यक्रमात अनुभवायला मिळाला. विशेषतः महिलांचा सहभाग लक्षणीय ठरला. महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून 'माझे मत – माझा अधिकार' हा संदेश समाजापर्यंत पोहोचवला. युवकांनीही मतदानाविषयी सकारात्मक भूमिका मांडत लोकशाही प्रक्रियेत सक्रिय राहण्याचे आवाहन केले. उपस्थित नागरिकांनी मतदान नोंदणी, मतदानाची प्रक्रिया व मतदानाचा राष्ट्रीय विकासातील वाटा याबाबत माहिती घेतली. अमरावती महानगरपालिकेच्या या अभिनव उपक्रमामुळे मतदारांमध्ये मतदानाबाबत सकारात्मक वातावरण निर्माण झाले असून १०० टक्के मतदानाच्या उद्दिष्टाकडे शहर एक पाऊल पुढे गेले आहे. लोकशाही मूल्ये दृढ करण्यासाठी असे उपक्रम सातत्याने राबविणे आवश्यक असल्याचे मत यावेळी नागरिकांनी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल अमरावती महानगरपालिका व स्वीप समितीचे सर्व स्तरांतून कौतुक होत असून, आगामी निवडणुकीत मतदारांचा सहभाग वाढविण्यासाठी हा उपक्रम निश्चितच प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

# अशोक सोमाणी यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आयोजित रक्तदान शिबिर

## -८४ रक्तदात्यांनी केले रक्तदान

**अमरावती/प्रतिनिधीः-** स्वेच्छा रक्तदानाच्या क्षेत्रात रक्तदान समितीने केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर देशभरात अमरावतीला प्रसिद्धी मिळवून दिली आहे. म्हणूनच आज हे शहर रक्तदात्यांचे शहर म्हणून ओळखले जाते असे मत, दिवंगत अशोक सोमाणी यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आयोजित ३९ व्या रक्तदान शिबिरात आमदार सुलभा खोडके यांनी व्यक्त केले.

सोमाणी कुटुंब आणि रक्तदान समितीच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरात श्री गणेशदास राठी शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष वसंतबाबू मालपाणी, माहेश्वरी पंचायतीचे नवनिर्वाचित अध्यक्ष सुरेश साबू, सचिव अशोक जाजू आणि सामाजिक आणि धार्मिक उपक्रमांमध्ये अग्रणी असलेले गोपालदास राठी यांनी दिवंगत अशोक सोमाणी यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ ३९ वर्षांपासून आयोजित करण्यात येणाऱ्या रक्तदान शिबिराचे कौतुक केले. त्यांनी रक्तदान समितीचे अध्यक्ष महेंद्र भुतडा आणि त्यांच्या समितीने गेल्या ५० वर्षात स्वेच्छा रक्तदानाच्या क्षेत्रात केलेल्या कार्याचे कौतुक केले. या प्रसंगी ८४ रक्तदात्यांनी रक्तदान केले. या रक्तदात्यांमध्ये जयकिशोर सोमाणी, राजेंद्र सोमाणी, नवरतन सोमाणी, राधेश्याम सोमाणी, सुधीर सोमाणी, रोहित सोमाणी, लक्ष्मीकांत सोमाणी, गोविंद सोमाणी, गोपाल सोमाणी, मुकेश सोमाणी, आनंद सोमाणी, संतोष गांधी, निर्मल लड्ढा, सुरेश लड्ढा, संजय टावरी, संजय रोहित चंदगड, सुधीर सोमाणी, संजय चंदवाडे, संजय धोंडगे आदी उपस्थित होते. यासोबतच संतोष चांडक, डॉ.नंदकिशोर भुतडा, सुरेश हेडा, अजय सारडा, संजय सारडा, शांती सारडा, सुरेश चांडक, चंदन मंत्री, संजय राठी, प्रदीप मोहता, दामोदर खंडेलवाल, लक्ष्मीकांत खंडेलवाल, श्री कृष्णा कलंत्री, लाला श्रीमाळी, गिरीश माणका, गिरीश माणका, निलेश राठी, प्रो. कलंत्री, नंदकिशोर कलंत्री, रोहन चिमोटे, प्रवीण बुंदेले, नाना चौधरी, दया केसरवाणी, रामगोपाल वर्मा, अनुष भैया, किशोर मोहता, महेश मोहता, लप्पी जाजोदिया, अमृत मुथा, अंकित जैन, सोनू खंडेलवाल, भरत टापरिया, गोपाल बागरी, दिनेश देशमुख, मनीष देशमुख, रतन डेंडुले, नितीन चावले, रवीभाऊ देशमुख, महेंद्र पांढरे, बालकिशन डागा, प्रा.रवी कोल्हे, राजकुमार कोल्हे, राजकुमार पाटील, प्रा. कुऱ्हेकर, मदन सोनी, रोशन धोठे, राजू पारेख, प्राचार्य भांगडीया, प्रा.संजय शिरभाते, जीतू ठाकूर, संजय तिरटकर, मनोज भेले, ओमप्रकाश नावंदर, विनोद डागा, सुनील छटवानी, कुणाल जाधव, सिद्धार्थ चवरे, सिद्धार्थ चवरे, सुप्रसिद्ध रावकर, डॉ. विकास राठी, संदेश अग्रवाल, नुकूल राठी, प्रणव चौधरी, सुमित वानखेडे, विशाल खंडारे (शिवगाव) अनुराग सदानी, प्रतिक बनारसे, गोकुळ मोहता, सौरभ मोहता, रितिक राजा, गोकुळ बूब, मनोहर भुतडा, यश भुतडा, यश. भुतडा, आयुष भुतडा, अरविंद बांबळ, अतुल देशमुख, निशांत गोहिल, पलाश नानवाणी, विश्वास नानवाणी, क्रिश सारडा, सरला भुतडा, सुचिता भुतडा, श्रुती भुतडा, हिना लोहिया, उषा मोहता, रीना मोहता, शीतल सोमाणी, सोनाली राठी आदी उपस्थित होते. यासोबतच रक्तदान समितीचे महेंद्र भुतडा, सिमेश श्रॉफ, शैलेश चौरसिया, किशन गोपाल सदानी, डॉ.संजय कुलकर्णी, उमेश पाटणकर, युसूफ भाई बारामतीवाला, रितेश व्यास, डॉ.राजेश पांडे, निषाद जोध, मोहन लड्ढा, संदीप खेडकर, योगेंद्र मोहोड, डॉ. पंजाबराव देशमुख रक्तपेढीचे सचिन काकडे, डॉ. ऋचा अचिंतलवार, डॉ. मेघा, अमोल कुचे, नितीन आखरे, वंदना चौधरी, हरीश खान, प्रतिक नेवारे इत्यादी उपस्थिती होती. यावेळी आयोजकांकडून प्रतिभा शिवनारायण राठोड आणि मालती पाठक यांना शिलाई मशीन देण्यात आल्या.



# ध्वजनिधी संकलन शुभारंभ व माजी सैनिक मेळावा

**अमरावती :** मंगळवार, दि. २३ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता, नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय येथे ध्वजनिधी संकलन शुभारंभ व माजी सैनिक मेळावा संपन्न होत आहे. तरी सर्व माजी सैनिक, वीर पत्नी यांनी सहपरिवार उपस्थित राहण्याचे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी केले आहे.

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**

**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**

(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक १०४**

आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

## जाहीर सुचना

या जाहीर सुचनेव्दारे सुचित करतो की, माझे पक्षकार **बबनराव भिमरावजी गावंडे,** रा.अचलपूर, ता. अचलपूर, जि. अमरावती यांनी दि.२९/०३/२०१० रोजीचे खरेदी दस्त क्र.११६५ नुसार मौजे -परतवाडा, ता.अचलपूर, जि.अमरावती येथील नझुल शिट नं.१९-डी मधील नझुल प्लॉट नं.१७०/1 भाग ज्याचे क्षेत्रफळ २६५.७९ चौ.मि. व त्यावरील बांधकाम सह हा मनोजकुमार गुलाबचंदजी जोशी यांचे कडून विकत घेतला आहे.

हयाप्रमाणे सदर खरेदी दि.२९/०३/२०१० रोजीचे दस्त क्र.११६५ चे **मुळ खरेदी दस्त** माझे पक्षकार बबनराव भिमरावजी गावंडे यांचे जवळ आहे. परंतु सदर मालमत्तेचे पूर्वीचे मुळ खरेदी दस्त जसे दि.२५/०४/२००६ रोजी दस्त अ.क्र.१२०५ चे दस्त **अ.क्र.१२०५ चे दस्त, हे या जाहीर सुचनेचा विषय असुन** सदर दस्ताचे मुळ खरेदीखत व त्याची पावती माझे पक्षकार यांचे कडून गहाळ झालेली आहे.

सदर हरविलेल्या दस्ताची रितसर दि.११/१२/२०२५ पोलीस स्टेशन परतवाडा येथे तक्रार दाखल केलेली आहे.

तरी सदर प्लॉट बाबत कोणाचोही, कोणत्याही प्रकारचे कर्ज, गहाण, बोजा, हक्क, हितसंबंध व इतर कोणतीही भानगड, कायदेशिर वाद, लवाद,दावा असल्यास किंवा त्याबाबत कोणतीही हरकत असल्यास जाहीर सुचनेपासुन १५ दिवसाचें आंत खालील पत्यावर लेखी स्वरुपात संपर्क साधावा. त्यानंतर आक्षेप आल्यास याची नोंद घेतली जाणार नाही.

दिनांक १२/१२/२०२५
अमरावती.

ॲडव्होकेट
**राहुल व्ही.मोहोड**
प्रेरणा कॉलनी, राधा नगर,
अमरावती- ४४४६०३
मो.क्र.९०९६४६०६७०

## जाहीर सोडचिठ्ठी

**जाहीर सोडचिठ्ठी घेणार - पार्टी नं.१ - सौ.दिप्ती हर्षवीर सवाळे**
वय २६ वर्षे, रा.उध्दवजी ढवळे यांच्या घरी (माहेरी)
दादापूर, ता. नांदगांव खंडेश्वर, जि.अमरावती

**जाहीर सोडचिठ्ठी देणार - पार्टी नं.२ - हर्षवीर पद्माकरजी सवाळे**
वय ३२ वर्षे, रा.बोरगांव धांते,
ता. धामणगांव रेल्वे, जि.अमरावती

आम्ही दोघे पार्टी नं.१ आणि पार्टी नं.२ वरील पत्त्यावर राहतो. आम्ही नात्याने पती-पत्नी आहोत. कुणाच्याही दबावात न येता, चांगल्या मानसिक अवस्थेत सामाजिक जातमान्यतेनुसार मी स्वतः पार्टी नं.१ माझे पतीला दिनांक **२२ डिसेंबर,२०२५** ला जाहीर सोडचिठ्ठी देत आहे.

आमचा विवाह **१ जानेवारी २०२२** ला बौध्द पध्दतीने झालेला आहे. मागील एक वर्षापासून पार्टी नं.१ माहेरी राहत आहे. यापुढे दोघाही पती-पत्नीचे पटणे शक्य नाही. सततच्या सांसारिक कलहातून कुणाचीही जीवितहानी होऊ नये म्हणून याच क्षणी पार्टी नं.१ बिनशर्त घटस्फोट घेत आहे.

यापुढे दोघेही दुसरा विवाह करण्यास मोकळे झालो आहे. यापुढे दोघेही एक दुसऱ्याच्या आयुष्यात हस्तक्षेप करणार नाही. एक दुसऱ्याची सामाजिक बदनामी करणार नाही. हे पती-पत्नीचे वैवाहिक संबंधाचे नाते येथेच संपुष्टात येत आहे.

**स्थळ** - अमरावती जिल्हा (महाराष्ट्र राज्य)
**दिनांक** - २२ डिसेंबर २०२५

**जाहीर सोडचिठ्ठी देणार**
**पत्नी - सौ.दिप्ती हर्षवीर सवाळे**

## श्री. संत अच्युत महाराज हार्ट हॉस्पिटल

मार्डी रोड, अमरावती.

वेबसाईट : https://samhearthospital.org/
ईमेल : hearthospitalamravati@gmail.com
दिनांक : २१/१२/२०२५

### मनुष्यबळ पुरविणाऱ्या बाह्य संस्थेकरीता नोटीस

श्री. संत अच्युत महाराज हार्ट हॉस्पिटल अमरावती येथे मनुष्यबळ पुरविणारी बाह्य नोंदणीकृत संस्था व कायदेशीर सेवा प्रदात्यांसाठी Walk in metting (मुलाखत) आयोजित करण्यात आलेली आहे. तरी, पात्र संस्थेने खालील आवश्यक कागदपत्रे घेवून उपस्थित रहावे.

१. संस्था/कंपनी नोंदणीकृत प्रमाणपत्र (प्रायवेट सिक्युरिटी एजन्सीज ॲक्ट)
२. जी.एस.टी. नोंदणी प्रमाणपत्र.
३. ई.पी.एफ. नोंदणी प्रमाणपत्र व नुकतेच भरेल्या चलनाच्या प्रती.
४. ई.एस.आय. नोंदणी प्रमाणपत्र व नुकतेच भरलेल्या चलनाच्या प्रती
५. संस्था/कंपनी चे पॅनकार्ड.
६. कंत्राट कामगार अनुज्ञप्ती (कामगार कायद्याप्रमाणे कामगार पुरविण्याकरीता)
७. अनुभव प्रमाणपत्र / ग्राहक यादी.
८. सध्या उपलब्ध असलेल्या मनुष्यबळाच्या संख्येचा तपशील.
९. अधिकृत स्वाक्षरीकर्ताचे ओळखपत्र.
१०. संस्थेचे/कंपनीचे पार्श्वरेखा/प्रस्ताव (मुळप्रत)
११. आयकर मंजुरी प्रमाणपत्र/आयकर परतावा प्रमाणपत्र (मागील ३ वर्षांचे)
१२. ई.एमडी. प्रमाणपत्र (सुट घेण्याकरीता आवश्यक असेल तर)
१३. मनुष्यबळ पुरविण्यापासून प्रतिबंधित केलेले नसल्याबद्दलचे प्रतिज्ञापत्र.
१४. निविदा ठेव रक्कम (नियमाप्रमाणे)
१५. पात्र संस्थेने/कंपनीने कामगारांच्या पगाराबाबतच्या रकमेचा अहवाल व कर भरणा बाबतचा अहवाल वेगवेगळा सादर करावा. (व्यवस्थापन सदरबाब पुर्ण किंवा अंशतः मान्य करण्याचा हक्क राखून ठेवित आहे.
१६. कामगारांच्या पगाराची रक्कम जी.एस.टी. वगळून असावी. (जी.एस.टी. भरणा व्यवस्थापन करेल.)
१७. संस्थेने/कंपनीने कार्यरत कामगाराचा बदली/पर्यायी कामगार ठेवणे आवश्यक.
१८. संस्थेने /कंपनीने बायोमेट्रीक उपस्थिती उपकरण ठेवणे आवश्यक.
१९. संस्थेचे/कंपनीचे मागील ३ वर्षांचे उलाढाल प्रमाणपत्र.
२०. मुलाखतीनंतर पात्र संस्थेने /कंपनीने रुपये १ करोडचे सोल्व्हंसी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक

सुचना : वरील आवश्यक कागदपत्रे व नमुद बाबी सूचना पूर्ण करणाऱ्या सेवा प्रदात्यांनीच उपस्थित रहावे.

स्थल : श्री.संत अच्युत महाराज हार्ट हॉस्पिटल, अमरावती
दिनांक : २३/१२/२०२५
वेळ : सायं. ५.00 वाजता

व्यवस्थापन
श्री. संत अच्युत महाराज हार्ट हॉस्पिटल
अमरावती.

# सिंदी रेल्वेवर ‘कमळ’ फुलले राणी कलोडेंचा ११०० मतांनी धडाकेबाज विजय

## अपक्ष-बंडखोरांनी नेत्यांची झोप उडवली

**सिंदी रेल्वे/जनमाध्यम**

स्थानिक नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीत अखेरचा फेरा रंगतदार ठरला आणि भाजपाच्या राणी कलोडे यांनी नगराध्यक्षपदावर ११०० मतांची निर्णायक आघाडी घेत दणदणीत विजय मिळवला. अटितटीच्या लढतीत रा. काँ. (शरद पवार) गटाच्या सुनीता कलोडे यांचा पराभव करत भाजपाने सिंदी रेल्वेवर सत्ता पटकरली. या निवडणुकीत अपक्ष व बंडखोर उमेदवारांनी अनेक दिग्गजांचे गणित बिघडवत



राजकीय धक्के दिल्याने निकालाला अधिकच धार मिळाली.

प्रथम प्रभागनिहाय निकाल जाहीर झाले आणि त्या नंतर नगराध्यक्षपदासाठीच्या सहा उमेदवारांच्या भाग्याचा फैसला झाला. मतमोजणी पूर्ण होताच निवडणूक व निर्णय अधिकारी बबिता आळंदे यांनी राणी कलोडे यांच्या विजयाची अधिकृत घोषणा केली आणि भाजपाच्या गोटात जल्लोष उसळला. प्रभागनिहाय निकालांनीही राजकीय चित्र स्पष्ट केले. प्रभाग क्र. १ मधून भाजपाचे सुधाकर वल्के व जयश्री मडावी विजयी झाले. प्रभाग क्र. २ मध्ये भाजपाच्या चेतना बडवाईक आणि शरद तळवेकर यांनी बाजी मारली. प्रभाग क्र. ३ मधून भाछपाचे प्रवीण मडावी व राजश्री बोरीकर यांनी सहज विजय मिळवला. प्रभाग क्र. ४ मध्ये काँग्रेसचे सूरज कोपरकर व अपक्ष ममता बोंगाडे विजयी ठरले. प्रभाग क्र. ५ मध्ये झालेल्या तुफान संघर्षात काँग्रेसचे अजय रामदास कलोडे आणि दुर्गा बेलखोडे विजयी झाले; येथे सातव्यांदा नशीब आजमावणारे अशोक सातपुते पराभूत झाले.प्रभाग क्र. ६ मध्ये तुल्यबळ लढतीनंतर तुषार हिंगणेकर व ज्योत्सना तडस विजयी ठरले. प्रभाग क्र. ७ मध्ये शरद पवार गटाचे जगदीश बोरकर आणि भाजपाच्या ऐश्वर्या गवळी यांनी विजय मिळवला बहिण-भाऊ एकाच प्रभागातून विजयी होणे ही लक्षवेधी बाब ठरली. प्रभाग क्र. ८ मधून शरद पवार गटाचे आशीष देवतळे (माजी नगरसेवक) आणि भाजपाच्या योगीता जांबूतकर विजयी झाल्या. प्रभाग क्र. ९ मधून भाजपाचे घनश्याम मेंढे व पुष्पा प्रकाश सिरसे विजयी झाले. प्रभाग क्र. १० मध्ये तब्बल अकरा उमेदवार रिंगणात असताना भाजपाचे अकील शेख (माजी नगरसेवक) आणि इंदुताई कस्तुरे यांनी बाजी मारली.निकाल जाहीर होताच विजयी उमेदवारांनी पेढे वाटत, गुलाल उधळत ढोल-ताशांच्या गजरात भव्य विजयी मिरवणूक काढली. एकीकडे भाजपाचा झेंडा फडकत असतानाच दुसरीकडे अपक्ष-बंडखोरांनी निर्माण केलेली राजकीय उलथापालथ भविष्यातील नगरपरिषदेतील राजकारण अधिकच रोखठोक आणि चुरशीचे होणार असल्याचे संकेत देऊन गेली.

## चुकीची माहिती दिल्याबद्दल आर्वीच्या तत्कालीन बीडीओंवर कारवाई कर

**आर्वी/जनमाध्यम**

ग्रामपंचायत रोहणा येथील कारभाराबाबत तत्कालीन गटविकास अधिकारी आर्वी यांनी जिल्हा परिषदेला दिशाभूल करणारी व चुकीची माहिती दिल्याबद्दल त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी ग्रामपंचायत रोहणाच्या ग्रा.पं. सदस्या अश्विनी संदीप सुटे व माजी सदस्य संदीप सुटे यांनी जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे निवेदन देऊन केली आहे.ग्रामपंचायत रोहणा येथे सरपंच व सचिवांनी पदाचा दुरुपयोग करीत कामकाजात हयगय केली. याप्रकरणी अश्विनी सुटे व संदीप सुटे यांनी तक्रार केल्यानंतर सुनावणीअंती मुद्देसूद खुलासा करण्यात आला होता. व त्यानंतर तत्कालीन गटविकास अधिकारी मरस्कोल्हे यांना तो अहवाल जिल्हा परिषदला सादर करायचा होता. मरस्कोल्हे यांनी कारणे दाखवा नोटीसमधील मुद्दा क्र. १ ते १० व १० मधील १ ते ५१ याला बाजूला सारून नोटीशीतील मुद्यांच्या विरोधात खुलासा जि.प.ला सादर केला. त्यामुळे जिल्हा परिषदला दिशाभूल करणारी व चुकीची माहिती दिल्याबद्दल आर्वी तत्कालीन गटविकास अधिकारी मरस्कोल्हे यांच्यावर कारवाई करावी, अशी मागणी ग्रा.पं. सदस्या अश्विनी संदीप सुटे व संदीप सुटे यांनी केली आहे.

## मतदार स्वयंसेवकांच्या भूमिकेत रोव्हर्स व रेंजर्स

### वर्धा व देवळी न प निवडणुकीत सेवा प्रदान

**वर्धा/जनमाध्यम**

वर्धा नगर परिषद निवडणूक व देवळी नगरपरिषद निवडणूक कार्यक्रमात देवळीच्या एस एस एन जे महाविद्यालयातील ३५ रोव्हर्स व रेंजर्सनी २० डिसेंबर रोजी झालेल्या निवडणुकीत सर्वच मतदान केंद्रावर येणाऱ्या वृद्ध, अपंग व महिलांना ‘मतदार स्वयंसेवक’ म्हणून आपली सेवा प्रदान करून स्काऊट गाईड चळवळीचे ‘ब्रीद वाक्य’ जोपासले.

रोव्हर स्काऊटचे जिल्हा आयुक्त तथा मतदार स्वयंसेवक समन्वयक कॅप्टन मोहन गुजरकर यांच्या मार्गदर्शनाखाली देवळी नगरपरिषद निवडणूक केंद्रावर सहाय्यक रेंजर लीडर कल्याणी



लिखार, आरती मरघडे, राधिका नागोसे, कुंदन कावडे, साक्षी पारीसे, सलोनी अजमिरे, साहिल जगनाडे, राम देशमुख, विपुल पेंदाम, तनिषा उईके, रश्मी मडावी, पायल नखाते, साहिल गेडाम, सोमेश्वर पोराटे, प्रवेश किटे, तेजस वाघाडे, पंकज पवार, वैष्णवी कन्नाके, स्नेहा मडकाम, दर्शना कदम व विक्की पेंदोरकर यांनी तर वर्धा नगरपरिषद निवडणूक मतदान केंद्रावर रेंजर समीक्षा नेवारे, सत्तेश्वरी सावरकर, यामिनी पारधी, पुनम डांगरे, कांचन देशमुख, साक्षी बोरसरे, सिमरन नट, वैष्णव बांगडे, उदय काळे, पूर्वा कापटे, साक्षी सातव, जानवी झोड व कांचन देशमुख यांनी ‘मतदार स्वयंसेवक’ म्हणून सेवा प्रदान केली.वर्धा नगरपरिषदेचे निवडणूक निर्णय अधिकारी गणेश खताळे, स्विप नोडल अधिकारी तथा डायटचे प्राचार्य डॉ. मंगेश घोगरे तर देवळी नगरपरिषद निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार स्नेहा शिरसागर व गटशिक्षणाधिकारी अश्विनी नेमाडे तथा प्रशासकीय अधिकाऱ्यांनी तसेच मतदारांनी रोव्हर स्काउट्स व रेंजर गाईड्स यांच्या प्रशंसनीय सेवेची दखल घेऊन त्यांचे अभिनंदन केले.

## मुंबईत आरक्षणासाठी आर-पारची लढाई

### धनगर समाजाच्या एस.टी. अंमलबजावणीचा संघर्ष निर्णायक टप्प्यावर

### जिल्ह्यातून हजारोंच्या संख्येने सहभागी व्हा ; दीपक बोऱ्हाडे यांचे आवाहन

**वर्धा/जनमाध्यम**

धनगर समाजाच्या एस.टी. आरक्षणाच्या अंमलबजावणीसाठी गेल्या अनेक दशकांपासून सुरू असलेला संघर्ष आता शेवटच्या टोकावर पोहोचला असून, २१ जानेवारी २०२६ रोजी मुंबईत होणारे आंदोलन निर्णायक ठरणार आहे, असा ठाम विश्वास व्यक्त करत जिल्ह्यातून हजारोंच्या संख्येने समाजबांधवांनी मुंबईत सहभागी व्हावे, असे आवाहन संघर्ष योद्धा व धनगर समाजाचे नेते दीपक बोऱ्हाडे यांनी केले.

अहिल्यादेवी होळकर स्मारक सभागृह, वर्धा येथे १७ डिसेंबर रोजी आयोजित जाहीर सभेत ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नेते अरुण लांबाडे होते. यावेळी समाजातील विविध संघटनांचे पदाधिकारी, युवक, महिला, विद्यार्थी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.दीपक बोऱ्हाडे म्हणाले की, संविधानानुसार धनगर समाजाचा



एस.टी. प्रवर्गात स्पष्ट समावेश असून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी हा अधिकार घटनेत दिला आहे. समाजाची मते घेऊन सत्तेत गेले आणि सत्तेत पोहोचताच पाठ फिरवली, अशी घणाघाती टीकाही त्यांनी केली.गेल्या अकरा ते बारा वर्षांत तब्बल ५७ ते ५८ वेळा मोर्चे काढण्यात आले. आंदोलने झाली, जागतिक स्तरावर दखल घेतली गेली, मात्र अपेक्षित न्याय मिळाला नाही. यामागे काही नेत्यांच्या पक्षीय मर्यादा आणि सत्तेच्या बंधनांचा अडसर असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. मराठा समाजाच्या आंदोलनाकडे पाहिले तर संपूर्ण समाज एकत्र रस्त्यावर उतरल्यामुळे त्यांचा आवाज पोहोचला, असे सांगत धनगर समाजानेही संघटितपणे उभे राहण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली.आमचे आजोबा लढले, वडील लढले आणि आम्हीही सातत्याने लढत आहोत. मात्र ही लढाई आता इथेच थांबली पाहिजे. पुढच्या पिढीला आंदोलन नव्हे, तर हक्क मिळाला पाहिजे, असे भावनिक आवाहन बोऱ्हाडे यांनी केले. जालन्यातील ऐतिहासिक मोर्चा हा फक्त इशारा होता. या आंदोलनात युवक, महिला, शेतकरी, नोकरदारांसह विद्यार्थ्यांनीही मोठ्या संख्येने सहभागी व्हावे. शाळकरी विद्यार्थ्यांनी गणवेशात उतरून आपला हक्क मागावा. एस.टी. आरक्षणाचे प्रमाणपत्र हातात पडेपर्यंत माघार घेतली जाणार नाही, असा ठाम निर्धार त्यांनी व्यक्त केला.२१ जानेवारीला मुंबईत पिवळं वादळ उसळणार आहे. हा महाराष्ट्रातील अडीच ते तीन कोटी धनगर समाजाचा आवाज असेल. राज्यकर्त्यांनी ठरवले तर कायद्यातून हा प्रश्न सुटू शकतो. सभेत अनेक मान्यवरांनी आपली भूमिका मांडली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक दिलीप उपासे यांनी केले, संचालन शशांक हुलके यांनी तर आभार प्रदर्शन प्रेमलता बुरंगे यांनी मानले. मोठ्या संख्येने समाजबांधव उपस्थित होते.

## कानगाव येथे खुले व्हॉलीबॉल सामने

**कानगाव/जनमाध्यम**

येथे दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी युनिटी क्लबच्या वतीने २४ व २५ डिसेंबर रोजी खुले व्हॉलीबॉलचे सामने विकास विद्यालयाच्या प्रांगणावर आयोजित करण्यात आले आहे.

स्पर्धेचे उद्घाटन आ. राजेश बकाने यांच्या हस्ते होणार असून, अध्यक्षस्थानी माजी खा. रामदास तडस राहतील. प्रमुख अतिथी म्हणून माजी खा सुरेश वाघमारे, भाजपा जिल्हाध्यक्ष संजय गाते, माजी जि.प. सभापती मिलिंद भेंडे, राहुल चोपडा, राजू किटकुले, ग्रा.पं. प्रशासक चांभारे, ग्रामसेवक नरेश भगत, पोलीस पाटील अर्चना मोहिजे, नांदगावच्या सरपंच ताई खासरे, तंटामुक्त समितीह अध्यक्ष समीर शेख, प्राचार्य झाडे, गजू खाटे, राजेश पोहनकर, गणेश भोयर, राकेश सुटे, बंडू उमाटे, संजय कांबळी, परशुराम ठोंबरे, बंडू वालदे, अमोल गायकवाड, बंडू करपे, राकेश मोहिजे, दुर्गेश पंचभाई यांची उपस्थिती राहणार आहे. या स्पर्धेत विजेत्या संघाला २५ हजार, द्वितीय १५ हजार, तर तृतीय पुरस्कार १० हजार रुपये देण्यात येणार आहेत. या स्पर्धेत जास्तीत जास्त संघांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन दुर्गेश पंचभाई, हरिभाऊ कामडी, पंकज लोखंडे, विशाल फिसके, शुभंकर भुते, तन्वीर सय्यद, धीरज रणदिवे, सुरज गोवणे, चेतन चौधरी, उमाकांत भुते, जाधव, अलकाज शेख, स्वप्निल धुर्वे, सुमित कान्हाकर, प्रतीक कानारकर, यश जांभुळकर, साहिल गायकवाड, सानिध्य चौधरी, राहुल मोगरे, तेजस खराबे, प्रज्वल डोंगरे, हर्षल शिरसागर, रोशन भोपळे, सक्षम लोणकरे, नैतिक श्रीराम, आकाश लोखंडे, रवी बालक, प्रथमेश तायवाडे, अमोल मोगरे, गोविंद झाडे, नयन रायकर, शुभम वाघमारे, योगेश वतारी, राहुल बालवंसी यांनी केले आहे.

### बोगदा आहे, पण जीवघेणा रस्ता : दारोडा येथे सर्व्हिस रोड करा

## पं.स.चे माजी सदस्य डॉ. विजय पर्बत यांचे ना. गडकरींना सडेतोड निवेदन

**आजनसरा/जनमाध्यम**

हिंगणघाट तालुक्यातील दारोडा गावालगतून जाणारा नागपूर–हैद्राबाद राष्ट्रीय महामार्ग गावकऱ्यांसाठी विकासाचा नव्हे, तर रोजच्या मृत्यूचा धोका ठरत असल्याची गंभीर बाब समोर आली आहे. महामार्गावरून भरधाव वाहतूक सुरू असताना गावासाठी आवश्यक असलेला सर्व्हिस रोड अद्याप न झाल्याने दारोडावासियांना अक्षरशः जीव मुठीत धरून रस्ता ओलांडावा लागत आहे. ही धोकादायक परिस्थिती तातडीने बदलावी, यासाठी पं.स.चे माजी सदस्य



डॉ. विजय पर्बत यांच्या नेतृत्वात केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांना निवेदन देण्यात आले.

निवेदनात नमूद करण्यात आले की, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने दारोडा परिसरात महामार्गाखाली बोगदा तयार केला आहे. मात्र, बोगद्याला जोडणारा सर्व्हिस रोडच नसल्याने या सुविधेचा प्रत्यक्ष उपयोग होत नाही. परिणामी, शेतकरी, विद्यार्थी, महिला व ज्येष्ठ नागरिकांना थेट महामार्ग ओलांडण्याशिवाय पर्याय उरलेला नाही. याच निष्काळजी नियोजनामुळे या ठिकाणी अनेक भीषण अपघात घडले असून काही नागरिकांना आपला जीव गमवावा लागला आहे.दारोडा हे गाव शेतीप्रधान असून दररोज शेतमाल वाहतूक, शाळा-महाविद्यालयात जाणारी मुले तसेच दैनंदिन व्यवहारासाठी गावकरी महामार्गाच्या दोन्ही बाजूंना ये-जा करतात. मात्र, सर्व्हिस रोड नसल्याने गावाचे अंतर्गत रस्ते थेट महामार्गावर येऊन मिळतात आणि भरधाव वाहनांचा धोका अधिकच वाढतो. त्यामुळे बोगदा असूनही तो केवळ कागदोपत्री सुविधा ठरत असल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे.या प्रश्नाकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी डॉ. विजय पर्बत यांच्यासह माता मंदिर देवस्थानचे विश्वस्त गणपत गाडेकर व सामाजिक कार्यकर्ते संजय कोसूरकर यांनी ना. गडकरी यांची भेट घेतली. दारोडा येथे तातडीने सर्व्हिस रोड मंजूर करून काम सुरू करण्यात यावे, अन्यथा भविष्यातील अपघातांना प्रशासन जबाबदार राहील, असा इशाराही त्यांनी दिला. सर्व्हिस रोड झाल्यास वाहतूक कोंडी सुटेल, अपघातांना आळा बसेल आणि गावकऱ्यांना सुरक्षित दळणवळण मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

## वर्धा नगरपालिका विजयी उमेदवार

**प्रभाग -१**
- सतीश मिसळ (भाजप)
- उज्वला पेठे (भाजप)

**प्रभाग-२**
- विजय उईके (भाजप)
- नाझिया शेख (काँग्रेस)

**प्रभाग-३**
- सचिन होले (भाजप)
- सोनल त्रिवेदी (भाजप)

**प्रभाग-४**
- वंदना चांबटकर (भाजप)
- सोहम ठाकूर (शरद पवार गट)

**प्रभाग-५**
- विलास आगे (भाजप)
- निशा गोसावी (भाजप)

**प्रभाग-६**
- तरुननुम शेख (भाजप)
- प्रदीप जग्याशी (शरद पवार गट)

**प्रभाग-७**
- मुन्ना झाडे (शरद पवार गट)
- श्वेता पाठक (शरद पवार)

**प्रभाग-८**
-डब्बू शर्मा (भाजप)
- वैभवी मेघे (भाजप)

**प्रभाग- ९**
- प्रदीप ठाकूर (भाजप)
- शुभांगी कोलते (भाजप)

**प्रभाग-१०**
- वंदना भुते (भाजप)
- पवन राऊत (भाजप)

**प्रभाग -११**
- प्रदीप तलमले (भाजप)
- स्वाती गव्हाणे (भाजप)

प्रभाग - १२
- अभिषेक त्रिवेदी (भाजप)
- मोहिनी आडे ङभाजप)

**प्रभाग - १३**
- यशवंत झाडे (कम्युनिस्ट पार्टी )
- दीपिका आडेपवार (शरद पवार)

**प्रभाग - १४**
- संतोष ठाकूर (अजित पवार )
- स्नेहा आकरे (अजित पवार)

**प्रभाग - १५**
- डॉ सुनील चावरे (भाजप )
- प्रियंका खंगार (भाजप)

**प्रभाग - १६**
- सुरेश आहुजा (अपक्ष)
- सोनाली तडसे (भाजप)

**प्रभाग - १७**
- राखी पांडे (भाजप )
- श्रीमती आगरकर (अपक्ष)

**प्रभाग - १८**
- शेख सोहेल सलीम (काँग्रेस)
- आश्विनी खोंडे (काँग्रेस)

**प्रभाग - १९**
- परवेज शेख (काँग्रेस)
- अर्चना सोमवंशी (काँग्रेस)

**प्रभाग - २०**
- कैलास राखडे (भाजप)
- मेघना त्रिमाले (भाजप)

## संक्षिप्त

### जुन्या बॅटरीसह ५० लीटर डिझेल पळविले

**वर्धा -** मोबाइल टॉवर परिसरातील जुनी बॅटरी व ५० लीटर डिझेल अज्ञात चोरट्याने चोरून नेले. ही घटना १७ डिसेंबर रोजी तक्रारीनंतर उघडकीस आली. याप्रकरणी अमोल देवीदास गुजर रा. सुवर्ण नगर, वाघापूर जि. यवतमाळ यांच्या तक्रारीवरून पुलगाव पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. देवळी परिसरात असलेले सर्वच टॉवर नेहमी चोरट्यांच्या निशान्यावर राहतात. नेहमीच कोणत्या ना कोणत्या वस्तूची चोरी होते. टॉवर तपासणारी यंत्रणा तपासणीकरिता गेल्यावर चोरी लक्षात येते. त्यानंतर चोरीची तक्रार संबंधित पोलीस ठाण्यात दाखल होत आहे. तक्रार दाखल झाल्यानंतर चोरटे मात्र पोलिसांना सापडत नाही. असे अनेक गुन्हे आजही तपासावर आहेत.

### डॉ. होमी भाभा वैज्ञानिक परीक्षेसाठी ओजस राठोडची निवड

**वर्धा -** डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक या राज्यस्तरीय स्पर्धेच्या टप्पा-२ साठी अल्फोन्सा सिनियर सेकंडरी स्कूल, सावंगी (मेघे) येथील विद्यार्थी ओजस अरविंद राठोड याची निवड झाली आहे.या स्पर्धेत विद्यार्थ्यांची वैज्ञानिक दृष्टी, तर्कशक्ती व विश्लेषणात्मक विचारक्षमता तपासली जाते. पहिल्या टप्प्यातील कठीण लेखी परीक्षेत उत्कृष्ट कामगिरी केल्यामुळे ओजस राठोड हा अल्फोन्सा स्कूलमधून टप्पा-२ परीक्षेसाठी पात्र ठरलेला एकमेव विद्यार्थी आहे. ओजसचे हे यश इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी असून, त्याच्या या यशाचे सिस्टर नव्या, वर्गशिक्षिका, शिक्षक आणि वडील अरविंद राठोड, आई सुचिता राठोड आदींनी कौतुक केले आहे.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष - १४ अंक २७**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

जनमाध्यम



# दिल्ली फूड फेस्टिव्हलमध्ये अमरावतीच्या महिला बचत गटाचा सहभाग

## वऱ्हाडी पाकसंस्कृतीचा दिल्लीतील फूड फेस्टिव्हलमध्ये ठसा

**अमरावती/का.प्र.**

महाराष्ट्राच्या पारंपरिक पाकसंस्कृतीचा अस्सल स्वाद राजधानी दिल्लीपर्यंत पोहोचवत, अमरावती जिल्ह्यातील महिला बचत गटाने उल्लेखनीय कामगिरी केली आहे. दिल्ली येथे आयोजित 'द पॅलेट्स ऑफ महाराष्ट्र' या राज्यस्तरीय फूड फेस्टिव्हलमध्ये वऱ्हाडी खाद्यप-दार्थांना प्रचंड प्रतिसाद लाभला असून या उपक्रमातून महिला बचत गटाला अवघ्या चार दिवसांत २ लाख २३ हजार ९०० रुपयांचे उत्पन्न प्राप्त झाले आहे.

दिल्लीतील महाराष्ट्र सदन येथे १२ ते १४ डिसेंबर या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या या फूड फेस्टिव्हलमध्ये महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतील पारंपरिक खाद्यपदार्थांचे



सादरीकरण करण्यात आले होते. अमरावती जिल्ह्यातील 'आनंदी स्वयं- सहायता समूह' या महिला बचत गटाने या महोत्सवात सहभाग नोंदवत वऱ्हाडी चवीचे वैशिष्ट्यपूर्ण पदार्थ दिल्लीकरांसमोर सादर केले. ठेचा, भाजी, भाकरी, रोडगे, पूरणपोळी, कढी गोळे, सरगुंडे, बिट्टया, पारंपरिक मसाले तसेच वऱ्हाडी पद्धतीने तयार करण्यात आलेले इतर पदार्थ नागरिकांच्या विशेष पसंतीस उतरले. चार दिवस महोत्सवात चाललेल्या या दिल्लीकरांनी वऱ्हाडी खाद्यपदार्थांचा मनमुराद आस्वाद घेतला. यामुळे विदर्भातील पारंपरिक पाककलेची ओळख राष्ट्रीय पातळीवर अधिक दृढ झाली आहे. महाराष्ट्रातील पारंपरिक पाकसंस्कृतीला देशभर पोहोच-विण्याच्या उद्देशाने जिल्हा परिषद व संबंधित विभागांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला.

## गाडगेबाबा अंधश्रद्धा, कर्मकांड व ढोंगीपणाला प्रखर विरोध करणारे विज्ञानवादी संत होते : प्रमोद पोकळे




**अमरावती/का.प्र.**

जे कां रंजले गांजले, त्यासि म्हणे जो आपुले, या उक्तीप्रमाणे खरा देव मंदिरात, मूर्तीत किंवा पूजाविधीत नसून तो दुःखी, उपेक्षित व गरजू माणसात आहे, ही शिकवण गाडगेबाबांनी आपल्या आचरणातून समाजाला करून देत, हातात झाडू घेऊन स्वच्छतेचे काम करणे, रोगी माणसांची सेवा करणे, भुकेल्याला अन्न देणे, या दशसुत्रीलाच त्यांनी खरी भक्ती मानली. त्यामुळे कर्मयोगी गाडगेबाबा म्हणजे अंधश्रद्धा, कर्मकांड आणि ढोंगीपणाला निर्भयपणे प्रखर विरोध करणारे विज्ञानवादी संत होते, असे प्रतिपादन दूरदर्शन व आकाशवाणी लोक-कलावंत प्रमोद पोकळे गुरुजी यांनी केले.

कर्मयोगी श्रीसंत गाडगेबाबा यांच्या ६९ व्या पुण्यस्मृति दिनाचे औचित्य साधून आधार बहुद्देशीय सामाजिक संस्था, बडनेराचे वतीने स्थानिक बारीपुरा चौक येथे आयोजित कार्यक्रमात प्रमोद पोकळे बोलत होते. संत गाडगेबाबांचा प्रत्यक्ष सहवास लाभलेले किसनराव सुने यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडलेल्या या कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे सचिव विजय इंगोले यांनी केले. कार्यक्रमाची सुरुवात दूरदर्शन व आकाशवाणी लोक-कलावंत भजनरत्न प्रमोद पोकळे गुरुजी यांनी गायलेल्या 'गोपाला गोपाला, देवकीनंदन गोपाला' या भजनाने झाला. त्यानंतर मान्यवरांनी गाडगेबाबांच्या जीवनावर प्रकाश टाकला. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष विनायक घिमे, सचिव विजय सुने, योगानंद जोशी, रवींद्र कोटांगळे, किशोर अंबाडकर, किरण अंबाडकर, कोंडेश्वर संस्थानचे अध्यक्ष रमेश पकडे, श्रीकांत रहाटगावकर, सुनील दातीर, विनायक औरंगपुरे, कृष्णराव चिरडे, सुभाष तिडके, सुरेश कांडलकर, राजेंद्र सुने, बबन दारोकार, राजेंद्र दाभाडे, रवी विरूळकर, रवींद्र सुने, घनश्याम डकरे, दिपक अंबाडकर, दिपक सुने, अंकुश पकडे, बंडू सुने, सदानंद टिंगणे यांचेसह स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नांदगाव बाजारसमिती मधील गोडाऊनला आग

## बारदाना बंडल, सिमेंट पोते, इतर साहित्य जळाले

**नांदगाव खंडेश्वर/वार्ताहर**

स्थानिक कृषी उत्पन्न बाजारसमितीच्या आवारात असलेल्या गोदाममधील साहित्याला आग लागून अंदाजे चार ते पाच लाख रुपयांचे नुकसान झाल्याचे समजते. यामध्ये गोदाम मध्ये असलेले व्यापारांचे बारदाणा बंडल बांधकामासाठी असलेले सिमेंटचे



पोते व इतर साहित्य आगीमध्ये जळून राख झाले. ही घटना शनिवारी दुपारी चार वाजताच्या सुमारास घडली आगीचे नेमके कारण कळू शकले नाही. बाजारसमितीमध्ये काम करणाऱ्या एका महिलेला गोडाऊनमधून धूर निघत असल्याचे लक्षात आल्यानंतर त्या महिलेने आरडा ओरड केली. तेव्हा गोडाऊनचे शटर उघडले. पाहता पाहता आगीने रौद्ररूप धारण केले व गोडाऊन मधील असलेले सर्व साहित्य जळून राख झाले. आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी अग्निशामक दलाला पाचारण करण्यात आले होते. आगीचे नेमके कारण कळू शकले नाही. शॉर्टसर्किटमुळे आग लागली असावी, असा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

# ग्रामपंचायतीत घर, पाणीपट्टी पुर्ण कर (टॅक्स) भरल्यास ५० टक्के सवलत

## कर भरण्यासाठी नागरिकांना ग्रामपंचायत प्रशासनाचे आव्हान

**अंजनगाव बारी/वार्ताहर**

ग्रामपंचायतीच्या निवासी मालमत्ता करासह घरपट्टी, पाणीपट्टी आणि दिवाबत्ती कर एकरकमी भरल्यास ५० टक्के सवलत देण्याची घोषणा शासनाच्या वतीने करण्यात आली आहे. मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत संपूर्ण पाणी पट्टी, घर टॅक्स चा भरणा केल्यास त्यामध्ये ५० टक्के सवलत मिळणार असल्याचा अनोखा उपक्रमास अंजनगाव बारी ग्रामपंचायत ने स्वागत केले असुन यांची प्रभाविपणे अंमलबजावणी करण्यासाठी हा भरणा ३१ डिसेबर २०२५ पर्यंत करावा लागणार आहे.तालुक्यातील सर्वात मोठ्या अंजनगाव बारी ग्रामपंचायतीची आतापर्यंतची थकबाकी ही अंदाज १ कोटी ५० लक्ष एवढी आहे. ही थकबाकी वसूली झाल्यास का ग्रामपंचायतच्या विकास कार्यात मोठा हातभार लावता येणार असून, गावाचा सर्वांगीण विकास साधण्यास आर्थिक सहाय्य लांबल्यास मिळणार आहे. यासाठी ग्राम प्रशासनाने कर वसुली व नागरीकांचे आर्थिक हित याची सांगड घालुन कराचा भरणा करणाऱ्यांना ५० टक्के सवलत देत शासनाच्या हा उपक्रम राबविला आहे.




'पाणी पट्टी, घर टॅक्सचा भरणा केल्यास नागरिकांना ५० टक्के सवलत मिळणे ही एक मोठी सुवर्ण संधी आहे. आणि या संधीचा फायदा करून घेणे हे नागरिकांच्या आर्थिक फायद्यासाठी लाभदायक असल्याने ग्रा.पं. मार्फत केली जाणारी ही कर वसुली १०० टक्के यशस्वी ठरणार याची खात्री वाटते. यामुळे नागरीकांना वेळेवर कर भरण्याची सवय लागेल ग्रामपंचायतलाही विकास कामे करण्यात मदत होईल.'

**विनोद इसळ ,**
ग्राम विकास अधिकारी, अंजनगाव बारी .

'अंजनगाव बारी ग्रा.पं. परिसरातील एक विस्तृत कारभार सांभाळणारी मोठी ग्रामपंचायत आहे. या ग्रामपंचायत मार्फत सर्वाधिक विकास कामे होत असल्याने १०० टक्के कर वसुली होणेही आवश्यक असुन यासाठी नागरीकांचे सहकार्यही आवश्यक आहे. या सर्व बाबीचा ताळमेळ साधुन, नागरीकांचे आर्थिक हित जोपासत करामध्ये ५० टक्के सवलतीचा शासनाचा हा उपक्रम राबविण्यात आला आहे.'

**शोभा खडसे,** सरपंच, अंजनगाव बारी

# श्री शिवाजी महाविद्यालयात संत गाडगेबाबा पुण्यतिथीनिमित्त व्याख्यान

## गाडगेबाबा अज्ञान, अंधश्रद्धा व अस्वच्छतेविरुद्ध प्रहार करणारे संत - प्रा.गजानन भारसाकळे

**अमरावती/का.प्र.**

शिक्षणाच्या अभावामुळे निर्माण झालेले अज्ञान व यामुळे फोफाविलेली अंधश्रद्धा यावर त्याकाळी संत गाडगेबाबांनी धनघणाती प्रहार करीत समाज प्रबोधनाचा यशस्वी प्रयत्न केला असे श्रद्धापूर्वक वक्तव्य दर्यापूरच्या गाडगेबाबा मंडळाचे संस्थापक - अध्यक्ष प्रा गजानन भारसाकळे यांनी केले.



स्थानिक श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला तथा गाडगेबाबा सामाजिक प्रतिष्ठान, अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने संत गाडगेबाबा यांच्या पुण्यतिथीनिमित्त विविध सामाजिक, पर्यावरणपूरक व प्रबोधनात्मक उपक्रम साजरे करण्यात आले.श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात संपन्न झालेल्या या पुण्यातिथी कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून बोलतांना प्रा. भारसाकळे यांनी आपले अभ्यासपूर्ण वकृत्व तथा ओजस्वी वाणीने गाडगेबाबांच्या बालपणापासून ते निर्वाणदिना पर्यंत महत्वपूर्ण कार्यप्रसंग विषद करून सभागृहाला मंत्रमुग्ध केले.या सोहळयाच्या अध्यक्षस्थानी श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावतीचे कार्यकारिणी सदस्य सुरेशदादा खोटरे तथा प्रमुख उपस्थिती या नात्याने संस्थेचे माजी उपाध्यक्ष महादेवरावजी भुईभार, महाविद्यालयाच्या स्थानिय विकास समितीचे सदस्य सुरेशराव राऊत तथा कार्यक्रमाचे संयोजक व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ रामेश्वर भिसे यांची उपस्थिती होती. या प्रसंगी मनोगत व्यक्त करतांना कार्यक्रमाचे अध्यक्ष सुरेशदादा खोटरे यांनी संत गाडगेबाबांचे कार्य हे केवळ विचारांचे नव्हे तर कृतीचे प्रेरणास्थान आहे असे भाष्य करून विद्यार्थ्यांनी ते आत्मसात करण्याचे आवाहन केले. महादेवरावजी भुईभार यांनी गाडगेबाबांची स्वच्छता, श्रम व अर्थपूर्ण समाजसेवा यावर मार्गदर्शनातून प्रकाश टाकला. सुरेश राऊत यांनी अश्या उपक्रमांच्या साजरीकरणातून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी निर्माण होते असे मत व्यक्त केले. प्राचार्य डॉ रामेश्वर भिसे यांनी महाविद्यालय सामाजिक उपक्रमांच्या आयोजनासाठी सातत्याने वर्षभर कार्यरत असते अशी माहीती विषद करून महाविद्यालयाच्या सर्वांगीण वार्षिक यशाचा आवर्जून उल्लेख केला. या प्रसंगी महाविद्यालयातील प्राविण्य प्राप्त खेळाडू व क्रीडा संघ यांचाही गौरव करण्यात आला. प्रा गजानन भारसाकळे यांनी आजवर साधलेल्या उल्लेखनिय कार्याचे यावेळी मंचावर उपस्थित मान्यवरांनी एकत्रित सत्कार करून अभिनंदन केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ संजय तिडके, संचलन डॉ. अर्चना पोटे तथा आभार प्रदर्शन रोहन बुंदेले यांनी केले. कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**पांदण रस्त्याचे काम सुरू करा शेतकऱ्यांची मागणी**

**कुऱ्हा-** माजीमंत्री ॲड.यशोमती ठाकूर यांच्या हस्ते शेंदूरजना बाजार ते कौंडण्यपूरव शेंदुरजना बाजार ते भांबोरा या नावाने ओळख असलेल्या पांदण रस्त्याचे भूमिपूजन होऊनसुद्धा अद्यापपर्यंत कामाला सुरुवात झाली नाही.त्यामुळे हा मंजुरात असलेला पांदण रस्ता पूर्णत्वास न्यावा, अशी मागणी शेंदूरजना बाजार येथील शेतकऱ्यांनी तहसीलदार तिवसा यांच्या कडे केली आहे.

# अध्यात्म व विज्ञानाची सांगड घाला - आ. सुलभा खोडके

## श्री.संत गाडगे महाराज याना अभिवादन

**अमरावती/का.प्र.**

अध्यात्म आणि विज्ञानाची सांगड संस्कार संत गाडगेबाबांनी स्वतःवर प्रयोग करून एक क्रांतीदर्शी विचार समाजात रुजविला. संत गाडगेबाबा यांनी दिलेला दशसूत्री कार्यक्रम हाच खरा रोकडा धर्म आहे. बाबांच्या विचारातून समाजाचे वैचारिक व संस्कारिक प्रबोधन घडण्यास समाज परिवर्तन होणार असल्याचे प्रतिपादन आ.सुलभा खोडके यांनी केले.

यावेळी संत गाडगेबाबा मिशनचे विश्वस्त बापूसाहेब देशमुख यांनी आ.खोडके यांचे



स्वागत केले. यावेळी आ. सुलभा खोडके यांनी सांगितले कि, कर्मयोगी संत गाडगेबाबा यांनी संपूर्ण महाराष्ट्राला स्वच्छता, सामाजिक सुधारणा व मानवतेचा संदेश दिला. त्यांच्या विचारातून पुरोगामी महाराष्ट्राची सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक विकासाची जडण -घडण झाली आहे. अमरावतीमधील संत गाडगेबाबा समाधी स्थळ हे केवळ श्रद्धास्थान व प्रेरणास्थळ न राहता सर्वानी याला आपली कर्मभूमी समजून संत गाडगेबाबा यांच्या विचारांचा वसा जोपासण्याचे आवाहन केले. संत गाडगेबाबा यांचे अंतिम श्रद्धास्थान असलेले श्रीक्षेत्र नागरवाडीचे इंद्रभुवन साकारण्यासाठी मागील ५० वर्षांपासून निष्काम सेवाभावाने कार्यरत बापूसाहेब देशमुख यांच्या आ. खोडके यांनी शाल व पुष्प गुच्छदेऊन सत्कार केला. दरम्यान आमदार महोदयांनी बाबांच्या पुण्यतिथी महोत्सवात सुश्री.महेश्वरी देवी यांच्या मुखारविंदूतून आयोजित भागवत कथा श्रवणाचा लाभ घेतला. ज्यामध्ये महेश्वरीदेवी यांनी रुख्मिणी विवाहाच्या प्रसंगाचे वर्णन करून संपूर्ण परीसर भक्तिमय करून सोडला. यावेळी संस्थेचे विश्वस्त बापूसाहेब देशमुख, संचालक सागर देशमुख, समाजभुषण- भरत रेळे महाराज, संचालक गजानन देशमुख, व्यवस्थापक प्रकाश महात्मे, अतुल रेळे, गजानन जवंजाळ, मीनल सवाई आदींसह सेवाधारी व अनुयायी प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रमाअंती सर्व उपस्थितांचे सागर देशमुख यांनी आभार मानले.

## संक्षिप्त

### ग.भा. सुमनबाई चुंगडे यांचे निधन



**कुऱ्हा -** येथील प्रतिष्ठीत नागरिक तथा जि.प.मंदुरा (ता.मुर्तिजापूर जि.अकोला) येथील शिक्षक अशोक गोपाल सिंग चुंगडे यांच्या मातोश्री ग.भा. सुमनबाई गोपालसिंग चुंगडे यांचे वयाच्या ७८ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले.पश्चात एक मुलगा,स्नुषा,नातू नातवंड असा बराच मोठा आप्त परिवार आहे. स्व. सुमनबाई चुंगडे यांच्या अंत्यविधी करिता सर्वच स्तरावरील नातेवाईक व गावकरी उपस्थित होते.

### स्व. संदीप महाराज यांची पुण्यतिथी



**कुऱ्हा -** तिवसा तालुक्यातील घोटा येथील स्व. संदीप महाराज शिरकरे यांची श्रीधरराव भानाजी शिरकरे यांच्या कडे दरवर्षी प्रमाणे याही वर्षी वऱ्हा व घोटा येथील राष्ट्रसंत खंजेरी भजनाचा कार्यक्रम होऊन राष्ट्रसंत खंजेरी भजन व आरती करून प्रसाद वाटू स्व.संदीप महाराज शिरकरे यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली.

### पीडीएमसी येथे अतिथीगृहाचे भुमिपूजन

**अमरावती -** श्री शिवाजी शिक्षण संस्था व्दारा संचालित डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख स्मृती वैद्यकीय



महाविद्यालय येथील ग्रंथालय परिसरात संस्थेचे कोषाध्यक्ष दिलीपबाबू इंगोले यांचे अध्यक्षतेखाली व संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांचे शुभहस्ते पालक व विद्यार्थ्यांचे निवासासाठी अतिथीगृहाचे भुमिपूजन पार पडले. कार्यक्रमाच्या सुरूवातीला लोकमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या प्रतिमेचे पुजन, हारार्पण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी संस्थेच्या कार्यकारी परिषदेचे सन्माननिय पदाधिकारी व सदस्य सर्वश्री ॲड. गजाननराव पुंडकर, ॲड. जयवंत उपाख्य भैय्यासाहेब पाटील, केशवराव मेतकर, सचिव डॉ. विजय ठाकरे, महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. अनिल देशमुख, वैद्यकीय अधिक्षक डॉ. पवन टेकाडे, प्रा.डॉ. के. वाय. विल्हेकर, डॉ. पी. आर. सोमवंशी, डॉ.पी. आर. भिसे, डॉ. आर. आर. सोनी, डॉ.ए.व्ही. डफळे, डॉ.एस.एस.पांडे, डॉ.पी.पी.तोरकडी, डॉ.डी.जी. विधळे, डॉ. के.ए. बनसोड, डॉ. ए. के. जावरकर, डॉ.पी. के. कुटे, डॉ.ए.जी. काळबांडे, डॉ.व्हि.आर. वासनिक, डॉ. एम. एम. देशमुख, डॉ. आर. आर. खोरगडे, डॉ. एस. आर. निर्मळ, डॉ.एस.सी. मोहोड, डॉ. श्रीकांत फुटाणे तसेच संस्था अभियंता वृषाली वानखडे, अंकुश बाकडे, राधिका होले, किशोर इंगळे, सुनिल देशमुख, नरेंद्र इंगोले, पुरूषोत्तम बाजड, ऋग्वेद देशमुख, श्रीकांत इंगळे, गौरव देशमुख, राहूल धांडे, राहूल लकडे, कॉन्ट्रॅक्टर तुषार नांदूरकर प्रामुख्याने उपस्थित होते.

### संत गाडगेबाबा पुण्यतिथी साजरी

**अंजनगाव सुर्जी -** येथे कर्मयोगी फाउंडेशन या



सामाजिक संस्थेच्या च्या वतीने निष्काम कर्मयोगी श्री संत गाडगेबाबा यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन केले. याप्रसंगी कर्मयोगी श्री संत गाडगेबाबा यांच्या मूर्तीला अभिवादन करण्यात आले. विचारांचा जयघोष करण्यात आला यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष ललित ढेपे, संजय वाघुळे, मनोज अरबट, चौखंडे, पाथरे, खोकले तसेच बरीच मंडळी उपस्थित होते.

### कला व विज्ञान महाविद्यालयात संत गाडगे महाराज यांना अभिवादन

**कुऱ्हा -** अमरावती जिल्ह्यातील तिवसा तालुक्यातील



कला व विज्ञान महाविद्यालय,कुऱ्हा येथे थोर समाजसुधारक, स्वच्छता दूत व संत परंपरेतील महान व्यक्तिमत्त्व राष्ट्रसंत गाडगे महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्त अभिवादनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना व विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

### बहुउद्देशीय समाज विकास संस्थेत संत गाडगेबाबा पुण्यतिथी साजरी



**खल्लार -** नजिकच्या उपराई येथिल रामरावजी खंडारे बहुउद्देशीय समाज विकास संस्थेत राष्ट्रसंत गाडगेबाबा यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. संस्थेचे सचिव भूषण सुरेशराव खंडारे यांच्या हस्ते संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे दीपप्रज्वलन, पुष्पहार अर्पण करुन संस्थेच्या वतीने उपस्थितांना मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन के. बी. खंडारे यांनी केले.कार्यक्रमाला संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते.

# अमरावती जिल्ह्यात भाजपला सहा नगराध्यक्ष

## काँग्रेस २, प्रहार , शिंदे गट १, ठाकरे गट १ तर वंचित १

**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्ह्यातील दहा नगरपरिषद आणि दोन नगरपंचायतीचे निकाल रविवारी (दि.२१) घोषित झाले असून बारा पैकी सहा ठिकाणी भाजपचे नगराध्यक्ष निवडून आले आहेत. काँग्रेसला दोन तर शिवसेना शिंदे गट आणि ठाकरे गट प्रत्येक एका ठिकाणी नगराध्यक्ष निवडून आणण्यात यशस्वी झाले आहेत. प्रहार ला एका ठिकाणी आणि वंचित बहुजन आघाडीला एक नगराध्यक्ष निवडून आणण्यात यश आले आहे. निवडणूक निकालानुसार अचलपूर मध्ये भाजपच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार रूपाली माथने यांनी विजय मिळवला.अंजनगाव सुर्जी नगर परिषदेमध्ये भाजपचे अविनाश गायगोले, धारणी नगरपंचायतीत भाजपचे सुनील चौथमल, धामणगाव रेल्वे नगर परिषदेत भाजपच्या अर्चना रोठे अडसड, वरुड नगर परिषदेत भाजपचे ईश्वर सलामे आणि शेंदुर्जना घाट नगर परिषदेत भाजपच्या सुवर्णा वरखेडे यांचा विजय झाला (पान २ वर)




# धामणगांवात भाजपाचा दणदणीत विजय : काँगेसचा सुपडा साफ

## सर्व २० ही जागांवर भाजपाचे नगरसेवक विजयी

**धामणगांव रेल्वे/प्रतिनिधीः-** नगरपालीका निवडणूकीच्या मततमोजणी दरम्यान भारतीय जनता पक्षाला एकहाती सत्ता मिळाली असुन १० प्रभागातील सर्व २० जागांवर भाजपाच्या नगरसेवकांनी विजय मिळविला आहे. तर नगराध्यक्ष म्हणून भाजपाच्या अर्चना अरुण अडसड (रोठे) आक्का यांचा १३७४ मतांनी दणदणीत विजय झाला आहे.

नगरपालीकेच्या सार्वत्रिक निवडणूकांचे मतदान २ डिसेंबर रोजी पार पडले होते.दरम्यान न्यायालयाच्या निकालाअंती मतमोजणी प्रक्रीया रविवार दि. २१ डिसे रोजी स्थानिक तहसील कार्यालयाच्या सभागृहात घेण्यात आली. यावेळी निनवडणूक निर्णय अधिकारी रुपेश खंडारे व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी पूनम कळंबे यांच्या उपस्थितीत नगरपालीकेच्या १० प्रभागातील एकुण २० नगरसेवक व नगराध्यक्ष पदाचा निकाल जाहीर करण्यात आला. यात नगराध्यक्ष पदाकरीता भाजपाच्या अर्चना अरुण अडसड रोठे आक्का यांना ६७०४ मते तर कॉंग्रेसच्या वर्षा वसंतराव देशमुख यांना ५३३० मते मिळाली. यात अर्चना अरुण अडसड रोठे आक्का यांचा १३७४ मतांनी विजय झाला आहे.



नगराध्यक्ष पदाच्या मतदानासाठी १८६ मतदारांनी नकाराधीकाराचा (NOTA) वापर केला आहे. तर प्रभाग क्र. १ अ मधुन भाजपाचे नरेंद्र अण्णाजी चौधरी हे विजयी झाले असुन यांना ६४३ मते प्राप्त झाली आहेत. तर काँग्रेसच्या नितीन देशमुख यांना २८२ मते मिळविता आली.यात चौधरी यांचा ३६१ मतांनी विजय झाला आहे. प्रभात १ ब मध्ये भाजपाच्या मंजिरी अतुल भोगे (पान २ वर)

# मोर्शी नगरपालिकेच्या निवडणुकीत प्रतीक्षा गुल्हाने विजयी

## बहुप्रतिक्षेनंतर शिवसेना शिंदे गटाचा नगराध्यक्ष






**मोर्शी/प्रतिनिधीः-** मोर्शी नगर पालिकेच्या निवडणुकीत शिवसेना शिंदे गटाचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार प्रतीक्षा गुल्हाने विजयी झाल्या आहेत. प्रतीक्षा गुल्हाने यांना ७ हजार २३० मते मिळाली.

मोर्शी नगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक दि.२ डिसेंबर रोजी पार पडली होती. १८ दिवसाच्या प्रतीक्षेनंतर दिनांक २१ डिसेंबर रोजी तहसील कार्यालयाच्या सभागृहात सकाळी दहा वाजल्यापासून मतमोजणीला सुरुवात करण्यात आली. लोकनियुक्त नगराध्यक्ष पदासाठी सहा उमेदवार निवडणूक रिंगणात होते. २४ नगरपालिका सदस्या करिता १२७ उमेदवार निवडणूक रिंगणात उभे होते. भारतीय जनता पार्टीचे ६ उमेदवार विजयी झाले.राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे सहा उमेदवार विजयी झाले. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे ५ उमेदवार विजयी झाले. राष्ट्रवादी काँग्रेस अजित (पान २ वर)

# शंकरपट म्हणजे संस्कृती, परंपरा आणि मातीशी असलेल्या नात्याचा उत्सव -आ.राजेश वानखडे

## नांदगाव पेठ येथे विदर्भस्तरीय शंकरपटाचा जल्लोषात शुभारंभ

### -विदर्भातील ६५ नामवंत बैलजोडी धारकांचा सहभाग

**नांदगाव पेठ/प्रतिनिधीः-** शंकरपट ही केवळ स्पर्धा नसून आपल्या ग्रामीण संस्कृतीचा, शेतकरी परंपरेचा आणि आपल्या मातीशी असलेल्या नात्याचा उत्सव आहे. बैलजोडी आणि शेतकरी हे या देशाच्या (पान २ वर)



# दर्यापूर नगराध्यक्षपदी कॉंग्रेसच्या मंदाकिनी भारसाकळे विजयी

## प्रदीप मलिये दुसऱ्या स्थानी, आमदार पत्नीचा पराभव

### कॉंग्रेस १७, भाजप ४, शिंदे शिवसेना २, राष्ट्रवादी श.प.१, राष्ट्रवादी अ.प.१

**खल्लार/प्रतिनिधीः-** दर्यापूर नगर परिषदेच्या रविवारी (दि.२१) झालेल्या मतमोजणी दरम्यान आलेल्या निकालानुसार सत्ताबदल होऊन कॉंग्रेसच्या मंदाकिनी सुधाकर भारसाकळे यांनी ८ हजार ९२५ मते मिळवून विजय मिळवला आहे. विशेष म्हणजे १२ प्रभागातील २५ नगरसेवक पदापैकी तब्बल १७ नगरसेवक कॉंग्रेसचे निवडून आले आहेत.

नगराध्यक्ष पदाच्या चुरशीच्या (पान २ वर)



# तोडफोड प्रकरणातील आरोपींची सार्वजनिक परेड

## पोलीसांचा कडक इशारा; गुंडांमध्ये दहशत



**अमरावती/प्रतिनिधीः-** मंथन पाळणकर याच्या हत्येनंतर राजापेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील केडिया नगर परिसरात काही तरुणांनी घरांवर दगडफेक केली आणि वाहनांची तोडफोड करून दहशत निर्माण केली होती. या गुंड प्रवृत्तीच्या आरोपींवर राजापेठ पोलिसांनी कठोर कारवाई केली आहे. रविवारी (दि. २१) पोलिसांनी या आरोपींची सार्वजनिक धिंड काढून कायदा हातात घेणाऱ्यांना थेट आणि स्पष्ट इशारा दिला.

या कारवाईदरम्यान आरोपींची (पान २ वर)

# चांदुर रेल्वे नगराध्यक्षपदी वंचित आघाडीच्या प्रियंका विश्वकर्मा

## भाजप चे ११, काँग्रेसचे ४, वंचितचे ३ तर अपक्ष २ नगरसेवक विजयी

**चांदुर रेल्वे/प्रतिनिधीः-** दि.२ डिसेंबर २५ रोजी पार पडलेल्या न. प. सार्वत्रिक निवडणूकीचा निकाल आज जाहीर करण्यात आला. त्यामध्ये अटीतटीच्या लढतीत नगराध्यक्षा पदी वंचित बहुजन आघाडी '(आपलं चांदुर') पॅनलच्या प्रियंका विश्वकर्मा निवडून आल्या. तर नगरसेवक म्हणून भाजपचे ११,कॉंग्रेस ४,वंचित बहुजन आघाडी ३ तर अपक्ष २ नगरसेवक निवडून आले.



नगराध्यक्षा पदासाठी झालेल्या अटीतटीच्या निवडणुकीत भाजपच्या स्वाती मेटे यांना ४१७९ मते तर वंचित बहुजन आघाडी(आपलं चांदुर पॅनल)च्या प्रियंका (पान २ वर)

# अंजनगाव सुर्जीमध्ये नगराध्यक्ष पदाची चुरशीची लढत

## केवळ १२४ मतांनी भाजप उमेदवार अविनाश गायगोले विजयी

**अंजनगाव सुर्जी/प्रतिनिधीः-** आज दिनांक २१ डिसेंबर रोजी अंजनगाव सर्जी नगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीचा निकाल घोषित झाला असून नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीकरिता एकूण सात उमेदवार रिंगणात होते. परंतु भाजप उमेदवार अविनाश गायगोले आणि कॉंग्रेस पक्षाच्या आशा बानो शेख रशीद खन्ना यांच्यामध्ये अतिशय चुरशीची लढत झाल्याचे दिसून आले.



भाजपाचे अविनाश गायगोले यांना १०,१८१ तर कॉंग्रेस पक्षाच्या आयेशाबानो शेख रशीद यांना १०,०५७ मते मिळाली. केवळ १२४ मतांनी भारतीय जनता पार्टीचे नगराध्यक्षपदाचे उमेदवार अविनाश गायगोले यांचा निसटता विजय झाला.

नगरसेवकांमध्ये भाजपचे ६, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस ९, शिवसेना शिंदे गट ३, उबाटा चे ७, समाजवादी पार्टी २, अपक्ष १ असे २८ नगरसेवक पदी विजयी झाले आहेत. तर इतर नगराध्यक्ष पदाचे उमेदवार यांना पुढील (पान २ वर)

### आमदारांचे पुत्र चौथ्या स्थानी

**-१४ प्रभागांमध्ये कॉंग्रेस ९, भाजपा ६, शिवसेना शिंदे गट ३ ,शिवसेना उबाठा ७, समाजवादी पक्ष २, अपक्ष १नगरसेवक विजयी**

# अचलपूर नगराध्यक्ष पदी भाजप उमेदवार रुपाली माथने यांचा ऐतिहासिक विजय

## नगरसेवकांच्या निवडणुकीत भाजपला बंडखोरी व युवा स्वाभिमान उमेदवारांचा फटका

### कॉंग्रेस पक्षाकडे सर्वाधिक जास्त १५ नगरसेवक

**अचलपूर/प्रतिनिधीः-** अचलपूर नगरपरिषद नगराध्यक्ष व नगरसेवकांच्या पदाच्या मतमोजणीचा निकाल आज जाहीर झालेला आहे. यामध्ये अचलपूर नगरपरिषद नगराध्यक्षपदी भारतीय जनता पक्षाच्या उमेदवार रुपाली अभय माथने यांचा एतिहासिक विजय झालेला आहे .तर दुसरीकडे जुळ्या शहरातील २० प्रभागातून ४१ नगरसेवक पदासाठी नागरिकांनी यंदा काही नवीन चेहरे तर काही आजी-माजी नगरसेवकांना निवडून दिले आहे .या मध्ये भारतीय जनता पक्षाचे एकूण ९ नगरसेवक निवडून आलेले आहे. तर अपक्ष नगरसेवक म्हणून १० नगरसेवक अचलपूर नगर परिषदेत प्रतिनिधित्व करणार आहे .त्यासोबत प्रहार जनशक्ती पक्षाचे २ , एमआयएम चे ३ , अजित पवार गट राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी चे २ आणि कॉंग्रेसचे १५ असे एकूण ४१ नगरसेवक निवडून आलेले आहे. यामध्ये कॉंग्रेस पक्षाकडे सर्वाधिक जास्त १५ नगरसेवक आहे. तसेच जुळ्या शहरातील अनेक प्रभागात भारतीय जनता पक्षाला बंडखोरी व युवा (पान २ वर)







लोकशाहीचा आदर करत अंजनगाव सुर्जी नगरपरिषद प्रभाग क्रमांक दोन मधील सर्व मतदारांनी आपले कर्तव्य पार पाडून मला भरघोस मतांनी विजयी केल्या बाबत, सर्व माझे मित्र मंडळी तसेच माझ्या प्रचारासाठी रात्रंदिवस अविरतपणे राहिलेले माझे हितचिंतकांचे मला भरघोस मतांनी निवडून दिल्या बद्दल

मनस्वी आभार

-इंजि. सुयोग खाडे


# महापालिका निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेसने फुंगले रणशिंग

## निवडणूक लढायची नसून जिंकायची आहे - आ.सुलभा खोडके

### -राष्ट्रवादीच्या परिवार मेळाव्यातून संचारला उत्साह

**अमरावती/प्रतिनिधीः-** निवडणुका येत असतात आणि जात असतात. त्यासाठीच राजकारणाची साथ असते. मात्र सर्वसमाज घटकांच्या विकासाचे व जिव्हाळ्याचे प्रश्न सोडविण्यासाठी व त्यांना न्याय देण्यासाठी समाजकारण करणे महत्वाचे आहे. राजकारणामध्ये आपण कुठलाही निर्णय घेत असतांना आपल्या माणसांना विश्वासात घेणे महत्वाचे आहे. त्यांची साथ (पान २ वर)







चांदूरबाजार येथील प्रहार चे नगराध्यक्षा

सौ मनीषा मनीष नागलिया

यांच्याकडून चांदूरबाजार वासियांनी व प्रहारच्या कार्यकर्त्यांनी आम्हाला मतदान केल्याबद्दल धन्यवाद व

सर्वांचे मनापासून आभार